११२३, सदाशिव पेठ, पुणे ३०

गोमंतकीय मराठी काव्य

— ना. मा. नायक

विषयानुक्रम

कृष्णदास शामा	३
विष्णुदास नामा	५
समग्रानंद	७
ज्ञानदेव	,,
नामदेव	,,
शिवानंद	८
श्रीजीवोत्तमतीर्थ	९
नायकस्वामी	,,
सोहिरोबानाथ	१०
स्टिफन्स	१३
करवा	१५
आं. माल्दांज्य	१६
मा. नोरोंज्यँ	१६
वि. न. सांखोळकर	१७
तु. वर्दे	,,
रघुनाथ शेणवी	१९
आ. महेश्वरभट	२०
हरिपंडित	,,
रामचंद्र मल्हार	२१
शुभानंद	२२
सखोबा नाईक	,,
व्यंकट कवि	२३
कृ. ज. बांदकर	२४
मुकुंदराज	२५
शि. शास्त्री	२६
मा. चं. हुकले	,,
ह. नायक	२७
ल. नागवेकर	,,
ज. आसगांवकर	,,
रा. देसाई	२८
वै. देसाई	२८
पांडोबा कैसरे	२९
रा. वा. केणी	,,
शं. व्यं. टाकी	,,
ग. शं. टाकी	३०
मं. रा. टाकी	३१
भा. स. वाघ	३२
मा. ना. वैद्य	,,
वि. रं. शेळडेकर	३३
ल. ना. खर्डे	३५
म. सी. जोशी	,,
दा. फ. भांडारे	,,
रं. ग. शेळडेकर	३६
गो. पुं. हेगडे देसाई	,,
वा. रा. करंडे	,,
अ. स. करंडे	,,
रा. काकोडकर	,,
रा. पां. वैद्य	३७
रा. द. किंजवडेकर	३८
भि. मु. देशपांडे	,,
रा. कृ. कामत	३९
वि. कृ. कामत	,,
व्यं. गि. कारे	,,
नं. शं. पेडणेकर	,,
रा. वझे	४०
के. शां शिरवैकर	,,
पां. ला. शिरोडकर	,,
श्री. मु. सांवर्डेकर	,,
स. प्र. भाटीकर	,,
स. प्र. मोये	४१
व्यं. अ. नार्वेकर	,,
द. र. मोरजकर	,,
ज. घ. मळकर्णेकर	४२
पां. म. मराठे	,,
द. तु. पणशीकर	४३
वा. ल. पणशीकर	,,
य. सू. सरदेसाई	४४
द. व्यं. पै	,,
अ. का. प्रियोळकर	४५
वि. का. प्रियोळकर	,,
पु. शि. रेगे	४६
सां. घ. कंटक	,,
हे. सु. नाईक	,,
गो. तळावलीकर	,,
वि. स. सुखठणकर	,,
के. वि. काकोडकर	४७
रा. ना. गांवणेकर	,,
हि. कीर्तनी	,,
म. जोशी	४८
बा. भ. बोरकर	४९
घ. सां मळकर्णेकर	५१
म. ग. भट	,,
र. सी. देसाई	,,
वि. प्र. देसाई	,,
पु. मं. लाड	५२
दा. अ. कारे	,,
व्यं. वि. वैद्य	५३
बा. अ. बाळे	,,
व. वै. कारे	५४
कृ. ह. रेगे	,,
शंकर रामाणी	५५
म. प्र. सरदेसाई	,,

सौ. सी. कुंडईकर ५६
वा. शि. कुंडईकर ,,
वा. भा. नायक ५७
म. ल. सरदेसाई ५९
र. वि. पंडित ,,
मा. रा. महाले ६०
द. ज. बोरकर ,,
के. सां. वैद्य ६१
वा. ल. वझे ६२
य. पां. रामाणी ,,
गो. वि. बर्वे ६२
सौ. वि. सरमळकर ६३
प्र. माडगांवकर ,,
कु. ते. व. कारे ,,
रेखा रेगे ,,
हि. पाणंदीकर ६४
सु. मोरजकर ,,
शै. धोंड ,,
अ. सावंत ,,
सो. ग. रांगणेकर ६५
द. बि. देसाई ६६
गो. मयेकर ,,
श. सरदेसाई ,,
हि. मा. कामत ,,
ना. भा. नायक ६७
र. वि. गांवकर ६८
चं. पार्सेकर ,,
पा. कृ. बोरकर ,,
अ. काणकोणकर ,,
ज. पां. कामत ,,
कि. धुरी. ,,
श्री. गो. हेदे ६९
रा. द. सरकारी ,,
रा. प्रभु ७०
रा. कुंकळ्येंकर ,,
वि. कुर्डीकर ७१
वा. मं. दुभाषी ,,
ब. प्रभु ७२
सु. प्रभु ,,
प. सिनारी ,,
चिं. ग. जोशी ७३
के. धुमे ,,
अ. र. टोपले ,,
र. अ. टोपले ,
के. ग. सावैकर ,
त्रि. त्रि. सहकारी ७४
रा. द. दीक्षित ७५
भि. ग. अभिषेकी ७६
ल. सामंत ७७
श्या. देसाई ,,
स. रा. केणी ७८
बा. स. बर्वे ,,
श्री. पां. नार्वेकर ,,
स. पां. बर्वे ,,
कृ. के. रायकर ,,
बि. निपाणकर ,,
ना. र. केंकरे ,,
श. साखळकर ७९
भा. नाईक ,,
अ. परुळेकर ८०
श्या. जांबावलीकर ,,
र. पं. नाईक ८१
द. मा. निगळये ,,
र. ग. तळवडकर ८२
गो. वि. नायक ८३
गो. भोबे ,,
सु. केरकर ,,
अ. सरदेसाई ८४
तारानाथ ८५
भा. वा. तळावलीकर ८५
रा. तिळवे ,,
हि. पेडणेकर ८६
हितचिंतक ,,
अनंत ,,
ना. न. पै ८७
स. ना. करंडे ,,
अरविंद ८८
श. देशप्रभु ,,
आ. ना. पेडणेकर ८९
सु. देसाई ९०
आ. प्रभु ,,
वि. ज. बोरकर ,,
ना. वा. लाड ९१
सं. वेर्लेकर ,,
गो. द. वैद्य ९२
स. रा. शिरोडकर ,,
मु. वि. सरदेसाई ९३
मं. लोलयेकर ,,
ग. पावसकर ,,
रा. महांबरे ९४
स. वि. देसाई ,,
वि. मं. कुडचडकर ९५
म. नावेलकर ,,
म. सुकटणकर ९६
क. ग. वैद्य ,,
अ. ता. कामत ९७
रा. पां. कारापुरकर ९८
शां. मोये ,,
क. सामंत ,,
प्र. देसाई ९९
वि. दलाल ,,
क. सुशीला ,,
रा. वि. देवारी ,,
कोंकणी काव्य १००

प्रास्ताविक

भारतमित्र प्रकाशनचें हें क्रमांक ३१ चें पुस्तक असून गोमंतक-इतिहास-ग्रंथमालेचा हा सातवा ग्रंथ आहे. गोमंतक-इतिहास दिग्दर्शन, गोमंतकीय देवालयें, गतकालीन गोमंतकीय मुत्सद्दी, गोव्याच्या राज्यकर्त्यांचीं नाणीं, गोमंतकीय नियतकालिकें व श्रीरामनाथ देवालयाचा इतिहास अशा मागच्या सहा ग्रंथांप्रमाणेंच हा सातवा इतिहास-ग्रंथ सुविचारी वाचक वर्गाला अवश्य आवडेल अशी आशा वाटत आहे.

गोमंतकीय मराठी नियतकालिकांच्या इतिहासानंतर आतां हा गोमंतकीय मराठी काव्याचा इतिहास वाचकांपुढें येत असून यानंतर मराठी गद्य वाङ्मयाचा इतिहास प्रकाशनांत येणार आहे. हे तिन्ही इतिहास मिळून गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा अतएव गोमंतकीयांच्या मराठी साहित्यसेवेचा सर्वांगीण स्वरूपाचा धांवता इतिहास मराठीच्या रसिक व विचारवंत वाचकांनां उपलब्ध होणार आहे. पुढें योग्य झाल्यास हा वाङ्मयाचा इतिहास विस्तृत स्वरूपांत मोठा लिहावा अशीही इच्छा आहे. तथापि तें कार्य भविष्यावर अवलंबून आहे.

गोमंतकीय मराठी काव्याच्या या इतिहास ग्रंथांत प्रथम मराठी साहित्योपासनेचा गोव्यांतील आरंभ व गोमंतकांतील आद्य मराठी कविवर्यांची त्यांच्या आरंभींच्या काव्यासह माहिती देऊन नंतर गोव्यांतील व गोव्याबाहेरील इतर सर्व जुन्या व नव्या गोमंतकीय कवींच्या काव्याचें धांवतें दिग्दर्शन केलें आहे.

या ग्रंथासाठीं एकंदर गोमंतकीय मराठी काव्याची बिनचूक माहिती मिळावी या उद्देशानें गोव्यांतील कवींनी आपापल्या काव्याची माहिती पाठवून सहकार्य करावें याबद्दल भारतमित्राच्या अंकांतून त्यांनां अगत्याची सूचनाहि दिली; तथापि अवघ्याच कवींवांचून इतरांकडून कांहींच माहिती आली नाहीं; आणि त्यामुळें कित्येक नियतकालिकांचें निरीक्षण करावें लागलें. तसेंच अनेक ग्रंथसंग्रहालयांतील काव्यपुस्तकें प्रत्यक्ष पहावीं लागलीं. त्याच्यासाठीं कित्येक ठिकाणीं मुद्दाम जावें लागलें; अतएव त्यासाठीं, बरेच श्रम करावे लागले. इतकें असूनहि कांहीं ठिकाणीं समाधानकारक माहिती मिळूं शकली नाहीं.

अशा अनेक अडचणींतून मार्ग काढीत कमी अधिक प्रमाणानें जशी माहिती उपलब्ध झाली तशी ती देण्यांत येऊन हा काव्येतिहासाचा ग्रंथ आज प्रेमळ वाचकांपुढें सादर करण्यांत येत आहे.

मराठी गद्य वाङ्मयाच्या इतिहासाच्याहि मुद्रणास आतां लवकरच आरंभ होणार आहे.

रिवण (गोवा), दि. १९ डिसेंबर १९६१

—ना. भा. नायक

*

गोमंतकीय मराठी काव्य

गोमंतकीयांची बोलण्याची भाषा कोंकणी असली तरी पूर्वीपासून लिहिण्याची किंवा ग्रांथिक भाषा मराठीच असल्याचें दिसून येतें. मराठीची लेखी परंपरा शके ४१० च्या मंगळवेढे ताम्रपटावरून इ. सनाच्या ५ व्या शतकापासूनची मानतात. तथापि ८ व्या शतकापर्यंतचा गोमंतकाचा एकहि प्राचीन मराठी ग्रंथ उपलब्ध नसल्यानें त्या कालांतील माहिती अजून अज्ञात आहे. राष्ट्रकुटांच्या राजवटींत ९ व्या शतकांत गोमंतकीय लेखकानें लिहिलेल्या एका मराठी ग्रंथाचा उल्लेख दिसून येतो.

डॉ. आळतेकर यांच्या The Rashtrakuts and their times या ग्रंथांत त्यांनीं दिलेल्या राष्ट्रकुटांच्या वंशावळींतील मूळ पुरुष मानांक याच्यापासून २३ वा राजा पहिला अमोघवर्ष (याचा काल सन ८१४ ते ८८०) यानें जो ' कविराजमार्ग ' संस्कृत ग्रंथ लिहिला त्याचें यतिंद्र नांवाच्या त्याच्या दरबारांतील एका पंडितानें काव्यमय मराठी भाषांतर केलें. यतिंद्र हा दक्षिण कोंकणांतील असल्याचा उल्लेख मिळतो. अर्थात् तो गोमंतकीयच असणें संभवनीय आहे. कारण प्राचीन कालीं गोमंतकाच्या व दक्षिण कोंकणच्या सीमा एकच होत्या. (भारतमित्र मासिक वर्ष ३२ पृ. १६).

गोमंतकांतील निरनिराळ्या ठिकाणचे अनेक प्राचीन ग्रंथ पोर्तुगिजांच्या धर्मबंडाच्या वेळीं ख्रिस्ती धर्मप्रसारकांनीं जाळून टाकल्यानें त्यांत अनेक संस्कृत ग्रंथांप्रमाणेंच मराठी ग्रंथहि भस्मसात् झाले आणि त्यामुळें मधल्या पांच सहा शतकांतील गोमंतकीय मराठी वाङ्मयाचा पत्ता लागत नाहीं. त्यानंतरचा १६ व्या शतकांतील ' श्रीकृष्णचरित्रकथा ' हा कृष्णदास शामा यांचा ग्रंथ इ. सं. डॉ. पिसुर्लेकर यांना सन १९५५ सालीं ब्राग येथें उपलब्ध झाला. ज्यांचें काव्य प्रत्यक्ष पाहाण्यास मिळालें असे कृष्णदास शामा हेच एक प्राचीन ज्ञात कवि असल्यानें सध्या तरी त्यांनांच गोमंतकाचे आद्यकवि मानणें योग्य आहे.

पोर्तुगिजांनीं १६ व्या शतकांत बाटाबाटीच्या कहरांत पहिल्या प्रथम हिंदूंचे अनेक ग्रंथ जाळून टाकले; पण नंतर नवख्रिस्त्यांसाठीं व आपल्या धर्मप्रसाराच्या उपयोगासाठीं जे कित्येक ग्रंथ त्यांनीं महत्प्रयासानें मिळविले ते गोव्यांतील सारे प्राचीन ग्रंथ कित्येक वर्षे रायतूर येथील ख्रिस्ती पाठशाळेंत होते. पुढें ते सर्व पोर्तुगाल येथें नेण्यांत आले. हल्लीं ते ' ब्राग ' येथील सार्वजनिक ग्रंथालयांत आहेत. त्यांतील अनेक महत्वाच्या ग्रंथांचीं डॉ. पिसुर्लेकर यांनीं छायाचित्रें घेतलीं आहेत. ' येव्होर ' येथील सार्वजनिक ग्रंथालयांत देखील असे अनेक ग्रंथ त्यांच्या अवलोकनांत आले. त्या सगळ्यांची भाषा मराठी पण लिपी रोमन आहे. ते मूळचे देवनागरींतील

असून जेजुईत धर्मप्रसारकांनीं रोमन लिपींत त्यांच्या नकला केल्या असाव्या असें डॉ. पिसुर्लेकर यांचें मत आहे.

ब्राग येथील सार्वजनिक ग्रंथसंग्रहालयांत जीं हस्तलिखित बाडें आहेत त्यांत विशेष महत्वाचीं म्हणजे नं. ७७१, ७७२ व ७७३ अशीं तीन असें डॉ. पिसुर्लेकर म्हणतात. पहिल्या दोन बाडांत कोंकणी भाषेंतील पुढील १० ग्रंथ आहेत :– १. रघुनाथाच्या वंसाची कथा, २. दशरथाची कथा, ३. रामाची जन्मकथा, ४. अरण्यकांडाची कथा, ५. पंचवटिकेची कथा, ६. रामायण, ७. रामायण–अ. २ रो, ८. विदुराची कथा, ९. आदिपर्व, १० अस्वमेदु. यावरून १६ व्या शतकांत कोंकणी भाषेंतील ग्रंथनिर्मितीस आरंभ झाला असें दिसून येतें.

सदर संग्रहालयांतील ७७३ नंबरच्या बाडांत पुढील ३० मराठी ग्रंथ आहेत :– श्रीकृष्ण चरित्र कथा, प्रल्हादचरित्र, हरिश्चंद्र पुराण, वसिष्ठयोग, गरुडाची कथा, बाळक्रुडा, राग मल्लार, हरिणीची कथा, वनवासीची जती, दुर्वास भोजन, द्रोणपर्वी महाभारतीय कथा, विराटपर्व, सीताशुद्धि, राजनीतीच्या कथा, भगवद्गीतेची टीका, रामाश्वमेध, शुकदेव चरित्रकथा, गुरु शिष्यसंवाद, मदालसा, रुक्मिणी स्वयंवर, रुक्मिणी सख्यांचे संवाद, धर्माश्वमेध, ताम्रध्वजाचा अवस्वर, कर्णपर्व, सीताहरण, उखाहरण, कृष्णार्जुन संवाद, महिरावणाची कथा, हांबिरु व मृगराजाची कथा.

वाङ्मयाचे प्रमुख प्रकार दोन, गद्य व पद्य. विचाराचा स्वैर ओघ वाहातां वाहातां आपल्यासाठीं जें पात्र निर्माण करतो तें गद्य आणि विचाराच्या प्रवाहाचें नियंत्रण करून तो शोभिवंत वळणांनीं नेण्यासाठीं केलेला पाट म्हणजे पद्य असें म्हणतां येईल. वाङ्मयाचा आरंभ पद्यांतूनच झाला आहे. त्याची वाढ देखील कांहीं कालपर्यंत पद्यांतूनच झाली आहे. केव्हां तरी संस्मरणीय विचार आपोआप गेय स्वरूपांत संभवतो. तो ऐकतांच चमत्कार वाटतो. तो ध्यानांत ठेवावासा वाटतो व तो सहज ध्यानांत राहतोहि.

मुद्रणकलेच्या व लेखनकलेच्याहि शोधापूर्वी जेव्हां ज्ञानसंरक्षणाचा सारा भार स्मरणशक्तीवर पडे, तेव्हां सारें संस्मरणीय वाङ्मय पद्यांतच रचलें जाई. हल्ली गद्यरचनेची वाढ अफाट प्रमाणांत होत असली, तरी पद्यरचनाहि कांहीं बंद नाहीं. पद्य हें मनुष्याच्या आंदोलनाच्या उपजत इच्छेला व्यक्त नि तृप्त करतें. म्हणून पद्याचा उपयोग आतां काव्यापुरता, रमणीय भावार्थाच्या प्रकटीकरणापुरता मर्यादित होऊं घातला आहे; आणि पद्यरचनेचें हें स्थान मर्यादित असलें तरी अढळ आहे.

वाङ्मयांतील इतर सर्व प्रकारांत पद्याचा अर्थात काव्याचा जन्म जसा पहिल्या प्रथम झालेला आहे; त्याचप्रमाणें गोमंतकांतहि सर्वांआधीं काव्यनिर्मितीलाच प्रथमस्थान लाभलेलें असल्यानें गोमंतकीय मराठी साहित्याच्या या इतिहासांत पहिलें स्थान काव्याला देण्याचें ठरवून त्याप्रमाणें गोमंतकीय मराठी काव्याचा इतिहास वाचकांपुढें सादर करण्यांत येत आहे.

कृष्ण चरित्र कथा

'**कृष्णचरित्र कथा**' या गोमंतकीय आद्य काव्यग्रंथाचा लेखक संतकवि कृष्णदास शामा हा आहे. हा मूळ ग्रंथ सध्या उपलब्ध नाहीं. जेजुइत धर्मप्रसारकांनीं रोमन लिपींत करविलेली याची नक्कल तेवढी पोर्तुगालमधील ब्रागच्या ग्रंथसंग्रहालयांतील ७७३ क्रमांकाच्या हस्तलिखितांच्या बाडांत आहे.

कृष्णदास शामा उर्फ सामराज हा गोमंतकांतील सासष्टी महालांतील केळोशी गांवचा गांवकर आणि श्रीशांतादुर्गा देवस्थानचा महाजन होता. यानें आपल्या संबंधींची जी माहिती सदर ग्रंथांत दिली आहे ती अशी :-

वेय संवत्सरीं । राजा शालिवाहातु राज्य करी । चौदाशीं अठ्ठेचाळिसावरी । वरुसें जाहालीं ॥ जो शकु चालता ते वरुसीं । वैशाख मधु–सुधर मासीं । शुक्लपक्षीं त्रियोदशी । आरंभु केला ॥ केळसी ग्राम ब्रम्हपुरीं । जेथें शांतादुर्गा परमेस्वरी । कौशिक गोत्र ऋषि माजारी वरिष्ठ जे ॥ ते गोत्रकुळीं उत्पनु । श्रीरामराजा नंदनु । विष्णुभक्ति परियेणु । नांवें रामराजु ॥ झाला कृष्णाचा दासु । तारावया संसारु गर्भवासु । भक्ति करून ऋषिकेशी । आरंभिला ॥ तो श्रीविठ्ठल देवो आराधिता । प्रसन्न होऊनियां भक्तां । गोविंदस्वरुपें येऊनी माथां । ठेविला करु ॥ म्यां त्याचेनी प्रसन्नपणें । श्रीभागवत पुराण । विस्तारलें सकळइ गुणा । परमात्म्याचे ॥ पंचेचाळीस अध्यायांची टीका । म्यां सांख्येंपें करुनी देखा । सांगितली आइका । श्रुतेजण ॥ सार सार उध्वरुनु । जैसें रत्न घेइजे वेंचुनि । तैसें कृष्णचरित्र काडोनि । केला ग्रथु ॥

संतकवि कृष्णदास शामानें सन १५२६ सालीं केळोशीच्या श्रीशांतादुर्गा देवीच्या देवालयाच्या चौकांत बसून भागवतांतील आख्यानें मराठी भाषेंत लिहिण्यास सुरवात केली. हा कौशिक गोत्री असून त्याचें मूळ नांव निराळें होतें. कृष्णदास शामा हें नांव त्यानें फक्त काव्यनिर्मितीपुरतेंच घेतलें असावें असें दिसतें. लहानपणापासून याचा देवभक्तीकडे विशेष ओढा होता असें दिसतें. काव्यलेखनाची स्फूर्तीहि नैसर्गिक असल्यानें त्याचें काव्य सरस व भक्तिप्रेमानें ओथंबलेलें दिसून येतें.

कृष्णचरित्राशिवाय कृष्णदास शामाचे अनेक अन्य ग्रंथ उपलब्ध आहेत. त्याच्या अश्वमेध व इतर कित्येक ग्रंथांचें कोंकणींत भाषांतर झालेलें आहे. त्याच्या कोंकणींतील ज्या कित्येक कथा सदरील हस्तलिखित बाडांत आढळल्या, त्यांपैकीं काहींकांचीं पिसुर्लेकर यांनीं छायाचित्रें घेतलीं आहेत. हीं आख्यानें मराठींत रचलेलीं असावींत व त्यांचें देखील कोंकणी रूपांतर पुढें जेजुइत पाद्रींनीं धर्मांतर केलेल्या विद्वान् ब्राम्हणांकडून करून घेतलें असावें असें इ. सं. पिसुर्लेकर यांचें मत आहे.

कृष्णचरित्र कथा या ग्रंथाच्या अखेरच्या अध्यायांतील कांहीं ओव्या—

आतां अंतिचा अवसरू । तेथें मियां नमिला श्रीगुरु । जो तमावरी भास्करू । तुर्यु जैसा ॥१॥ तमु लखण अविदेसी । नासावेया अग्न्यान रासी । येकुची श्रीगुरु तयासी । आणिकु नाहीं ॥२॥ कर्णाधारु पाहिजे परिवणा । समुद्र उतरतां जाणां । अथवा मार्गु चालवावा आपणे । प्रकाश मेळे ॥३॥ निराधारेंविणा । आकासासी झोंबे आपणा । निःप्रपंच ब्रम्ह उदासन । कवणा नकळे ॥४॥ म्हणवुनी गुरुसी सरण जावे । आपुलें सर्वस्व द्यावें । तेयाचें हिराउनी घ्यावें । मुक्तिपद ॥५॥ आसें सांगेन पुढील कथा । सुकु सांगे त्या विप्रां समस्तां । म्हणे ऐकाहो रूसी आतां । चित्त देउनी ॥६॥ तो श्रीक्रस्ट्ण परमात्मा । विस्वजनाचा आत्मा । येदिसा देखिला तो तुम्हां । सांगैन आतां ॥७॥ व्यासाचेनि कुमरें । सांगितलें नृपवरा । तीचि कथा अवधारा । सांगैन सकळां ॥८॥ तो म्हणे कौरव नंदना । परियेसीं चित्त देउनी । कैसा देखिला सभाजनीं । आदिपुरूसु ॥९॥ कंसें देखिला काळु । माल देखती बज्र विसाळु । देखे नगर लोकु सकळ । राजा ऐसा ॥१०॥ स्त्रिया देखिला मधनु । गोपाळीं देखिला स्वजनु । वसुदेवें देखिला नंदनु । जन्मकाळींचा ॥११॥ जयाचे देउस्टी चिंतें । राये बैसले होत सांतें । त्याही आपुलेया सत्रास्त्रातें । देखतें झाले ॥१२॥ देव विस्वरूप देखती । योगियें देखिला ध्यान मुहूर्ती । यादवी देखिला परमगती । जें दैव आपुले ॥१३॥ ऐसा परमात्मा देखिला । देखोनि राजे भियाले । मालां जिवीं सुटला । कंपु थोरू ॥१४॥ जन रूपा भुलले । स्त्रियां काम बाण उठिले । मनीं स्नेह उपनले । देवकी वसुदेवा ॥१५॥ योगियें धरिला ध्यानीं । यादवें आनंदु मनीं । देव स्वर्गीं होउनी । जयजयकार केले ॥१६॥ जैसा कां नटधर । तैसे रंगामाजीं दोघे वीर । वस्त्रें भूसणें अलंकार । सोभतें जाले ॥१७॥ देखोनि दोघां तयां । ऐकई पारेखिर्ता राया । नगरांचा लोकु पाहावया । उचलिती माथा ॥१८॥ इंद्रियें करूनी येकमुखें । पाहाती डोळे कौतुकें । देखोनि आदिपुरुस निकें । मदनाचे अवतारा ॥१९॥ परस्परें अनुवदती । नगरलोक येकु येकाप्रति । तया दोघांची पूर्वस्थिती । व्रुतावंतु सकळ ॥२०॥ म्हणती हे विस्वाचे करु । वसुदेवाच्या गृहाप्रती । आयुस्यें करुनी जन्मले हातीं । दोघांहि जण ॥२१॥ जल भूमीसी भरू । करावया तयांचा सहारू । दोगंई परमपुरुस अवतार । घेउनी उठिले ॥२२॥ हा पैलु क्रस्ट्णु सांवळा । रात्रीचि पळवुनि नेला गोकुळा । कंस नेणतां सकळ । वर्तलें काय ॥२३॥ येणें पुतना सोखिली । तृणावंतु मारिला । कालिया दवडिला डोहा पासून ॥२४॥ विमलार्जुनु घातला उन्मळुनु । गोपाळ राखिले वणवेनी । संखचूडाचें कपाळ फोडुनी । मणी हिरला ॥२५॥ सातां वरुसांचा वावरा । इंद्र कोपला गोकुळावरी । तैं राखिलें गोवर्धनु करीं । उचलुनियां ॥२६॥ देखोनि यांच्या स्वरूपातें । गोपिका भुललिया यातें । सांडितेया झालिया दुखातें । संसाराचें या ॥२७॥..................(ओव्या २७३)

इतिस्री भागवते । महा पुराणे । दसमखंडे । परमहंस संहितायां । क्रस्ट्णु चरित्रकथा । नवमदसो अध्याये । स्रि क्रस्णार्पणमस्तु । सुभं भवतु ।

विष्णुदासनामा

सोळाव्या शतकांतील सुप्रसिद्ध संतकवि विष्णुदास नामा याचें काव्य तत्कालीन गोमंतकीयांनां कृष्णदास शामा याच्या काव्याइतकेंच फार प्रिय होतें. हा कवि सोळाव्या शतकांत मध्य प्रांतांत उदयास आला; तथापि त्याचें जन्मस्थान निश्चित् असें कोणी सांगूं शकत नाहीं. त्याचा जन्म मध्यप्रांतांतच कुठें तरी झाला असावा असें कित्येकांचें मत आहे. तर कांहींकांचा समज तो गोव्यांतीलच असावा असा आहे.

हा कवि मध्यप्रांतांत झाला असें कांहींकांचें मत असलें तरी त्याच्या काव्याचा प्रसार गोव्यासारख्या मध्यप्रांतापासून दूर असलेल्या प्रदेशांत झपाट्यानें झाल्यानें तो गोमंतकीयांना दूरचा नव्हता असें कांहीं जण म्हणतात त्यावरून त्यांनांहि तो गोमंतकीय असावा असें वाटत असावें. त्याचें जन्मस्थान कुठलेंहि असलें तरी त्याच्या काव्याची विशेष प्रसिद्धी गोव्यांत झाली. आणि गोमंतकीयांनीं त्याला प्रेमभावानें आपला कवि असें मानलें असें दिसून येतें.

ब्राग येथील ग्रंथ संग्रहालयांत डॉ. पिसुर्लेकर यांनां नं. ७७३ च्या हस्तलिखितांच्या बाडांत जीं काव्यपुस्तकें उपलब्ध झालीं त्यांत विष्णुदास नामा याचीं पुढील कथानकें आहेत :– प्रल्हादचरित्र, हरिश्चंद्र पुराणकथा, भारत विराटपर्व कथा, शुकदेव चरित्र कथा व धर्माचा अश्वमेध. हीं सर्व रोमन लिपींत व मराठी भाषेंत आहेत. कथानकांची भाषा अर्थातच जुनीं आणि काव्यरचना भावनाप्रधान व श्रोत्यांनां समाधान प्राप्त करून देण्याइतकीं फार रसाळ आहे.

विष्णुदास नामा याच्या सदर कथानकांच्या संग्रहांत जो एक अत्यंत महत्वाचा असा काव्यग्रंथ आहे त्यांचें नांव **'भगवद्‌गीतेची टीका'** (निवृत्तेश्वरी) असें आहे.

ज्ञानदेवांप्रमाणेंच त्यांचे वडिल बंधु व गुरु निवृत्तिदेव यांनीं जी भगवद्‌गीतेवर टीका लिहिली तिला ' निवृत्तेश्वरी असें नांव आहे. या टीकेची एक जुनी अष्टाध्यायी प्रत धुळ्याच्या श्रीसमर्थवाग्देवता मंदिरांतील संग्रहांत आहे. तथापि ब्रागच्या ग्रंथसंग्रहालयांतील रोमन लिपींतील निवृत्तेश्वरी अठरा अध्यायी आहे. ती पूर्वी गोव्यांतील रायतूर येथील जेजुइटांच्या कॉलेजमध्यें होती.

निवृत्तेश्वरी ही निवृत्तिदेवाची भगवद्‌गीतेवरील टीका सोळाव्या शतकांत गोव्यांत फार आवडीनें वाचीत. जेजुइट मिशनऱ्यांनीं आपल्या धर्मप्रचाराच्या उपयोगासाठीं सतराव्या शतकाच्या सुरवातीस तिचें रोमन लिपींत लिप्यंतर केलें असावें असें डॉ. पिसुर्लेकर यांचें मत आहे.

मूळ निवृत्तेश्वरी निवृत्तिदेवांनीं लिहिली आणि तिजवरील ओवीबद्ध विस्तृत विवेचन विष्णुदास नामा यानें केलें कीं काय व त्याचेंच मग रोमन लिपींत लिप्यंतर झालें, हें कांहीं समजून येत नाहीं.

रोमन लिपींतील निवृत्तेश्वरीचा आरंभ पुढीलप्रमाणें आहे :–

भगवद्‌गीतेची टीका

पइला नमिला इस्परु । जो ग्रजेचा मनोहोरु । तूं परमपदाचा दातारू । सुळपाणी ॥१॥ तूं अव्यक्तु अपरांपरु । त्रिगुनात्म संकरू । आक्कारु निराकारु । तोजवेना ॥२॥ अस्टादश पुराणं । सारिंगधरु फणो । नेणतो तुजी करणां । चारो वेद ॥३॥ रजोगुणी विस्व स्त्रजिसी । सत्वगुणी पाळिसी । तोमगुनीं सवारिसी । हेळामात्रें ॥४॥ तुजे म्हइमेचें पार । वर्णितां अगोचर । ब्रम्हादिक सुरवर । मुके जाहाले ॥५॥ तूं परा होउनियां परुता । सिदि विद्या बुदि दाता असे अवेक्ता । अनंतरुपा ॥६॥ शैल्या शापरु सोखिती । पांगुळ मेरू उलंगिती । हे परमण गणपती । परपार तुजे सकळें ॥७॥ ऐसा तूं उधारु । न गमे तुजा साखारु । चौदा भुवनांचा आधारु । तूंची एकु ॥८॥ तूं भूतांमाजी रांसी । भूतांवेगळा म्हणविसीं । तुजेवांचोनी परियेसो । कांइची नाईं ॥९॥ एकधां आदिं घालोजे । फुडां बिंदुलीं मेळविजे । त्यासी नांव ठेविजे । ललेकोटि ॥१०॥ ते जर एकु वेगळा किजे । तर सकळइ सुनें म्हणिजे । तैसें तुजवांचुनु बालिजे । विस्वाराया ॥११॥ तुजा पारु पाहतां । सिमलीं शास्त्रें अनंता । तो तुं केवी प्राकुर्ता । होइशु (?) होती ॥१२॥ ऐसा विनविला संकरु । मनीं केला नमस्कारु । करावाजी पतकरु । मज किंकराचा ॥१३॥ आतां वंदुनु गणराजु । जो गौरिचा आत्मजु । एकदंतु चत्भुजु । विघ्नहरणु ॥१४॥ तुजें चरण सुमरण घडे । तर विघ्नांची पडे सांखडे । म्हणती पळूं कवणीकडे । याचे भेणें ॥१५॥ केल्या तुजें ध्यान । स्तीर करुनियां अंतकरण । तर नासे अग्यागपण । खिणामाजी ॥१६॥ जैसा सिआंसी देखुनु गजु । नाईं तरी अग्निमाजी पारजु । तैसा दुरितासी गजंबु । तुजेनी नावें ॥१७॥ जेवीं उदेलेया दिनकरु । नास्ति होय अंदकारु । तैसा संकस्टांचा डोंगरु । विलया पावे ॥१८॥ तूं क्रुपा करिसी । तर कल्पिलें फळ देसी । सकळांमध्यें म्हणविसी । भाग्याचा जी ॥१९॥ तुजे क्रुपा द्रुष्टी । तेथां खंइची अविदा स्तिति । परि पांचासी देईं भिटी । तत्वखेणी ॥२०॥ तुजे क्रुपे दयाळी । करी अग्न्यान रवदळी । व्दइत भावाची होळी । करिसी निमिसें मात्रें ॥२१॥ जया जया गणनायेका । भग्तजणां प्रतिपाळका । रिधी सिधी दायेका । लंबोधरा ॥२२॥ जया जया गजवदना । जया जया मूषकवाहना । जया अग्न्यान नासनां । विकटरुपा ॥२३॥ तूं गणाचा ईसु । चौदा विदेचा फरिसु । तुज नमिलेया महेसु । सोंतोसु पावे ॥२४॥ तुयें जे नेणिती । ते अग्न्यान डोईं पडती । त्यांसी मुका ऐसें म्हणिती । सकळई जण ॥२५॥ तवां प्रसन्न होईजे । मझी प्रकासु देइजे । कल्पना सिधि नेईजे । माझी देवा ॥२६॥ ऐसी परियेसई स्तुति । सोंतोसले गणपती । म्हणे सिद्धि पाऊं जती । तुझे मोनरथ ॥२७॥ आतां विनवीन संतां महंतां । जे परांगत वेदांत सिधांत । तुमचे करुपेद्रुस्टि समस्तां । सिधि फळति ॥२८॥ तुमी ग्न्यानाचे सागर । अनुभवाचे उदार । तुमी चिदानंद निर्भर । सोदोदीत ॥२९॥ आतां स्रीभगवद्‌गोतेचा अभिप्रावो । मराठीयां करीन प्रस्ताव । विनवितुसे निवरुत्तिदेव । यथामती ॥३०॥..................

ओव्या याच पद्धतीच्या असून अध्याय अठरा आहेत.

* * *

समयानंद

गोमंतकीय संतकवि ' समयानंद ' हा सोळाव्या शतकाच्या पूर्वार्धातील कृष्णदास शामा याच्या समकालीन आहे. त्याचें मूळ नांव किंवा गांव याबद्दलचा अजून पत्ता लागत नाहीं. यानें जे कित्येक ग्रंथ रचिले त्यांत विशेष महत्वाचा ग्रंथ म्हणजे **' रुक्मिणी स्वयंवर '** हा होय.

' रुक्मिणी स्वयंवर ' या त्याच्या आख्यानाच्या शेवटच्या अध्यायांत अशा ओव्या आल्या आहेत :- " नाना परीचीं दानें । भटांब्राम्हणांशीं दिधलीं । आनंदलें त्रिभुवन । कृष्ण रुक्मिणी जोडली ॥ " (डॉ. पिसुर्लेकर).

त्याच्या या ग्रंथाचीं एकूण पृष्ठें ३० आहेत.

ब्रागच्या ग्रंथ संग्रहालयांतील ७७३ नंबरच्या रोमन लिपीच्या हस्तलिखित-बाडांत रुक्मिणी स्वयंवर व गुरुशिष्य संवाद असे समयानंदाचे दोन काव्य ग्रंथ रोमन लिपींत असलेले आढळतात.

ज्ञानदेव

समयानंदाप्रमाणेंच या संतकवीचें देखील मूळ नांव व जन्मगांव कळत नाहीं. तत्कालीन पद्धतीप्रमाणें किंवा हल्लीच्याहि कांहीं लेखकांप्रमाणें साहित्य रचनेसाठीं त्यानें जें नांव स्वतःला घेतलें तेंच तेवढें त्याच्या ग्रंथावरून दिसत आहे. वसिष्ठयोगु [योगवासिष्ठ], रागु मल्लारू, द्रोणपर्वी महाभारतीय कथा, कृष्णार्जुनाचा संवाद अशीं ज्ञानदेवाचीं चार ओवीबद्ध आख्यानें सदर ७७३ नंबरच्या बाडांत रोमन लिपींत लिहिलेलीं आहेत. त्यांत विशेष महत्वाचा असा योगवासिष्ठ हा ग्रंथ होय. वसिष्ठयोग ग्रंथांतील आरंभींच्या ओव्या अशा आहेत :-

" ॐ नमो लंब्रोदरा । विघ्न ग्रासक विघ्नेश्वरा । आदि अनादि अगोचरा । आदिपुरुषा ।. " ग्रंथाच्या शेवटच्या ओव्या :- " सकळा सुखी वर्तो सर्व जणु । सकळां परमेस्परी तनुमनु । हाचि पसवो दान । म्हणे ज्ञानदेव ॥१६७॥ एवं अध्याय दाहा. सबंध ओव्या ११४४. इतिश्री वसिष्ठयोगु समाप्त जाहला । शुभं भवतु ॥

नामदेव

' अनादिपुराण ' या काव्यग्रंथाचा कर्ता नामदेव याचें देखील नांव गांव अज्ञात आहे.

सन १५५८ त मिशनरी पाद्रींनीं गोवा बेटांतील एका प्रतिष्ठित हिंदु गृहस्थाच्या घरांतील ' अनादिपुराण ' नांवाचा एक ग्रंथ जप्त करून आणला. (Os Primeiros Livros Maratas Impressos em Goa -डॉ. पिसुर्लेकर).

अनादिपुराण ग्रंथ शंभर वर पृष्ठांचा होता. त्यांतील मंगेश, सांतेरी म्हाळसादेवी या गोव्यांतील देवतांच्या उल्लेखावरून या ग्रंथाचा कर्ता गोवेकर असावा असा डॉ. पिसुर्लेकर यांचा कयास आहे.

गोवा बेटांत त्यावेळीं हिंदूंनां आपले धर्मग्रंथ जवळ ठेवण्यास बंदी होती. त्यामुळें सदर ग्रंथ ज्याच्याजवळ होता त्याला शिक्षा देण्यांत आली.

अनादि पुराण ग्रंथाचा अनुवाद सन १५५९ मध्यें पोर्तुगीज भार्षेत करण्यांत आला. तो अनुवाद त्यांनीं प्रथम कोंकणींत करून घेतला व मग त्याचें पोर्तुगीज भाषांतर केलें असावें असें दिसतें. अनादिपुराण हा ग्रंथहि ब्राग ग्रंथालयांत आहे.

शिवानंद

शिवानंद उर्फ शिवदास हा कवि देखील गोव्यांतींलच असावा असें दिसून येतें. शिवानंद कवीचा ' गरुडाची कथा ' हा काव्यग्रंथ ब्रागच्या ग्रंथ संग्रहालयांतील नं. ७७३च्या हस्तलिखितांच्या बाडांत आहे. त्याचीहि लिपी रोमन व भाषा मराठी आहे.

सतराव्या शतकाच्या आरंभीं जेजुइट मिशनरी पाद्रींच्या उपयोगासाठीं रोमन लिपींत हिंदूंच्या ग्रंथांचीं जीं भाषांतरें करून घेतलीं त्यांत गोमंतकीय व बाहेरीलहि अनेक कवींच्या पुस्तकांचा अनुवाद किंवा हवा तसा संक्षेप करण्यांत आला.

खिस्ती धर्माधिकाऱ्यांस हिंदूंच्या धर्मग्रंथांतील दोषस्थळें समजून घेण्यासाठीं अशा अनुवादांची गरज भासे. त्यांचा उपयोग हे धर्माधिकारी हिंदु पुढाऱ्यांशीं वादविवाद करण्यासाठीं करीत. जेजुइट मिशनरी पाद्रींसाठीं अनुवाद करणाऱ्या गोव्यांतील बाटलेल्या ब्राम्हणांपैकीं मानुयेल दे ओलिव्हैर व पाद्रि आंद्रे व्हाज यांचीं नांवें प्रसिद्ध आहेत. पाद्रि फ्रांसिस्कु रुद्रीगिस् या फिरंगी धर्माधिकाऱ्यास पाद्रि आंद्रे व्हाज हा बाटलेला ब्राम्हण हिंदु धर्माच्या ग्रंथांचे अनुवाद करून देई. त्यांपैकीं बहुतेक हिंदूंचीं पुराणेंच असत. कारण कुत्सित टीका करण्यासाठीं अशा ग्रंथांचा खिस्ती धर्माधिकाऱ्यांस चांगला उपयोग होई.

गोव्यांतील सुसंस्कृत माणसांच्या वाचनांत येणाऱ्या कांहीं मराठी ग्रंथांचेहि संक्षेप पोर्तुगीज भार्षेत जेजुइट पाद्र्यांसाठीं करण्यांत आले. हे अनुवाद सन १५५९ च्या सुमारास सदर मानुयेल द ओलिव्हैर यानें केले असावेत असें दिसतें. त्यांतील एक ग्रंथ ' योगराज टिळक ' हा आहे. (डॉ. पिसुर्लेकर).

ब्रागच्या ग्रंथसंग्रहालयांत डॉ. पिसुर्लेकर यांनां नं. ७७३च्या बाडांत कृष्णचरित्र कथा, प्रल्हादचरित्र, हरिश्चंद्र पुराण, वसिष्ठयोग, गरुडाची कथा, बाळक्रिडा, राग मल्लार, हरणीची कथा, वनवासीची जती, दुर्वास भोजन, द्रोणपर्व, विराट पर्व, सीताशुद्धि, राजनीतिकथा, निवृत्तेश्वरी, रामाचा अश्वमेध, शुकदेव चरित्र, गुरुशिष्य संवाद, मदालसा, रुक्मिणीस्वयंवर, रुक्मिणी सख्यांचे संवाद, धर्माचा अश्वमेध, ताम्रध्वजाचा अवस्वरू, कर्णपर्व, सीताहरण, उखाहरण, कृष्णार्जुन संवाद, वगैरे जीं ३० कथानकें आढळलीं त्यांपैकीं बहुतेक कथानकें गोमंतकीय कवींचीं आहेत.

श्रीमज्जीवोत्तमतीर्थ श्रीपाद वडेर स्वामी

श्रीगोकर्ण मठाचे संस्थापक आणि पीठाच्या परंपरेंतील तिसरे स्वामी श्रीमज्जीवोत्तमतीर्थ यांनीं तीर्थयात्रेंत असतांना भारतांतील चारहि बाजूंच्या विविध तीर्थ क्षेत्रांचा आणि पवित्र स्थलांचा प्रवास केला. या प्रवास-वर्णनाची सर्व माहिती त्यांनीं आपल्या '**तीर्थावळी**' या मराठी काव्यग्रंथांत ग्रथित केली आहे. काव्य अध्यात्मपर व माहितीयुक्त आहे. पीठाचे आद्य संस्थापक श्रीमन्नारायणतीर्थ स्वामी यांचे शिष्य श्रीमद्वासुदेव तीर्थ यांकडून त्यांनां सन १५१७त आश्रम मिळाला आणि सन १५८८ सालीं ते वृंदावनस्थ झाले. आपल्या ७१ वर्षांच्या या कालांत त्यांनीं द्वैतमत प्रसाराचें फार मोठें कार्य तर केलेंच; पण त्याशिवाय आध्यात्मिक बाबतींतहिं त्यांनीं बरेंच वरचें स्थान पटकावलें. ते मोठे विद्वान्, निगृही, कर्तृत्ववान व तपोनिष्ठ होते.

श्रीविठ्ठलभक्त नामदेव यांच्या 'तीर्थावळी' काव्याप्रमाणेंच स्वामीजींचें काव्यहि रसाळ आहे. या ग्रंथाची प्रत श्रीगोकर्ण-पर्तगाळी मठाच्या 'श्रीमदिंदिराकांत ग्रंथ भांडार' या ग्रंथ संग्रहालयांत आहे.

* * *

संत नायकस्वामी

नायकस्वामी हे साक्षात्कारी साधुपुरुष व प्रासादिक संतकवि कुमठा तालुक्यांतील अंत्रवल्ली गांवचे असून त्यांचें नांव मंगेश नायक करंडे असें होतें. कुलदेवाच्या दर्शनासाठीं मंगेशीला येत असतांनां करमल घाटांत संध्याकाळच्या वेळीं एका सिद्ध पुरुषाची भेट घडून त्यांनां वैराग्य उत्पन्न झालें. तसेंच ते मंगेशी येथें आले. श्रीमंगेशाचें दर्शन झाल्यावर त्यांनां फार समाधान झालें, आणि समाधिकालापर्यंत ते तेथेंच ईशचिंतनांत मग्न राहिले. त्यांचें बरेंच काव्य श्रीपूर्णप्रकाशानंदनाथ या नांवानें प्रसिद्ध आहे.

श्रीमंगेश देवाच्या पालखीच्या पेण्यांत म्हणण्यांत येणाऱ्या झुलव्यांची रचना नायकस्वामींचीच आहे. यांनीं शिवगीतेवर मराठी टीका लिहिली असून त्या पुस्तकाची हस्तलिखित प्रत मुंबई विद्यापीठाच्या प्रो. भडकमकर संग्रहांत आहे. ही शिवगीता अनुष्टप छंदांत असून पद्मपुराणांतील संस्कृत शिवगीतेची ती मराठी समश्लोकी आहे.

यांचें बरेंच काव्य आहे, तथापि तें सगळें अजून उपलब्ध नाहीं. उपलब्ध काव्यांतील सदर **शिवगीता व पूर्णप्रबोध चंद्रोदय** हे दोन ग्रंथ विशेष महत्वाचे आहेत

पूर्णप्रबोध चंद्रोदय हा ग्रंथ अन्वय व व्यतिरेक अशा दोन विभागांत विभागला आहे. पहिल्या भागांत चार व दुसऱ्या भागांत पांच असे याचे एकंदर नऊ अध्याय किंवा उपदेश असून ओवी संख्या १८४७ आहे. ग्रंथांतील विषय प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं नमूद केले आहेत. या ग्रंथाच्या प्रारंभींच्या कांहीं ओव्या अशा आहेत : —

तारकब्रम्ह मूर्तिमंत । सस्वरूप सदोदित । ब्रम्हानंद सद्गुरुनाथ । वंदोनि आदीं ॥१॥ पूर्ण-प्रबोध चंद्रोदय । ग्रंथ तत्त्वार्थनिर्णय । करिजेल दावोनि प्रमेय । निगमागमींचें ॥२ गुरुशिष्याचेनि संवादें । तत्त्वमसि महावाक्यपदें । तारकब्रम्हार्थि विशदें । वर्तऊनि देऊं ॥३॥ तरि सद्गुरु सेव नि सर्वांगीं । शिष्यसाम्राज्य कृपापांगीं । पावला यालागीं सलगी । करितो प्रश्न ।४॥ "स्वामी तारक ब्रम्हे पदेशें । हरलें देशाभिमान पिसें । स्वरूपानुभवोल्हासें । सुखियां झालों ॥५॥ आतां स्वामी मानसीं । हेतु कीं वाक्य तत्त्वमसि । योजोनि तारक ब्रम्हेसी । बोधिजे मातें ॥६॥ ऐसी ऐकोनि विनंति । संतोषली सद्गुरुमूर्ति । "प्रश्न केला बरवें युक्ती । बा रे तुवा ॥७॥ या प्रश्नाचें उत्तर । वेदशास्त्रींचें गव्हर । संक्षेपें अर्थ अपार । सांगतों ऐकें" ॥८॥

प्रथमोध्यायाचे शेवटीं कवि लिहितो—"इति-श्री पूर्णप्रबोध । चंद्रोदय ग्रंथपूर्वार्ध । श्रीमंगेशें निरुपिलें तत्पद । प्रथमोपदेशीं ॥"

अशा रीतीनें पुढें दृश्यत्रयानुवाद, त्वंपदार्थ, असिपदार्थ, क्रियोपास्या, समाधिउद्बोध, समाधि सुखानुभव, ग्रंथप्रबोध, तारकार्थेंसि उपदेशविध, परंपराविध असे विषय अध्यायांत कथन केले आहेत.

नाथपंथाचा आणि इकडील संतांचा बराच संबंध आहे. मुकुंदराज, ज्ञानदेव, एकनाथ, तुकाराम यांचे गुरु नाथपंथीच. त्याचप्रमाणें नायक स्वामीहि नाथसांप्रदायीच आहेत. त्यांची गुरुपरंपरा अशी आहे :- आदिनाथ–हरिनाथ–विश्वंभर–गरीबनाथ–आत्मनाथ – ज्योतिनाथ – लीलानंद–कुणपनाथ–चैतन्यनाथ–ईश्वरनाथ–पूर्णानंदनाथ–कुलेश्वरानंद–सहजानंद–ब्रम्हानंद–पूर्णप्रकाशानंद-नाथ (नायकस्वामी).

यांचा काल निश्चित कळत नाहीं, तरी पण इ. स. सतराव्या शतकाची अखेर व अठराव्या शतकाचा आरंभ हा त्यांचा काल असावा असें दिसतें.

वयाच्या उत्तरार्धांत त्यांचें मंगेशीं येथेंच निर्याण झालें. तेथेंच त्यांची समाधी असून पादुकांची पूजा, नंदादीप इ. व्यवस्था मंगेश देव-स्थानातर्फे चालू आहे.

* * *

संत सोहिरोबीनाथ आंबिये

"तेणें मज सहज हा हृदयीं नित्यवेध लाविला ॥धृ.॥ वैराग्य हें आंगीं वसलें । तेव्हां अवघेंचि मिथ्या दिसलें । निजरूप नयनीं बसलें । कोठें नाहीं सुख असलें । एकाएकीं जीव हा परम विश्रांति पावला ॥" श्रीसंत सोहिरोबा-नाथांच्या या आकर्षक पद्यांतील आध्यात्मिक उद्गार बरेच वेधक आहेत. त्यांचें काव्य देखील पारमार्थिक व नित्य वेध लावण्यासारखेंच फार आकर्षक आहे. कवि प्रासादी आपल्या 'भक्त-मंजरी' या काव्यग्रंथांत म्हणतात— "धन्य सोहिरोबा साधु समर्थ । श्रीगहिनीचा अवतार सत्य । तारावया जड जीव असंख्यात जन्मले नाथ भूठायीं ॥"

मराठी काव्यक्षेत्रांत आणि सर्व संतजनांत सोहिरोबानाथांचा अधिकार सर्वमान्य आहे. प्रासादिक कवि आणि तत्त्वज्ञानी संत, ध्येयनिष्ठ साधक आणि योगी सिद्ध, श्रद्धाशील उपासक आणि आत्मानुभवी महात्मा या सर्व दृष्टीनीं सोहिरोबानाथांचें स्थान परमकोटींतील आहे.

संत सोहिरोबानाथांचा जन्म सन १७१४ सालीं पेडणें महालांतील पालिर्ये या गांवांत झाला. गांवची कुलकर्णी वृत्ति त्यांच्या घराण्यांत होती. आठव्या वर्षी सोहिरोबांचें मौजीबंधन झालें. त्या-वेळच्या पद्धतीप्रमाणें मराठी शिक्षणक्रम पुरा करून वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांनीं वडिलो-पार्जित कुलकर्ण-क्षेत्रांत लक्ष घातलें. तथापि कौटुंबिक विभक्तपणामुळें त्यांनां बांदें येथें स्थलां-तर करावें लागून त्यांनीं सावंतवाडी सरकारची तेथील कुलकर्णीपणाची सनद मिळविली. वाडीचे राजे खेमसावंत अल्पवयी असल्यानें त्यांच्यातर्फे त्यांचा चुलता सोमसावंत राज्यकारभार पाही. तो व्यसनी, निर्दय व कडवा होता. कुलकर्ण्या-कडून वसूल वेळींच न आल्यास तो त्याला वाडीच्या सराफकट्ट्यावर नेऊन भयंकर रीतीनें छळी. कांहींकांच्या प्राणाचीहि त्यानें पर्वा केली नाहीं.

सोहिरोबा साधे व सात्विक वृत्तीचे होते. त्यांनां वेतन कमी मिळे; तरी प्रामाणिकपणें काम पाहून गरीबीनें ते प्रपंच चालवीत. अशा इसमालासुद्धां सोमसावंतानें सराफकट्ट्यावर नेऊन वसुलाला एक दिवस जास्त गेला म्हणून तंबी दिली व शिवीहि हांसडली. त्यापुढें नोकरीस कंटाळून सोहिरोबांनीं नोकरींतून निवृत्त होण्याचें ठरविलें. इतक्यांत सोमसावंताला कळलें कीं, सोहिरोबानाथ देवभक्त आहेत. लगेच त्यानें सोहिरोबांनां आपल्याकडे बोलावून वाड्यांतील खोलींत कोंडलें व म्हणाला- "देव दाखव नाहीं तर मरणास सिद्ध हो."

सोहिरोबा गहिंवरले आणि ईशचिंतनांत मग्न झाले. इतक्यांत भिंतींतून ज्वाला निघालेल्या पाहून सोमसावंत घाबरून ओरडला—"पहा हो हें काय तें!" सोहिरोबा डोळे उघडून म्हणाले- "ही ज्वाळा आपल्यापैकीं एकाचा बळी घेतल्या-वांचून राहाणार नाहीं."

सोमसावंत तेथून निसटला, पण विमनस्क स्थितींत! त्याच आठवड्यांत कुडाळ येथें तोफेच्या दारूच्या पिंपावर बसून त्यानें तें पेटवलें व आप-णास जाळून घेतलें.

सोहिरोबांच्या अपमानाची गोष्ट खेमसावंत यांना कळल्यावर त्यांनीं क्षमा-याचनार्थ आपला एक खास कारकून त्यांच्याकडे पाठवून त्यांनां तांतडीनें बोलावलें. सरकारी हुकूम मिळतांच सोहिरोबानाथांनीं आपली देवपूजा आटपून तसेच ते वाडीच्या रस्त्यास लागले. जेवण न झाल्यानें वाटेंत खाण्यासाठीं त्यांनीं एक फणस बरोबर घेतला. बांद्याहून चार-पांच मैल चालून गेल्यावर वाटेंत इन्सुलीच्या जंगलांत ओढ्याकांठीं ते विश्रांतीसाठीं थांबले. त्यांनीं हातपाय धुवून तो फणस फोडावयास घेतला. इतक्यांत सर्वांगाला भस्म फांसलेला एक तेजस्वी संन्यासी 'अलख' म्हणून त्यांच्यामागें उभा राहिला. सोहिरोबांनीं मागें वळून पाहिलें. त्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. त्यांनीं साष्टांग नमस्कार घातला.

"बाबू, हमकू कुछ देता है?" असें विचारतांच सोहिरोबांनीं त्याच्यापुढें तो फणस ठेवला. त्यानें सर्व गरे खाऊन त्यांतील पांच गरे प्रसाद म्हणून सोहिरोबांस देऊन कानांत उपदेश दिला आणि वरदहस्त मस्तकावर

ठेवून तो गुप्त झाला. सद्गुरु भेटीमुळें आपल्याला कोणता अनुभव आला हें त्यांनीं पुढील पदांत सांगितलें आहे :– " सद्गुरुचे कृपेनें झालें मनचि हें तन्मय ॥धृ.॥ दिठीची उफराटी मिठी पडोनि । मीनलें निरामय ॥स.॥ अपरा हारोनि परा मिळाली । उपरति सुख हें अपमेय ॥स.॥ अहं सोहं हें नुरवुनि आलें । मज माजी चिन्मय ॥स.॥ सोहिरा म्हणे मग वाटे आला । हा बरवाचि समय ॥स.॥

तो संन्यासी म्हणजे गहिनीनाथ (गैबीनाथ) होय.

सोहिरोबानाथांचें पद्यवाङ्मय अफाट आहे. ग्रंथसंख्याहि बरीच आहे; पण उपलब्ध ग्रंथ फक्त पुढील सहाच आहेत :–

१ सिद्धांत संहिता— हा काव्यग्रंथ त्यांनीं सन १७४८ सालीं लिहिला. याला सिद्धांत सविता असेंहि म्हणतात. स्वानुभवलेल्या संहित ज्ञानाचा सिद्धांत संस्कृतमध्यें देऊन त्यावर त्यांनीं मराठी टीका लिहिली आहे. यांत ७२९ संस्कृत श्लोक व ४९१५ ओव्या अठरा अध्यायांत आहेत. भाषा साधी सुबोध व रचना रसाळ असल्यानें ग्रंथ लोकप्रिय झाला आहे.

२ अक्षयबोध— हा ग्रंथ सन १७४९ सालीं त्यांनीं सावंतवाडी येथें लिहिला. यांत स्वस्वरूप समाधि राजयोग, स्वस्वरूप अद्वैत, भक्तियोग, स्वस्वरूप वैराग्ययोग, स्वस्वरूप ज्ञानयोग, सद्विवेक योग, स्वस्वरूप विवेक, स्वस्वरूप बोध-लक्षण आणि मुक्तलक्षण निरूपण अशीं आठ प्रकरणें असून ओव्या ४८० आहेत.

३ अद्वयानंद— सन १७४९ सालीं मार्गशीर्ष वद्य प्रतिपदा सोमवारीं त्यांनीं हा ग्रंथ लिहिला. त्याचीं प्रकरणें आठ असून ओवी संख्या ५५४ आहे.

४ महदनुभवेश्वरी— हा ग्रंथ सोहिरोबानाथांनीं सन १७५० सालीं मार्गशिर्ष वद्य एकादशी गुरुवारीं लिहून पूर्ण केला. याचे १८ अध्याय असून ८३७३ ओव्या आहेत. या ग्रंथाबद्दल ' भक्त मंजरींत ' प्रासादी कवि म्हणतात–" अनुभवेश्वरी म्हणती जन । ज्ञानदेवीची प्रतिमा पूर्ण । अनुभव होयें श्रवण पठणें । अवलोकन करिती संत ॥ " यावरूनच त्याचें महत्व व महात्म्य कळून येतें.

५ पूर्णाक्षरी— हा काव्यग्रंथ त्यांनीं सन १७५१ सालीं लिहिला. त्यांत सिद्धीचीं लक्षणें दिलीं आहेत. या ग्रंथाचीं ९ प्रकरणें असून ओव्या ५२९ आहेत.

६ चित्सुखानंद— हा त्यांचा ओवीबद्ध वेदांतपर ग्रंथहि उपलब्ध आहे.

याशिवाय पदें व त्यांचें इतर काव्य मिळून चार हजार संख्या भरेल. हिंदी पदें व बखरवाङ्मय शिवाय निराळें आहे. सोहिरोबानाथांचा पद्यसंग्रह (सं. देशकुलकर्णी), सोहिरोबानाथांचें वाङ्मय (सं. रायकर) इ. पुस्तकांत त्यांचें बरेंच काव्य प्रकाशित झालें आहे.

वयाच्या ६० व्या वर्षी शके १६९६ सालीं ते ग्वाल्हेर येथें गेले. शके १७०१ सालीं त्यांनीं काशीयात्रा केली आणि शके १७१४ च्या चैत्र शुद्ध नवमीस ता. १ एप्रिल १७९२ रोजीं ते गुप्त झाले.

* * *

फा. स्टिफन्स

" जैसी हरळांमाजि रत्नकिळा । कि रत्नामाजि हिरा निळा । तैसी भासांमाजि चोखाळा । भासा मराठी ॥ जैसी पुस्पांमाजि पुस्प मोगरी । कि परिमळामाजि कस्तुरी । तैसीं भासांमाजि साजिरी । मराठिया ॥ पखिआंमधें मयोरु । रुखिआंमधें कल्पतरु । भासांमधें मानु थोरु । मराठियेसि ॥ तारांमधें बारा रासी । सप्तवारांमाजि रवी ससी । यां दिपिचेआं भासांमधें तैसी । बोली मराठिया ॥ " (क्रिस्तपुराण १-१-१२२).

मराठीच्या महाराष्ट्रापासून कितीतरी दूर असलेल्या इंग्लंडमध्यें ज्याचा जन्म झाला, ज्याच्या घराण्यानें मराठीचें नांवहि कधीं ऐकलें नाहीं आणि मराठी म्हणजे काय चीज आहे, याची बालपणीं किंवा विद्यार्थी दशेंत ज्याला कल्पनाहि नव्हती असा एक इंग्रज मनुष्य एका विशिष्ट हेतूनें भारतांत येतो काय आणि मराठीचा अभ्यास करून तिचें पुरेपूर महत्व जाणतो काय ! मोठी कौतुकाचीच गोष्ट आहे.

मराठी मायमाउलीच्या मायेचा व्यापकपणा, माधुर्य नि गोडी खरोखरच असाधारण आहे. ज्ञानदेव चोखोबांपासून शेखमहंमद सगनभाऊंपर्यंत हिचीं भिन्न धर्मानुयायी लेकरें प्रेमानें एकत्र नांदलींच; पण सोळाव्या शतकाच्या उत्तरार्धांत सातां समुद्रांपलकडून आलेला एक खिस्ती धर्मी इंग्रज देखील त्यांच्याच पंक्तींत येऊन अत्यंत आदरानें तिजवर सदरील ओव्यांतून स्तुति सुमनांचा वर्षाव करतो ही गोष्ट मराठी साहित्य भक्तांना निःसंशय अभिमानास्पद आहे.

गोमंतकांतील क्रिस्ती मराठी कवींमध्यें सर्व बाबतींत स्टिफन्सचा क्रमांक पहिला आहे. हा जन्मानें इंग्रज असला, तरी तब्बल चाळीस वर्षे त्यानें गोव्यांतील सासष्टीमध्यें घालविलीं. त्याचें नांव टॉम्स स्टिफन्स, पण पोर्तुगीज लोक त्याला 'तोमास इस्तेव्हं' असें म्हणत आणि हेंच त्याचें नांव गोव्यांत विशेष प्रसिद्ध होतें.

सन १५४९ त इंग्लंडच्या विल्टशायर येथें स्टिफन्सचा जन्म झाला. शिक्षणानंतर सन १५७५ त फादर होऊंच रोममध्यें तो जेजुइट पंथांत प्रवेशला आणि धर्मप्रचाराच्या कार्यासाठीं त्या पंथाच्या प्रमुखानें स. १५७९ त त्याला गोव्यांत पाठवून दिलें. पुढें लवकरच धर्मोपदेशक म्हणून त्याला सासष्टीमध्यें जावें लागलें.

आर्ति द लिंग्व कानारीं आणि दौत्रीन क्रिस्तां या दोन कोंकणी पुस्तकांनंतर तिसरें पुस्तक त्यानें मराठींत लिहिलें तेंच क्रिस्तपुराण. या मराठी महाकाव्याचें पोर्तुगीज नांव 'दिस्कुर्सु सोब्रि अ व्हिंद द जेजुस क्रिस्तु' असें आहे.

क्रिस्तपुराण

पहिलें पुराण व दुसरें पुराण असे या काव्यग्रंथाचे दोन भाग असून त्यांची ओवीसंख्या अनुक्रमें ४१८१ व ६७८१ आहे. सबंध ग्रंथ अर्थात १०९६२ ओव्यांचा आहे. या ग्रंथाच्या आतांपर्यंत पांच संपूर्ण आवृत्त्या निघाल्या आहेत. पहिली सन १६१६ त फादर स्टिफन्सच्या हयातींत रायतूरला प्रसिद्ध झाली. दुसरी स. १६४९ मध्यें रायतूर येथेंच निघाली व तिसरी स. १६५४

त गोवें येथें प्रकाशनांत आली. पुढें सन १९०७ सालीं प्रो. जे. एल. सालदांज्य यांनें मंगळूर येथें चवथी आवृत्ति प्रसिद्ध केली. या चारहि आवृत्त्या भाषा मराठीं असली तरी रोमन लिपींत होत्या. त्यानंतर स. १९५६ सालीं क्रिस्तपुराणाची पांचवी आवृत्ति पुणें येथें प्रसाद प्रकाशनतर्फे प्रकाशनांत आली. हीच पहिल्या प्रथम देवनागरी लिपींत निघालेली आवृत्ति असून तिचे संपादक प्रा. शांताराम बंडेलू हे आहेत.

क्रिस्तपुराणाच्या पहिल्या अवस्वरांत पार्श्व-भूमीच्या ओव्यांत कवि स्टिफन म्हणतो— "सासष्टी देशीं एकें देवमंधिरीं । अस्तमानीं आदित्यवारीं । क्रिस्तावांचे कुमर रितुसरी । दोत्रिणी बैसले ॥ दौत्रिनीचा वेळु सरला । तंव येकु ब्राम्हणु पातला । पाद्री गुरुसि बोलता जाहाला । नमस्कारु करुनु ॥ जि जि ही दौत्रिनो बरवी निकी । करविसी पाठ हिये लोकीं । ग्यावेया परम वोळखी । परमेश्वराची ॥ पण हे दौत्रिनी वांचोनि अन । कांहीं येक आगळें शास्त्रपुराण । जरि आमां करविते पाठण । तरि होतें चांग ॥"

दर रविवारीं पठणांत असणाऱ्या दौत्रिनीनें नव क्रिस्त्यांचें समाधान न होऊन ते म्हणाले— "तुम्हीं आमचीं पूर्वीचीं हिंदु धर्मातील मराठी पुराणें बंद केलींत; पण त्यांनां प्रतिपुस्तकें तयार न केल्यानें आम्हां लोकांनां जुन्या कथा पुन्हां पुन्हां आठवून हृदय भरून येतें. तुम्हीं मराठी भाषेचीं कांहीं भक्तिरसपूर्ण प्रतिपुस्तकें द्याल तर आमचा मनोरथ पूर्ण होईल." [खऱ्या मतप-रिवर्तनानें क्रिस्ती न होतां सक्तीनें लोकांनां बाट-विल्याचा हा एक प्रत्यक्ष पुरावा आहे.]

या त्यांच्या विनंतीवरून फादर स्टिफन्सनें आपलें क्रिस्तपुराण रचलें. यांत बायबलच्या जुन्या व नव्या करारांवर ओवीबद्ध मराठी टीका आहे. रामायण महाभारतादि संस्कृत ग्रंथांवर आधारलेल्या पौराणिक ग्रंथांकडे पहाण्याची लोकांची दृष्टि भाविकपणाची असे. कवि पारमा-र्थिक कार्य म्हणून काव्यरचना करीत आणि श्रोतेहि पारमार्थिक कार्य म्हणूनच तें श्रवण करीत. या क्रिस्तपुराणामागेंहि हीच दृष्टि दिसल्यास नवल नव्हे. हा कवि आपल्या ग्रंथाला परमशास्त्र, देव-ग्रंथ, देवकथा म्हणवितो. त्यांतील कथापठनानें वाचक पुण्यपावन होतील, त्यांच्या पातकांचा नाश होईल, यमांधन तटेल, मुक्ति मिळेल, वैकुंठ लाभेल असेंहि आश्वासन देतो.

हिंदु कर्त्यांची कविता व क्रिस्तपुराण यांचा काव्यहेतु विहंगम दृष्टीनें एकच आध्यात्मिक दिसला; तरी क्रिस्तपुराण काव्याचा अंतस्थ हेतु वेगळा आहे. क्रिस्तीधर्मतत्त्वांच्या मंडणाबरोबरच हिंदुधर्मतत्त्वांचें खंडण करण्याकडे त्याचा रोख आहे आणि म्हणूनच हिंदु सनातनी लोकांचा क्रिस्तपुराणावर रोष आहे. श्रोत्यांच्या मनांत देवाविषयीं भक्तीबरोबरच भीति उत्पन्न व्हावी असाहि एक त्यांत कवीचा हेतु आहे.

क्रिस्तपुराणाचा आधारग्रंथ म्हणजे बायबल. जगदुत्पत्ति, वंशावळी, प्रलय यांचीं भरघोस वर्णनें या पुराणांत आहेत. याच्या प्रथम भागांत ज्यू लोकांच्या अतिप्राचीन इतिहासांतील प्रमुख शास्ते, योद्धे, संत आणि सम्राट यांच्या चरित्रांचें कथन आहे. व उत्तरार्धांत जेजुक्रिस्तासारख्या धीरोदात्त हुतात्म्यांचें उदार चरित्र रेखाटलें आहे. या पुराणग्रंथांत क्रिस्तागमनावर व क्रिस्तचरित्रावर प्रकाशझोत कायम ठेवून मुळांतल्या अन्य घटना-प्रसंगांचा तदनुरोधानें संकोच विस्तार केलेला दिसून येतो.

" जैसें मेरुफुडां पर्वत इतर । कीं सिंधुफुडां

उदकाचे पाजर । कीं गजमताफुडां खर । दिसती जैसे ॥ कीं सैंधुचियें वाळुकेसि । लवणाची पुंजी जैसी । तुजी फौज दिसे तैसी । माजे फौजेफुडां ॥ जैसी नवरत्नांचेआ हाराफुडारीं । हिण धातुचि रासि थोरि । कि कवडियांचेआ पुंजा मोहरीं । मुक्तांचेआ माळा ॥ सुर्याफुडां खंदुतांचे भार । कि सिंहाफुडां जंबुक अफार । कि राजहंसासामोर । असंख्य काक जैसे ॥ "

क्रिस्तपुराणांतील या कल्पना व संकेत खास भारतीयच दिसतात. यावरून प्रा. प्रियोळकर यांच्या म्हणण्याप्रमाणें हें पुराण लिहितांनां कवींपुढें योगवासिष्ठादि भारतीय ग्रंथ होतेच यांत संशय दिसत नाहीं.

या पुराणकर्त्यानें उपसंहारांत काव्याची भाषा व त्याचा रचनाकाल यांचा असा निर्देश केला आहे–

" जेजु स्वामी भक्तांचा कैवारी । जदीं जन्मु घेतला संसारीं । वरुसें सोळा सेतें चौतर्दसवेरि । तैंलागोनि जाहालीं ॥ तो संखु चालते वरुसीं । वसंतकाळीं वैशाखमासीं । देवग्रंथु मराठियेसि । अभंगु केला । "

ग्रंथ समाप्त करतांनां कवि म्हणतो—

" जेणें होइजे परम ग्यानी । तो प्रबंदु दाविला पुराणस्थानीं । वैकुंठिंचा निजपंथु दाउनि । केला प्रघट ॥ जयाची न करितां भक्ति । सर्वथा न मेळे मुक्ति । तेया जेजु स्वामीयाची कथाविस्पति । निरोपिली मियां ॥ "

फादर स्टिफन्स याचें क्रिस्तपुराण सन १६१६ मध्यें रोमन लिपींत छापून प्रसिद्ध झालें आणि त्यानंतर तीनच वर्षांनीं स. १६१९ सालीं हा कवि निधन पावला. ***

फा. करुवा

क्रिस्तपुराणांत नवीन क्रिस्ती धर्मासंबंधींची माहिती आहे. तथापि हिंदुधर्म कां सोडावा याबद्दल त्यांत प्रभावी असें कांहीं सांगितलें नाहीं हें लक्षांत घेऊन क्रिस्ती गुरुकुलाचा रेक्टर (प्राचार्य) म्हणून फा. स्टिफन्सच्या जागेवर आलेल्या येतियेन द ला करुवा या फ्रेंच पाद्रीनें (स. १५७९–१६४३) सेंट पीटरपुराण लिहिलें.

पीटरपुराण

सेंट पीटर (सां पेद्रु) हा कोंकण भागांत येऊन कोंकणी [हिंदु] लोकांच्या देवदेवतांचे खंडण करतो असें या पीटरपुराणांत दाखविलें आहे. या ग्रंथाचीं तीन पुराणें [विभाग] असून त्यांतील पहिल्यांत पीटरची माहिती, दुसऱ्यांत हिंदु देव व चालीरीति यांवर कठोर हल्ला आणि तिसऱ्या पुराणांत खरा देव म्हणजे क्रिस्त असें दाखविलें आहे. या ग्रंथाच्या अंदाजें पंधरा हजार ओव्या आहेत.

" भास मराठी घडित ओवियांचे " असें ग्रंथाच्या गद्य प्रस्तावनेंत कवीनें लिहिलें आहे. त्याच प्रस्तावनेंत पुढें तो क्षमायाचना करतो कीं– " शब्दा अखेरा आणि वोवियाचेआ घटिताठाईं जी चुकी, भेदु पडला असेल, इतुक्याचा अपराधु मज परदेसिया फ्रिंगियासि तुमीं ख्येमा करावा लागे. "

पीटर पुराणाला पोर्तुगीजमध्यें Etienne de la Croix. Discursos Sobre a vinda do Apostolo S. Pedro असें अभिधान आहे. अर्थात् सेंट पीटरच्या आगमनावरील प्रवचन.

हा काव्यग्रंथ गोर्वे बेटांत 'काझ प्रॉफंस'मध्ये स. १६३४ त छापून प्रसिद्ध झाला. याची मूळ प्रत लिज्बोअ येथें सरकारी ग्रंथालयांत आहे. डॉ. पिसुर्लेकर यांनीं याची मायक्रोफिल्म घेतली आहे. गोव्याच्या सरकारी ग्रंथालयांतहि याची एक अपुरी प्रत आहे.

या ग्रंथांतील ओव्यांची रचना अशी आहे:— "ऐसें जिवीं बोले पार्वती । मग पातला म्हएसु पति । तव म्हणे त्या प्रती । वंदोनि चरण ॥ आहो जी स्वामिआ अवधारीं । तुमीं घरीं न्हवतीवेरी । तुमचेनि धर्मे आपकरी । पुत्रु आकारिला म्यां ॥ म्हएसु म्हणे, आगे पार्वती । मी घरीं न्हवतां तुजा पति । तुज लाधली पुत्र-प्राप्ति । नेणों कैसी ॥ ऐसी बोले आहो स्वामि । माजी प्राप्ति नेणति तुमीं । सांगेन कैसी अउपमि । अवधारा ॥ येके दिवसीं घेऊनि निर । प्रख्याळुं गेलीं शेरीर । तेआ अंगमळिचेआ कुमर । प्रसवलीं मी ॥

***

फा. आंतोनियु साल्दांज्य

हा कवि (१५९८-१६६३) पोर्तुगीज असून त्यानें जो मराठी ओवीबद्ध ग्रंथ लिहिला त्याचें नांव सांत आंतोनीची जीवित्वकथा असें आहे.

सांतु आंतोनीची जीवित्वकथा

हा ग्रंथ ओवी वृत्तांत मराठी भाषेत असून कोंकणींत गद्य स्वरूपांत निराळा आहे. ओवीबद्ध ग्रंथ स. १६५५ त रोमन लिपींत प्रसिद्ध झाला. त्याचें प्रा. प्रियोळकर यांनीं देवनागरींत संपादन केलें व १९५६ सालीं मराठी संशोधन मंडळातर्फे प्रकाशन झालें. त्यांतील कांहीं ओव्या अशा— " नमन माझें परमेस्वरा । स्वर्गस्रुस्टिचेआ रचणारा । क्रुपासिंधु करुणाकरा । मुग्तिराया ॥ नमो मरिये स्वामिणी । तूं स्वर्ग संसाराची राणी। सास्टांगें तुज्या चरणीं । प्रणिपातु माजा ॥ तुज्या देवपुत्राचें वरुदान । मज देवविजे सतिग्यान । तुझें करपेस्तव सांगेन । सांतु आंतोनिची कथा ॥ "

जीवनवृक्षाचें फळ

हाहि एक साल्दांज्य याचा मराठी ओवीबद्ध हस्तलिखित ग्रंथ स्कुल ऑफ ओरिएंटल स्टडीज-मध्यें लंडनला असल्याचें कळतें. याची मायक्रोफिल्म मराठी संशोधन मंडळांत आहे.

+++

फा. मानुयेल द नोरोंज्य

हा पाद्री कवि सांखवाळ येथील असून गोवा बेटांत राहात होता. त्यानें जो ग्रंथ लिहिला त्याचें नांव 'क्रिस्ताचें यातनागीत' असें आहे.

क्रिस्ताचें यातनागीत

हें पुस्तक स. १९५९ सालीं नागरी लिपींत लिप्यंतर करून प्रा. प्रियोळकर यांनीं मराठी संशोधन मंडळातर्फे प्रसिद्ध केलें आहे. त्यांतील आरंभीच्या दोन ओव्या अशा आहेत— " कृपेंभरिते दुखेस्ती माते । कविआसि रित होती । क्रुपेचा वरु धीरु आधारु । तुजेपासीं मागती ॥ पण आतां तुज पाहातां । एवढ्या दुःखांच्या सागरीं । वरुधान मागावे या वाहातीं । डोळे यां रुधन-दुःखाचिया झरी ॥ "

क्रिस्तपुराणाखेरीज सदरील अन्य काव्यग्रंथांत मराठीवरील विशिष्ट प्रेम असें कांहीं दिसत नाहीं. अंतरंग तर सगळ्या ग्रंथांचें एकच व तें म्हणजे क्रिस्ती धर्माचा प्रचार !

***

विठ्ठल नरसिंह सांखोळकर

कवि विठ्ठल नरसिंह सांखोळकर हे पेडणें महालांतील केरी गांवचे असल्यानें त्यांनां विठ्ठल नरसिंह केरीकर असेंहि म्हणत. हे कवि सोहिरोबानाथांच्या समकालीन आहेत. यांची जन्मतिथि निश्चित् कळत नाहीं; तथापि ते सन १७१५ सालीं जन्मले व सन १७८९ सालीं कालवश झाले असें काव्यसंग्रहांतील व इतर माहितीवरून समजून येतें. विठ्ठल नरसिंहांचा केरी गांव आणि संतकवि सोहिरोबानाथांचा पालिंयें गांव हे एकमेकांनां लागून असल्यानें उभय कवींच्या वरचेवर भेटीगांठी होत असत. त्यावेळीं पेडणें महाल सावंतवाडी संस्थानच्या ताब्यांत होता. दरबारांतील व इतर कामासाठीं इकडच्या लोकांनां वाडीस जावें लागे. केरीकरहि अधून मधून तिकडे जात. वाढत्या परिचयामुळें यांचीहि वर्णी दरबारपर्यंत लागली होती. राजे तिसरे खेमसांवंत (सन १७५५–१८०३) यांच्या कालांत आंध्र–कवि गोपाळ कुंदावोइझल यांनीं 'सावंतविजय' नांवाचें जें एक संस्कृत काव्य लिहिलें त्याचें मराठी ओवीबद्ध भाषांतर सन १७८१ सालीं कवि विठ्ठल नरसिंह साखोळकर यांनींच केलें. [सावंतवाडीचा इतिहास पृ. ९४]

शुक रंभा संवाद— कवि साखोळकर यांचें पहिलें ओवीबद्ध पुस्तक हेंच होय.

कबीर कथा— हें साखोळकर यांचें दुसरें काव्य–पुस्तक आहे.

वामन चरित्र— विठ्ठल नरसिंहांचें हें तिसरें पुस्तक असून त्यांतील आध्यात्मिक ओव्यांतून कांहीं ठिकाणीं राजकारणाच्याहि गर्भित अर्थाची छटा चमकते.

सावंत विजय— मूळ संस्कृत काव्याचें हें मराठी ओवीबद्ध भाषांतर आहे. हें काव्य-पुस्तक राजाज्ञेवरून सन १७८१ सालीं कवि साखोळकर यांनीं लिहिलें. या पुस्तकाची ओवी-संख्या ९०७ आहे.

विठ्ठल कवींची काव्यरचना सुबोध व सुरस असून शब्दयोजना वेधक आहे. यांचीं स्फुट काव्यें अनेक आहेत. त्यांत ओवीबद्ध काव्य आहे, तसेंच आर्याबद्धहि आहे. श्लोक आहेत तसेंच दिंडी, साकी अशींहि वृत्तें आहेत. पदें, आरत्या, भूपाळ्याहि त्यांच्या स्फुट काव्यांत दिसतात. त्यांची सुप्रसिद्ध व अमर भूपाळी म्हणजे 'घनःश्याम सुंदरा' ही होय. सन १९५९ पर्यंत ही भूपाळी 'होनाजी बाळा' या पेशवाईच्या उत्तरार्धांत पुणें शहरांत गाजलेल्या शाहिराची असा लोकांचा समज होता. तथापि स. १९६० सालांत तिचा खरा कर्ता कवि विठ्ठल नरसिंह साखोळकर हाच असल्याचें एक गोमंतकीय कवि श्री. दामोदर अच्युत कारे यांनीं 'लोकसत्ता' दैनिकांतून पुराव्यानिशीं सिद्ध केलें. पणजी येथील एक साहित्यप्रेमी सद्गृहस्थ वै. शिवा फटू पै आंगल यांनां महामाय कामत यांच्या दप्तरांत मिळालेल्या सन १८७३ सालच्या एका हस्त-लिखित काव्यसंग्रहांत पृ. १५० वर 'पदें विठ्ठल नरसिंह' या विभागांत 'पद दुसरें' म्हणून

लिहिण्यांत आलेली 'घनःश्याम सुंदरा' ही भूपाळी दिसली. त्यांनीं दोन वर्षेपर्यंत या विषयाच्या विचारांत आणि विठ्ठल नरसिंह व होनाजी बाळा यांचा काल निश्चित करण्यांत घालवलीं. पुढें भूपाळीच्या अंतरंगाचा अभ्यास करून हें प्रकरण काव्याचा निष्कर्ष कसा काय निघतो याबद्दलचें मत ठरविण्यासाठीं कवि कारे यांकडे सोपविलें. त्यांनीं केरीकर व होनाजी यांची काव्यरचना, अंतरंग, काल इ.च्या अभ्यासानें निश्चित ठरवलें कीं, "या भूपाळीचा कर्ता विठ्ठल नरसिंह हाच आहे." आणि अशा रीतीनें या अमर भूपाळीचा खरा कर्ता उघडकीस आला. ती भूपाळी अशी आहे :

घनःश्याम सुंदरा—

घनःश्याम सुंदरा माधवा अरुण उदय झाला। उठिं लवकर वनमाळी उदयाचळीं मित्र आला ॥धृ॥ सायंकाळीं एके मेळीं द्विजगण बहुपक्षी। प्रातःकालीं उडुनि तापसी तीर्थपंथ लक्षी ॥ करुनि सडासंमार्जन गोपिका कुंभ घेऊनि कुक्षीं। यमुनाजळासि जातां मुकुंदा दध्योधन भक्षी ॥ उठिं लवकर गोविंदा आनंदकंदा सांवळ्या। मुख प्रक्षालुनि अंगिकारिं उपचार बावनहि कळा ॥१॥ घरोघरीं दीप अखंड त्यांच्या सरसाउनि वाती। गीत गाति गोपिका नंदसदनासि येति जाती ॥ प्रवर्तुनि गृहकाम रंगमाळा घालूं पाहति। आनंदकंदा प्रभात समयीं उठ सरली राती ॥ काढिति धारा क्षीरपात्रें धेनू हंबरताती। द्वारिं उभे गोपाल तुजला हांक मारूं पाहति ॥ सुमनहार वनमाला कंठीं लेयीं गुंजमाळा। हातीं वेतकाठी बरवा कांबळा घेईं काळा ॥ जगजीवना मधुसूदना मनमोहना जगत्पाला। क्षुधित बहु वासरें धेनुच्या स्तनिं पान्हा आला ॥२॥ स्नान करुनि उषःकाळीं गोपिका अलंकारें नटती। कुंकुमादि चंदन चर्चुनि मथनालागिं आरंभिती ॥ प्रेमभरित अंतरांत वदनीं नामावळी जपती। अर्घ्यदान देऊनि द्विधां मग देवार्चन करिती ॥ कर्मनिष्ठ वैष्णव विष्णूतें पूजा समर्पिती। शक्त्यनुसार शिवार्चन शक्तिसी आराधुनि बसती ॥ ऋषिगण किन्नर आश्रमवासी निरांजनिं ध्याले। अरुण उदय होतांचि आपुल्या कर्मिं मग्न झाले ॥३॥ विद्यार्थी विद्याभ्यासास्तव सादर गुरुपायीं। अध्यापन गुरु करवि शिष्यां आनंद उत्साही ॥ याज्ञिक द्विजजन कुंडीं आहुती टाकितातिं पाही। सिद्धिस्तव बळराम गोधनासह वृंदावनिं जायी। मुनिजनमानसहंसा गोपीकमलमनभृंगा। मुरहर पंकजपाणी कमलनयना श्रीरंगा ॥ विठ्ठल नृसिंह जपतो अखंड हृदयिं नाममाला। उठिं लवकरि वनमाळी उदयाचळीं मित्र आला ॥४॥

* * *

तुकारामबाबा वर्दे

कवि कृष्णदास शामा यांचा शोध लागेपर्यंत गोमंतकांतील तिसवाडीच्या जुवें येथें वास्तव्य करणारे तुकारामबाबा वर्दे हेच गोमंतकाचे आद्य कवि असा समज होता. पेशव्यांच्या दरबारांत फिरंग्यांचे वकील म्हणून चमकलेले वर्दे वालावलकर यांचेच वंशज आहेत. बाबांचा जन्म सन १५७२ च्या सुमारास झाला. वयाच्या ३८ व्या वर्षी म्हणजे सन १६१० त यांनां काव्यस्फूर्ति झाली. तुकारामबाबा आध्यात्मिक वृत्तीचे होते. यांची कविता बरीच असली; तरी प्रकाशित अशी

अवघीच आहे. सर्व काव्य अलंकारिक व प्रासादिक आहे. प्रकाशनांत आलेले त्यांचे काव्यग्रंथ असे आहेत :—

महाराष्ट्र सारस्वत पुष्पमाला— या पुस्तकाची पहिली आवृत्ति कधीं निघाली हें निश्चित समजत नाहीं, पण नवी आवृत्ति १९४० सालीं प्रकाशनांत आली. या आवृत्तीचे संपादक व प्रकाशक श्री. सदानंद ल. कापडी हे होत. पुस्तक फार सुंदर आहे.

सुभाषित रत्नावली— भर्तृहरीच्या शतकत्रयाचें मराठी भाषेंतील हें समश्लोकी भाषांतर आहे. वामनपंडितांच्या पेक्षांहि बाबांच्या या भाषांतराचें आकर्षण विद्वद्वर्यांनां अधिक वाटेल.

यांच्या कित्येक स्फुट कविता कुंभारजुवें येथें निघणाऱ्या 'सत्संग' मासिकांत आल्या आहेत.

" भर्तृहरीच्या शतकत्रयावरील मराठी समश्लोकी या ग्रंथाचीं जुनीं नऊ हस्तलिखितें पाहिलीं, त्या प्रत्येकांत कर्त्याचा निर्देश ' तुका ब्रम्हानंद ' असा असून तो साताऱ्याकडील आहे " असें प्रा. प्रियोळकर म्हणतात. (प्रस्तावना— आजचा व कालचा गोमंतक). अर्थात हा ग्रंथ तुकारामबाबा वर्दे यांचा नसून ' तुका ब्रम्हानंद ' यांचा असल्याचें त्यांचें मत दिसतें. तुकारामबाबा वर्दे यांच्या वंशजांपैकीं फोंड्याजवळच्या कपिलेश्वरी येथील महिपतराव वर्दे वालावलीकर यांच्या दप्तरांतील एका हस्तलिखित बाडांत त्यांचा सदर हस्तलिखित ग्रंथ होता. त्या ग्रंथाच्या पहिल्याच पानावर कर्त्याच्या जागीं ' तुकाराम वर्दे ' अशीं अक्षरें असून तो इ. सं. वामनराव वर्दे वालावलीकर यांनीं हस्तगत केला होता. आतां तो यांच्याच संग्रहांत असावा. त्यावरून कांहीं अधिक माहिती मिळण्यासारखी आहे. बाकी प्रियोळकरांच्या सदर मुद्यावरून तुकारामबाबांनीं तो ग्रंथ लिहिला नाहीं. असें मात्र म्हणतां येणार नाहीं. कारण ग्रंथ हा एकच असला तरी त्याचे कर्ते वेगवेगळे असणें असंभवनीय नाहीं. ***

रघुनाथ शेणवीं

कोंकणाख्यान काव्यग्रंथास जन्म देणारा हा कवि मूळचा सासष्टी येथील असून कौशिक गोत्री सारस्वत ब्राम्हण असल्याचें या पुस्तकाच्या प्रस्तावनेंतच करंडे शास्त्री यांनीं लिहिलें आहे. यानें पहिल्या प्रथम बरेंच स्फुट काव्य लिहिलेलें असावें असें दिसतें आणि त्यानंतर पर्यटन करतां करतां गोमंतकांतील तत्कालीन सामाजिक परिस्थितीनें वेध घेतल्यानें स्वयंस्फूर्तीनें त्यानें कोंकणाख्यान ग्रंथास जन्म दिला. " करितां पृथ्वी पर्यटन । पाहिलें शिवपुर पावन । तेथ भेटले स्वज्ञाति जन । त्यांनीं आक्षेप जो केला ॥ त्याच्या आक्षेपा कारणा । सांगितलो हे पूर्व रजना । कळावया सकळा जनां । सांगितली संपूर्ण यथास्थिति । महा मंगल मधूमासीं । शुक्लपक्षीं श्रीरामनवमीशी । भानुवासर पुष्य नक्षत्रेंसि । कोंकणाख्यानासि संपविलें ॥ शके सोळाशें त्रेचाळिसी । प्लव नाम संवत्सरासि । आणि उत्तम उत्तरार्धासि । म्हणोनि ग्रंथासि संपविलें ॥" यावरून शिवपूर येथें राहून कवीनें हा ग्रंथ लिहिला व पुरा केला असें दिसतें. हें शिवपूर म्हणजे शिरोडें असावें असा इतिहासज्ञांचा कयास आहे.

कोंकणाख्यान— या काव्यग्रंथाचे पूर्वार्ध व उत्तरार्ध असे दोन विभाग असून त्यांचे एकूण अध्याय सोळा आहेत. प्राचीन कथन, सासष्टी महिमान, तिसवाडी वृत्तांत, ऐक्य दर्शन, देश-त्रय वर्णन, वृद्धि विस्तार, गोत्रप्रवर दिग्दर्शन, दैवत स्थलांतर असे आठ अध्याय पूर्वार्धाचे आणि पेडणेकर–कुडाळदेशकर, बार्देशकर–शेणवै-पैकीं, राजापुरी–भालावलीकर–अवसरे, कोंकणे व शेणै नामाचीं कारणें, विरोध, ज्योतिषी व पद्ये, संतमहिमान इ. आठ अध्याय उत्तरार्धाचे. सन १७१४ सालीं स्मार्त–वैष्णव व त्यांतील पोटभेद प्रकरणी जी चळवळ सुरू झाली तिला सन १७२१ त विशेष जोर चढला आणि त्या प्रसंगीं कोंकणाख्यानाचा जन्म झाला. शके १६४३ त अर्थात् सन १७२१ त हा ग्रंथ लिहिण्यांत आला. बरींच वर्षे हा हस्तलिखित स्वरूपांतच होता. पुढें वे. शा. सं. रा. वा. नायक करंडे शास्त्री यांनीं तो संपादला आणि कै. श्रीपाद व्यं. वागळे यांनीं मुंबईच्या इंदुप्रकाश मुद्रणालयांत मुद्रित करवून शके १८३१ त म्हणजे सन १९०९ सालीं प्रकाशनांत आणला. आकार क्राउन पृ. ९०, मूल्य आठ आणे.

***

आचार्य महेश्वरभट्ट सुखठणकर

हे विद्वान् कवि माशेल येथील असून संस्कृत, तसेच मराठीहि बरेच ग्रंथ यांनीं लिहिले आहेत. त्या सर्वांत खालील पांच ग्रंथ प्रमुख आहेत :—

अमरकोश टीका— सन १७५० सालीं लिहिलेली अमरकोशावरील ही मराठी टीका फार उत्कृष्ट वठली आहे.

मंत्रभागवत टीका— मोरोपंतांच्या मंत्र भागवतावरील ही टीका बरीच प्रसिद्ध आहे.

गीत गोविंद— जयदेव कवींच्या गीत गोविंद काव्याचें हें विवरण रसिकांना फार आवडलें आहे.

वाक्सुधा— श्रीशंकराचार्यांच्या वाक्सुधे-वरील विवरणात्मक पानपात्रचषक.

सिद्धांत चंद्रिका— सिद्धांत कौमुदीचें पद्यमय मराठी भाषांतर.

***

हरि पंडित

वेलिंग येथील श्रीलक्ष्मी–नृसिंह देवाचे उपासक हरि पंडित यांचें जन्मठिकाण निश्चित कळत नाहीं; तथापि वेलिंग येथेंच त्यांचें दीर्घकाल वास्तव्य होतें. त्यांनीं श्रीलक्ष्मी–नृसिंह स्तुति, लक्ष्मी स्तोत्र व कांहीं अभंगहि लिहिले आहेत. पण त्यांचें सुप्रसिद्ध काव्य म्हणजे मुक्तामाला.

सुवृत्त मुक्तामाला— सन १७५० सालीं त्यांनीं वेलिंग येथील श्रीलक्ष्मी–नृसिंह देवाल-याच्या चौकावर बसून हें काव्य लिहिलें. पंडितांनीं या काव्यग्रंथांत छंदशास्त्राचें विवेचन फार सुंदर केलें असून त्या शास्त्रासंबंधींची माहिती सुबोध व सरळ रीतीनें दिली आहे.

***

रामचंद्र मल्हार सुखठणकर

पेशवाईंत गाजलेले रामचंद्र मल्हार सुखठण-कर हे विनीचे मुत्सद्दी, शूर व राजकार्यधुरंधर म्हणून इतिहासज्ञांनां माहीत आहेत; पण ते एक प्रतिभासंपन्न कवि होते याची मात्र अगदीं थोड्यां-नांच माहिती असेल.

सोळाव्या शतकारंभीं क्रिस्तीकरणाच्या धुमा-कुळास त्रासून जीं कुटुंबें गोव्यांतील केळोशी येथून निघून गेलीं त्यांत सुखठणकरांचे आजोबाहि होते. ते सावंतवाडीस जाऊन तिकडील आरवली गांवचें त्यांनीं कुलकर्ण स्वीकारलें. त्यांचा थोरला मुलगा मल्हार रेगे हेच रामचंद्ररावांचे वडिल. आरवली येथें सन १६७९ त रामचंद्र रेगे यांचा जन्म झाला. मराठी आणि संस्कृत शिक्षण घेतल्यानंतर वडिलांच्या कुलकर्णी वृत्तीचा त्यांनीं स्वीकार केला. पुढें कांहीं भानगडीमुळें त्यांनां सन १७१० त ती नोकरी सोडावी लागली आणि ते तडक गोव्यांत आले.

कवळें येथें श्रीशांतादुर्गा देवस्थानांत कांहीं दिवस मुक्काम करून कुलदेवीची मनोभावें सेवा केल्यानंतर त्यांनीं साताऱ्याचा रस्ता धरला आणि पुढें पुणें येथें त्यांचा पेशवे सरकारांत प्रवेश झाला. नैसर्गिक कुशल बुद्धीमुळें लवकरच ते पेशवाईंत शूर मुत्सद्दी म्हणून प्रसिद्धीस आले. श्रीमंत नानासाहेब पेशवे व सदाशिवराव भाऊ यांनां राजकीय लेखनाचे, शौर्याचे व राजनीतीचे धडे यांनींच दिले. शिंदे सरकारचें राज्य स्थापन करण्याचें आणि पुढें शिंद्यांच्या राज्यविस्ताराला स्थैर्य प्राप्त करून देण्याचें सर्व श्रेय रामचंद्रबाबा सुखठणकर यांनांच आहे.

इंदूर, कलबुर्गा, खेड, सांगोलें, भालकी वगैरे प्रदेशांतील लढाईंत स्वतःच्या तरवारबहादुरीनें यांनीं मोठा विजय मिळविला. श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनां फार मोठा मान देत. बाबांच्या निधनामुळें नानासाहेबांनां फार दुःख झालें. त्यांनीं दहा दिवस सुतकहि पाळलें. पेशवाईची तत्कालीन अंतर्बाह्य जडण घडण करणारे म्हणून यांची इतिहासांत फार प्रख्याती आहे.

रामचंद्र बाबांनीं कवळें येथेंच श्रीशांतादुर्गा देवालयांत आपलें पहिलें काव्य लिहिलें. आरव-लीची कुलकर्णी वृत्ति सोडून ते आरंभीं गोव्यांत कवळ्याला आले आणि देवीच्या सेवेंत मग्न झाले. नेहमींप्रमाणें एके दिवशीं एकवीस प्रदक्षिणा पुऱ्या करून देवीचें मुखावलोकन करीत चौकावर बसल्यावेळींच त्यांनां काव्यस्फूर्ति झाली. त्यांनीं ज्या आपल्या पहिल्या काव्यास जन्म दिला त्याचें नांव 'श्रीशांतास्तुति' असें आहे.

श्रीशांतास्तुति— हें लहानसेंच ओवीबद्ध काव्य आहे. यांतून परिस्थितीच्या फटकाऱ्यांनें गांजलेल्या कवीनें देवीची अनन्य भावानें प्रार्थना केली असून प्राप्त स्थितींतून सुमार्ग दाखविण्या-बद्दल करुणा भाकली आहे. काव्य हृदयस्पर्शी आहे. त्यांच्या भावनेनें अल्पावधींतच त्यांनां त्यांच्या उत्कर्षाचा मार्ग देवीनें दाखविला व ते साताऱ्याकडे निघाले.

सुभद्राहरण— हें बाबांचें दुसरें काव्य. हें कथाकाव्य भावनात्मक असून त्याचीं प्रकरणें लहान लहान आहेत. प्रसंगवर्णन करतांनां त्यांतून प्रगट झालेली आध्यात्मिकता वेधक आहे. काव्याच्या अखेरीस कवि म्हणतो— "ही कथा विमल व दिव्य असून तिच्या श्रवण पठनानें श्रोत्याला ज्ञान प्राप्त होईल व त्याला परमगति मिळेल."

सुदाम चरित्र— हें तिसरें काव्यहि कथात्मकच असून त्यांतून कवीची पारमार्थिक दृष्टि स्पष्ट दिसते. या चरित्राच्या उपसंहारांत कवि म्हणतो— "वर्णितां हरियशा शुभवाचीं। बंधनें तुटती आशुभवाचीं ॥" हें चरित्र प्रभूच्या भक्तवत्सलतेचें प्रतीक आहे या भावनेनेंच कवीनें त्याची रचना केली आहे. काव्याच्या अखेरीस तो म्हणतो—"म्हणोनि गातों गुण यादवाचा। जो अंबु तापत्रय या दवाचा ॥ नामस्मरें त्यासि उरे न माया। तो ठाव सर्वत्र जगा नमाया ॥" हें व सुभद्राहरण हीं उभय काव्यें भागवताच्या आधारें रचण्यांत आलीं असून त्यांवर भक्तीची छाया बरीच पसरली आहे.

श्रीज्ञानेश्वर— हें देखील एक लहानसें कथाकाव्यच असून भावनाप्रधान असें आहे.

कंसमर्दन— रामचंद्रबाबांचें हें पांचवें काव्य. हेंहि कथात्मकच आहे; पण पहिल्या तिन्हीं कथाकाव्यांहून याची रचना जरा निराळी दिसते. या काव्यास आरंभीं आध्यात्मिकतेचा संपर्क असला; तरी पुढें पुढें त्याच्यावरील राजकारणी छटा स्पष्ट दिसतात. बाबांच्या उपलब्ध पांचहि काव्यांत हेंच तेवढें एक राजकारणी असें दिसतें व तें वाचतांनां कवीच्या राजकारणी चातुर्याचें कौतुक वाटतें. तथापि दुर्दैव असें कीं, तें वाळवीच्या भक्ष्यस्थानीं पडलेलें असल्यानें अक्षरें स्पष्ट दिसत नाहींत. * * *

शुभानंद

या कवीचें नांव सुबा अनंत असें असून तो दक्षिण गोमंतकांतील काणकोणच्या परिसरांतील असावा असें दिसतें. याचीं खालील दोन काव्यें उपलब्ध आहेत.

भीष्मपर्व — महाभारतांतील भीष्मपर्व कथानकावर याची ओवीबद्ध रचना आहे.

उद्योगपर्व — यांत उद्योगपर्वावर काव्यरचना केली आहे. * * *

सखोबा नाईक

गोपीचंदाख्यान— सखोबांचें गोपीचंदाख्यान प्रसिद्ध असून मयशक्तिचरित्र, उषास्वयंवर, महाबळ चरित्र अशींहि त्यांचीं काव्यपुस्तकें आहेत. * * *

आत्मारामानंदनाथ

सुभाषित रत्नावलि— संत नायकस्वामी यांचा हा शिष्य असून त्याचें निवासस्थान अंत्रुजमध्येंच होतें. सुभाषित रत्नावलि हा त्यांचा पहिला ग्रंथ असून याशिवाय चार पांच किरकोळ पुस्तकें आहेत. यांचे अनेक स्फुट अभंग आहेत व त्यांपैकीं कित्येक संतकाव्यसंग्रहांत प्रसिद्ध झाले आहेत. + + +

व्यंकटकवि

व्यंकटकवि हा नायकस्वामी उर्फ प्रकाशानंदनाथ यांचा प्रशिष्य म्हणजे आत्मारामानंदनाथ यांचा शिष्य आहे. हा अंत्रूज महालांतील रहाणारा असून त्याचा कुलदेव मंगेश व गोत्र कौंडिण्य होतें. 'नमामि शंभु कुलदैवतं मे' असें एका काव्यांत कवि म्हणतो. पहिल्या वेदस्तुतींत व्यंकटानें आपली गुरुपरंपरा दिली असून शेवटीं 'इति वेदस्तुतीची हे श्रुतदीपटीका असी। व्यंकटाख्यमुखें केली आत्माराम सदाशिवें॥' असा मजकूर आहे. मांगिरीशस्तोत्र या काव्यांतील कवीच्या 'इति श्रीमांगीशस्तोत्र बदर्योपनामक व्यंकटशर्मेनकृत" या शेवटच्या उल्लेखावरून व्यंकटकवीचें आडनांव बद्री असल्याचें दिसून येतें. हल्लीं या उपनांवाचे गोव्यांत कोणी नसले तरी नंदगड व बेळगांवला आहेत. क्रिस्तीकरणाच्या कालांत गोव्यांतून ते तिकडे गेले असणें संभवनीय आहे.

श्रीमांगिरीशस्तोत्र, श्रीशांतादुर्गास्तुति, योगवासिष्ठसार, उत्तरगीता अशीं त्यांचीं चार काव्य काव्यपुस्तकें प्रकाशनांत आलीं असून पंचपथानुभव, विवेकसिंधु टिप्पण, वेदस्तुति, ब्रम्हस्तुति अशीं चार हस्तलिखितें उपलब्ध आहेत. शिवाय म्हाळसाकांतस्तुति, भैराळस्तुति, मार्तंडस्तुति, कुलदैवतस्तुति, म्हाळसास्तुति वासुदेवस्तव अशींहि त्यांचीं अनेक काव्यपुस्तकें असल्याचें कळतें.

पंचपथानुभव— सगळया उपलब्ध ग्रंथांत सर्वांत मोठा ग्रंथ हाच आहे. अन्वय व व्यतिरेक असे या ग्रंथाचे दोन भाग आहेत. अन्वय या पूर्वार्धाच्या १४७५ ओव्या, संमत श्लोक ६८, टीका ५६, अंतिक १ व प्रारंभीं स्तवनार्थ श्लोक ५ मिळून संख्या १६०५ असल्याचें शेवटीं नमूद आहे. व्यतिरेक या उत्तरार्धाच्या ओव्या २७०३, संमत श्लोक २०२, टीका १९५, अंतींची ओवी १ एकूण संख्या ३१०१ असेंहि त्याच्या शेवटीं लिहिल्याचें आढळतें. पूर्वार्ध व उत्तरार्ध मिळून संख्या ४७०६.

"या ग्रंथाचें अभिधान। पंचपथानुभव जाण। ज्यासि स्वहितप्रयोजन। त्याणें स्वीकार करावा॥ संवत्सर सर्वजित। शक तेथें सोळा शत। येका उणे नवदा आंत। ग्रंथोदय पैं झाला॥" या त्यांच्या ओव्यांवरून शके १६८९ (सन १७६७) सालीं हा ग्रंथ समाप्त झाला असें दिसतें आणि त्यावरून त्या कवीचा कालहि ठरवितां येतो.

विवेकसिंधु टिप्पण— हा व्यंकटकवीचा दुसरा मोठा ग्रंथ. या ग्रंथांतील कांहीं आरंभींच्या ओव्या अशा आहेत— "श्रीमांगीशमहारुद्राय नमः। श्रीशांतादुर्गाजगदंबायै नमः। श्रीसांबसदाशिव आदिनाथाय नमः। श्रीआत्मारामसद्गुरुमुकुंदराजाय नमः॥ अगुणाय गुणाढ्याय स्वच्छायानंदरूपिणे॥ शुद्धाय स्वप्रकाशाय श्रीराममुनये नमः॥१॥टीका॥ निर्गुण गुणसंपन्न निर्मळानंदरूप जो॥ स्वयंप्रकाशशुद्धात्मा श्रीराममुनि त्या नमो॥१॥ अपार संसारसमुद्रमग्नजीवालिसंतारणकारणाय॥ यः प्रादुरासीत्पुरुषोऽविनाशी तं रामचंद्रं मुनिमानितोस्मि॥२॥टीका॥ संसारांबुधिमग्नजीव अलितत्संतारणाकारणें॥ जो प्रादुर्भवला पुरुषस्वयमेवात्मा च शाश्वतपणें॥२॥"

शेवटचे चरण— "ऐसा हा गद्यरूपें अनुभव रचिला ज्ञानसिंधू मुकुंदें॥ तट्टीका देशभाषा स्फुरउनि रचिली तत्कृपेच्या प्रसादें॥ याचा भावार्थ चित्तीं दृढ अनुभवितां तत्त्वमस्यार्थ लाधे॥ आत्मारामार्पणीं हें अमुं मन तनु वाक् व्यंकटाख्यें अभेदें॥"

* * *

संत श्रीकृष्ण जगन्नाथ भट बांदकर

पणजीपासून नऊ दहा मैलांच्या अंतरावर डोंगरी नांवाचें एक लहानसें गांव आहे तेथेंच बांदकर यांचें वास्तव्य असे. तेथील जगन्नाथ भटजी नांवाचे सात्विक, कर्मनिष्ठ व श्रीविठ्ठल-भक्त ब्राम्हण हेच यांचे वडिल होत. साधारण मराठी व संस्कृत असें अल्प शिक्षण असतांहि बांदकरांनीं पुढील आयुष्यांत ज्या प्रतिभासंपन्न काव्यास जन्म दिला तें पाहिलें म्हणजे फार कौतुक वाटतें.

संतकवि श्रीकृष्णभट बांदकर यांचा जन्म आषाढ शु. ११ शी शके १७६६ (सन १८४४) रोजीं झाला आणि आश्विन वद्य प्रतिपदा शके १८२४ (सन १९०२) रोजीं त्यांचें देहावसान झालें. अवघें ५८ वर्षांचें आयुष्य त्यांनां लाभलें, पण तेवढ्याच अल्पकालांत मराठी साहित्याची त्यांनीं भरीव सेवा केली. त्यांचें बहुतेक सारें काव्य अध्यात्म विषयावरील व उपदेशपर आहे. त्यांची वृत्ति पारमार्थिक असल्यानें भजन, पुराण, प्रवचन, कीर्तन यांतच त्यांचा बराच काल जाई. त्यांचा शिष्यवर्गहि बराच होता. कीर्तनाचीं अनेक आख्यानें त्यांनीं स्वतः रचलीं आहेत. त्यांनीं कित्येक पौराणिक नाटकेंहि लिहिलीं असून स्वर्गीय अण्णा किर्लोस्कर हे त्यांचेच नाट्यशिष्य होत. स्वात्मतत्त्वामृतशतक, व्यासवरदान, शतश्रीगां-वरदान, तुलसीपत्रसंधान, हास्यमुक्ति, यागकांड, यात्राकांड, चंपिकासुमतीस्वयंवर, उपकेतुस्वयंवर, पिंगलाख्यान, दुर्वासभोजन, नागरिकोपदेश, सुगुणाख्यान, गुणवत्याख्यान अशीं त्यांचीं अनेक काव्यपुस्तकें आहेत. याशिवाय आठशेंवर रसाळ पदें आहेत. त्यांचा प्रथम ग्रंथ व समग्र कविता-संग्रह त्यांचे एक शिष्य कृष्ण जगन्नाथ थळी यांनीं मुंबई येथें प्रकाशीत केलेला आहे.

स्वात्मतत्त्वामृत शतक — हा श्लोकबद्ध ग्रंथ असून श्लोकसंख्या १०१ आहे. याची रचना फार बहाराची आहे. अध्यात्मासारखा गहन विषय यांत फार सुलभ करून सांगितला आहे. त्यांतील एक श्लोक— " सुखाची जी इच्छा त्यजुनि वळ मार्गें परतुनी । स्थिरत्वानें राहीं सुखमय निजात्मा समजुनी ॥ उठों नेदीं वृत्ती सहज सुख येईल उदया । तदाकारें घोटीं स्फुरत सुख जें आपण तया ॥ "

संतकवि बांदकर यांच्या स्फुट काव्यग्रंथांतील एक पद—

" जय जय रघुवीर समर्थ माझा ।ज०। वारिल सकल भय तारिल दृढ निश्चय ॥धृ.॥ कामक्रोधा-दिक षड्रिपु नुरउनि । पुरवुनि मनोरथ करिल आनंदमय ॥ज०॥१॥ भक्तांसाठीं कळकळ मोठी । पाठीं पोटीं रक्षुनियां दाविल आत्मउदय ॥ज०।२॥ विष्णु कृष्ण जगन्नाथचि तो जेथें तेथें आत्म नेटें भेटेल स्वसुखमय ॥ज०॥३॥ "

बांदकर यांच्या अभंगसंग्रहांतील एक अभंग–

" धन्य धन्य धन्य सज्जनांचा संग । ज्ञान-भक्तिरंग रंगावया ॥१॥ रंगावया मन चैतन्य-स्वरूपीं । नाहीं दुजा ओपी ज्ञान ऐसें । २॥ ज्ञान ऐसें जागे, जेयाचे हृदयीं । नित्य त्याचे पायां ठेवूं माथा ॥३॥ ठेवूं माथा अहंकार निरसोनी । सेवा संपादुनी राहूं तेथें ॥४॥ राहू तेथें मन सर्वदा विश्रांती । संसाराची खंती आठवेना ॥५॥

त्यांची गौळणकाल्याची नवी रचना व पदें तर कौतुक करण्यासारखींच आहेत.

* * *

संतकवि मुकुंदराज भट बांदकर

संत श्रीकृष्णभट बांदकर यांचे हे चिरंजीव. आपला मुलगा श्रीरामभक्त निपजावा, त्यानें रामप्रभूंचें गुणगान करावें, जनतेलाहि रामभक्तीकडे वळवावें अशी श्रीकृष्णभटजींची उत्कट इच्छा होती, आणि त्या त्यांच्या इच्छेनुरूप घडत असलेलें मुकुंदराजांचें वर्तन पाहून ते कृतार्थ झाले. मुकुंदराजांचीं रामभक्ति, त्यांचें भजन पूजन, पुराण कीर्तन तर वेधक असेच; पण त्यांचें काव्यहि प्रतिभासंपन्न व फार आकर्षक आहे. त्यांचें वक्तृत्व परिणामकारक आणि गायन मनोवेधक असल्यानें श्रोतेजन त्यांच्या कीर्तनांत फार रंगून जात. त्यांचें पुराण व प्रवचनहि लोकांना फारच प्रिय असे. "मुकुंदराजा ! तूं प्रिय माझा । लावीं देह तुझा रामभक्तिकाजा ॥" या वडिलांच्या पद्यमय उपदेशाप्रमाणें कवि मुकुंदराजांनीं तनुमनधनानें जनतेंत रामभक्तीचा प्रचार व प्रसार करीत आपला देह सार्थकीं लावला.

कवि मुकुंदराज यांचें काव्य रसाळ व गोड आहे. त्यांची अभंगरचना जशी वेधक तशी पद्यरचनाहि आकर्षक आहे. त्यांचीं निरनिराळीं पन्नासपेक्षां अधिक पदें असलीं, तरी '**बांदकर समग्र कविता संग्रहांत**' फक्त चाळीसच प्रसिद्ध झालेलीं असून आरती, गजर असें कांहीं किरकोळ काव्यहि त्यांत आहे. '**श्रीरामाचीं पदें**' या पद्यसंचयांतील सातव्या क्रमांकाचें पद असें आहे—"जाऊं चला पाहूं रघुराया या या या तुम्हीं ॥धृ०॥ प्रीति धरा रामीं । साधन हें नामीं । त्रिजगाचा जो स्वामी । या या या तुम्हीं ॥१॥ गुंतु नका कामीं । प्रभु नेईल सुखधामीं । अर्पित या देहा मी । या या या तुम्हीं ॥३॥ ठेविल आरामीं । ब्रीदचि हें रामीं । कृष्णसुतांतर्यामीं । या या या तुम्हीं ॥४॥

मुकुंदराजांनीं जे कांहीं काव्यग्रंथ लिहिले त्यांत '**श्रीगुरुबोध**' ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहे. एकूण नऊ प्रकरणांत हा ग्रंथ पूर्ण झालेला असून त्याची एकंदर ओवीसंख्या २३७ आहे.

नवव्या प्रकरणाच्या शेवटीं कवि लिहितात — "अठराशें पंचवीस शकोत्तरीं शोभन नाम संवत्सरीं । पौष्यमासामाझारीं । आज्ञा केली ॥ रविवार शुक्र द्वितीया दिनीं । द्वितीयावस्थेमाजी प्रगटुनि । प्रेमें बोलिले मजलागुनी । काय करिसी॥ मी बोलिलों काय करावें । मज कांहींच न कळे स्वभावें । श्रीगुरु बोलिले उठावें । मी सांगतों ॥ म्हणती गुरुबोध लिहावा । मी कथितों आईक बरवा । पाहिलें मुखाकडे तेधवां । हास्य केलें ॥ इतुक्यांत जागा झालों । चोहोंकडे पाहूं लागलों । फार आश्चर्य पावलों । मनामाजी ॥ दौत लेखणी घेतली । डोळ्यांपुढें अक्षरें दिसलीं । तींच असती म्यां लिहिलीं । माझीं नव्हे ॥ नकळे प्रश्न सांगणें । नाहीं व्युत्पत्तीचीं लक्षणें । सद्गुरुखुणेवांचुनी नेणें । आणिक मी ॥ मी प्रेरकाचा लेखक । म्हणे मुकुंदराज बालक । तेचि विश्वयंत्राचे चालक । सद्गुरुनाथ ॥ इति श्रीगुरुबोध ग्रंथ । श्रवणें लाभे मोक्षपंथ । मननाभ्यासें श्रीभगवंत । हृदयीं भेटे ॥

* * *

शिवरामशास्त्री सुखठणकर

माशेल येथील कवि शिवरामशास्त्री सुखठणकर यांचें काव्य भारदस्त स्वरूपाचें आहे. त्यांच्या काव्य ग्रंथांत **'वेदांतचुडामणी-समश्लोकी'** 'आणि **संध्यामंत्रार्थदीप**' हे दोन ग्रंथ अधिक महत्वाचे आहेत.

+ + +

माधव चंद्रोबा डुकले

माधव चंद्रोबा डुकले यांची जन्मभूमि कळंगूट ही असली, तरी त्यांची कर्मभूमि मुंबई हीच होती. मुंबईला त्यांचा स्वतःचा शिला छाप खाना होता आणि त्यांतून 'सर्व संग्रह' नांवाचें त्यांचें काव्यमासिकहि निघत असे. प्राचीन मराठी काव्याचें संशोधन करून तें शुद्ध स्वरूपांत छापण्याची महत्वाची कामगिरी या मासिकानें सतत आठ वर्षे (सन १८६० ते १८६८) केली. माधव चंद्रोबा स्वतः एक चांगल्यापैकी कवि होते. त्यांनीं जे विविध काव्यग्रंथ छापून प्रकाशनांत आणले त्यांत खालील ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहेत:—

१ **बालक्रीडा अभंग**-पृ. ११४, प्रकाशन शके १७८४.

२ **तुकारामाचे अभंग**- पृ. ७८४, शके १८६६. यांतील अभंगांची निवड छान आहे.

३ **रामदासांचे अभंग**- पृ. १९५, शके १८६८. यांत शेवटीं कांहीं कठिण शब्दांचे अर्थहि दिले आहेत.

४ **विराट पर्व**- मुक्तेश्वर कृत अभंग पृ. ८१, श. १८६७.

५ **श्री एकनाथ काव्य**- पृ ६१, शके १८६४. काव्य साधें आहे.

६ **मोरोपंत काव्य**- पृ. ५०, श. १८६५, हें काव्य आर्याबद्ध आहे.

७ **प्राकृत कविता संग्रह**—लेखक, मुद्रक व प्रकाशक- मा. चं. डुकले, पृ. ७९७

८ **नलाख्यान**- (मोरोपंती काव्य) पृ. २८, श. १८६२, रचना हृदयवेधक आहे.

९ **महाभारत आदिपर्व**- (कथा काव्य) पृ. २१५, मूल्य १ रु.

१० **महाभारत सभापर्व**- (कथा काव्य) पृ. २४८, मूल्य १॥ रु.

११ **कोदंड राम**- ओवीबद्ध सुबोध रामचरित्र मूल्य १ रु.

१२ **रामायण**-ओवीबद्ध कथा काव्य. पृ. ३०० मूल्य १॥ रु., शके १८६८.

१३ **गीता भाष्य**- मूळ संस्कृत श्लोक व खालीं ओवीबद्ध भाष्य.

१४ **राधा माधव**-हें काव्य श्लोकबद्ध असून रचना सुबोध व सुरस आहे.

१५ **द्रौपदी स्वयंवर**-यांतील ओवीची रचना रसाळ व गोड असून आकर्षक अशी आहे. संपूर्ण काव्य ओवी वृत्तांतच आहे. एकुण ओवी संख्या ५४०.

१६ **श्री दामोदर स्तवन**- प्रस्तुत पुस्तक छोटें असलें तरी समर्थांच्या मनाच्या श्लोकांची झांक यावर पडलेली असून रचना मनाला भिडणारी आहे.

+ + +

मि. सुब्राय लक्ष्मण नायक

सद्गृहस्थ पुढारी, वृत्तपत्रकार आणि आर्यवैद्य अशा अनेक बाजूंनीं गतकालांत लोकप्रिय झालेले मि. सुब्राय लक्ष्मण नायक हे कवि होते ह्याची अनेक लोकांनां कल्पनाहि नसेल. तथापि ते एक प्रतिभासंमन्न कवी व गायनांचे शौकी होते ही वस्तुस्थिति आहे. त्यांची जन्मभूमि मडगांव, पण जवळच्या ओंडली येथें सन १८८२ सालीं त्यांनी **'गोवा मित्र'** नावांचें मासिक पत्र सुरू केलें आणि स्वतःच्या खर्चानें वर्षभर चालविलें. या पत्रांत त्यांच्या कांहीं कविताहि प्रसिद्ध झाल्या आहेत. यांची दोन वतंत्र काव्य पुस्तकें प्रसिद्ध झाल असून पहिल्याचें नांव **'श्रीनृसिंहस्तुति'** व दुसऱ्याचें नांव **'त्रिमतोपन्यास'** असें आहे.

श्रीनृसिंहस्तुति–हें क्रॉउन १६ पानी आकाराचें २४ पृष्ठांचें पुस्तक असून त्यांत त्यांनी आपल्या श्रीनृसिंह कुलदेवाच्या स्तुतिपर अशा सुबोध ओव्या लिहिल्या आहेत. ओव्यांची रचना आध्यात्मिक व भक्तिरसपूर्ण आहे. हें पुस्तक शके १८३३ सालीं रामतत्त्व प्रकाश (बेळगांव) छापखान्यांत छापून प्रसिद्ध झालें होतें. पुस्तकाचें प्रकाशक अनंत नारायण पै वेर्णेकर हे असून ' किंमत फक्त पठण ' असें पुस्तकांत लिहिलें आहे.

त्रिमतोपन्यास-- शके १८३४ सालीं अनंत ना. वेर्णेकर यांनीं सदर रामतत्त्व छापखान्यांतच हें पुस्तक छापून घेऊन लेखक महाशयांसाठीं प्रसिद्ध केलें. प्रसिद्धी स्थान मडगांव. या पुस्तकाची पृष्ठसंख्या ९४ असून किंमत ५ आणे आहे. हेंहि पुस्तक काव्यमय असून काव्यरचना मार्मिक पण रसाळ आहे.

* * *

लक्ष्मण पांडुरंग नागवेकर

कवि लक्ष्मण पांडुरंग नागवेकर हे सासष्ट महालांतील असले तरी त्यांनीं जीं दोन काव्य पुस्तकें प्रसिद्ध केलीं तीं दोन्हीं बार्देशच्या म्हापशें येथून. त्यांचें पहिलें पुस्तक ' भजन तरंगिणी ' व दुसरें ' श्री रामजन्म '

भजनतरंगिणी--हें काव्य पुस्तक सन १८९१ सालीं प्रसिद्ध करण्यांत आलें. याचीं पृष्ठ ९४ व किंमत ६ आणे होतीं. अभंग भक्तिरसपूर्ण होते.

श्रीरामजन्म— ही रामजन्मावरील काव्य कथा असून सन १८९२ त रामनवमीदिवशीं या पुस्तकाचें प्रकाशन झाल्याचें लिहिलें आहे; पण प्रकाशन स्थळाचा उल्लेख दिसत नाहीं. कदाचित तो मुखपृष्ठावर किंवा मलपृष्ठावर असावा. तथापि तीं फाटलेली आहेत. दोन्हीं पुस्तकें अति जर्जर स्थितींत पणजीच्या सरकारीं वाचनालयांत तीन वर्षांमागें पहाण्यास मिळाली होतीं. * * *

जयराम आसगांवकर

श्रीदत्तपदामृत-कवि आसगांवकर यांच्या या पुस्तकांत दत्त महाराजांचीं कित्येक पदें, भूपाळ्या, स्तुति व स्तोत्र आहे. पुस्तकाचा आकार डेमी १२ पानीं असून तें बेळगांवच्या रामतत्व छापखान्यात शके १८३२ सालीं छापून प्रसिद्ध केलें आहे. पृष्ठ ९०, किंमत ६ आणे.

* * *

राघोबा प्रभु देसाई

पेडणें येथें वास्तव्य करणारे कवि राघोबा देसाई यांचीं दोन काव्यपुस्तकें उपलब्ध आहेत. त्यांचें पहिलें पुस्तक '**बक्षीबहाद्दरांचा पोवाडा**'. हा छोटा पोवाडा मुंबई येथें मनोरंजन छापखान्यांत छापून प्रसिद्ध करण्यांत आला. आकार काउन सोळा पानी, पृष्ठें १२ व किंमत एक आणा. यांचें दुसरें पुस्तक '**अनेकार्थ ध्वनि मंजिरी**' हें होय. हें पुस्तक म्हणजे '**आर्या कोश**'.

* * *

वैकुंठ राम प्रभु देसाई

कवि वैकुंठ राम प्रभु देसाई यांनीं तुळशीस्तोत्र व मध्वविजय अशीं दोन काव्यपुस्तकें लिहिल्याचें ऐकिवांत आहे; पण त्यांपैकीं प्रकाशनांत आलें तें फक्त 'मध्वविजय' काव्य.

मध्वविजय— सन १९०७ सालीं फोंडें येथें रायचंद्र न. शेणवी यांनीं 'मध्वविजय' पुस्तक प्रसिद्ध केलें. त्याचीं पृष्ठें २८ असून किंमत ४ आणे होती. हें पुस्तक खानापूर येथें धनंजय छापखन्यांत दत्तात्रेय गोविंद सडेकर यांनीं छापलें होतें.

* * *

शिवराम महादेव प्रभु आसगांवकर

हे म्हापसें येथें राहाणारे; पण पुढें यांचें वास्तव्य मुंबईला झालें. त्यांनीं दोन काव्यें लिहिलीं. पैकीं एक 'श्रीदत्त भजनामृत' व दुसरें 'हिंदुस्थानचा इतिहास.'

श्रीदत्त भजनामृत— हें पुस्तक आसगांवकर यांनीं कारवारच्या महंमदन प्रिं. प्रेसमध्यें छापून स. १८९९ सालीं प्रसिद्ध केलें. याचीं पृष्ठें ९९ व किंमत १२ आणे होती.

हिंदुस्थानचा पद्यात्मक इतिहास— हा इतिहास कवीचे बंधु शंकर महादेव आसगांवकर यांनीं मुंबई येथें श्रीलक्ष्मीनारायण प्रेसमधून छापून घेऊन १९०४ सालीं तेथेंच प्रसिद्ध केला. या पुस्तकाचीं पृ. ६६ असून किंमत ५ आणे होती.

* * *

विश्राम लक्ष्मण कोरगांवकर

पेडणें महालांतील कोरगांव हें यांचें मूळ गांव, पण वास्तव्य मुंबईलाच असे. 'कर्णचरित्र व जरासंध अशीं यांनीं दोन काव्यपुस्तकें लिहिलीं.

कर्णचरित्र— हें पुस्तक कोरगांवकर यांनीं मुंबई येथें निर्णयसागर छापखान्यांत छापून घेऊन प्रसिद्ध केलें. त्याची पृ.सं. ८५ व किं. ३ आ. होती.

जरासंध— हें काव्य-पुस्तकहि सदर निर्णयसागर छापखान्यांत छापून घेऊन मुंबईलाच स. १८९४त प्रकाशनांत आणलें. याचीं पृ. १६० व किंमत ४ आणे होती.

\+ + +

पांडुरंग दादाजी उर्फ पांडोबा कैसरे

अंत्रूज महालांतील फोंडें येथील रहिवासी क. पांडोबा कैसरे यांनीं कांहीं काव्य पुस्तकें लिहिल्याचें कळतें; पण प्रकाशनांत आलेलें त्यांचें एकच काव्य म्हणजे 'द्रौपदी स्वयंवर.' हें पुस्तक त्यांनीं मुंबई येथील निर्णय सागर छापखान्यांत छापून प्रकाशनांत आणलें. त्याचीं पृष्ठें ८० व किंमत ४ आणे होती.

* * *

विश्राम लक्ष्मण कोरगांवकर

पेडणें महालांतील कोरगांव हें विश्राम लक्ष्मण यांचें मूळ गांव; पण त्यांचें वास्तव्य व्यवसाया-निमित्त मुंबईलाच असे. कर्णचरित्र व जरासंध अशीं यांनीं दोन काव्य पुस्तकें लिहिलीं.

कर्णचरित्र—हें पुस्तक निर्णय सागर छापखान्यांत छापून प्रसिद्धीस आलें. याचीं पृष्ठें ८५ व मूल्य ३ आणे होतें.

जरासंध— हें काव्यहि लेखकानें सदर छापखान्यांतच छापून घेऊन सन १८९४त प्रसिद्ध केलें. याचीं पृष्ठें १६० व किंमत ४ आणे. ***

रामचंद्र वा. केणी

कीचकवध— कवि केणी यांनीं हें काव्य-पुस्तक मुंबईस निर्णय सागर प्रेसमध्यें छापून घेऊन तेथेंच प्रसिद्ध केलें. पृ. ८३, मूल्य ४ आणे. हे कवि सासष्टीमधील असावेत असें वाटतें. नक्की गांव मात्र कळत नाहीं. यांचें वास्तव्य मुंबईलाच होतें.

* * *

रामकृष्ण माधव चोणकर

मोरोपंती केकावली— कवि चोणकर यांचें हें काव्य पुस्तक सन १९०२ सालीं मुंबई येथें प्रकाशनांत आलें. याची पृ. सं. १६४ असून किंमत १२ आणे होती.

काव्यार्णवसुधा — हें आपलें पुस्तक चोणकर यांनीं मुंबई येथें विनय प्रेसमध्यें छापून घेऊन १९१५ सालीं प्रसिद्ध केलें. पृ. २०२, मूल्य ०-६-०.

मराठी महिम्न— हें काव्य स. १९२१ त प्रकाशनांत आलें.

शंकर व्यंकटेश टाकी

कवि शंकरराव टाकी यांचा जन्म कुसमण [केपे] येथें सन १८३० सालीं झाला. प्राथमिक शिक्षणानंतर पुढील अभ्यास मुंबईस होऊन तेथेंच त्यांनीं नोकरी धरली आणि स. १८८३त ते निवृत्त झाले. हे अध्यात्मिक वृत्तीचे असून त्यांनीं ईशभक्तिपर अनेक अभंग रचले. त्यांत त्यांच्या श्रीमंगेश कुलदेवासंबंधींचेच अधिक आहेत. दि. ५ जून १९०२ रोजीं मुंबईजवळ शिंव येथें स्वतःच्या नवीन घरांतच ते वैकुंठवासी झाले.

क. रामचंद्र शंकर टाकी

कवि रामचंद्र शंकर टाकी यांना भाई म्हणत. यांचा जन्म स. १८५७ सालीं झाला. हे जन्मतःच आध्यात्मिक वृत्तीचे होते. काव्याचा नादहि त्यांना वडिल शंकरराव टाकी यांच्या सहवासांत लहानपणापासूनच लागला होता. आठ वर्षांच्या अल्पवयांत मुंबईहून कुसमण येथें आपल्या घराण्याच्या मूळ पुरुषाचें दर्शन घेण्यासाठीं ते आले त्यावेळीं त्यांना पुढील कविता स्फुरली— "जय पुरुषा ! श्री पुरुषा ! 'टाकि' कुळाचा धरूनि अभिमान ॥ रक्षिशि आम्हां सकळां यास्तव करितों सदा तुतें नमन ॥१॥ 'टाकि' म्हणजे त्यागी स्वानंदीं तृप्त टाकुनि विषयां ॥ अमवास्येशीं पुजितां देवविसी बोध वारुनी माया ॥२॥

वयाच्या आठव्या वर्षी मोरोपंतांची एक सुंदर कविता त्यांच्या वाचनांत येऊन त्यांनीं जी कविता रचली ती अशी–'मयूरपंत हो ! तुम्हीं हरिगुणवर्णनिं दिली मना गोडी ॥ तेणें आर्या छंदीं होउनि स्फूर्ती कधीं न ते सोडी ॥१॥ संत परीक्षक झालां संपादुनि दास्य भक्ति चातुर्या ॥ आभारास्तव नमितों कर जोडूनी तुम्हां कवीवर्या ॥२॥

एका बाजूनें रामचंद्रराव यांचें शिक्षण आणि दुसऱ्या बाजूनें श्री भगवद्गीता, यथार्थ दीपिका व अन्य संतवाङ्मय यांचेंहि अध्ययन चाले. बी. ए. झाल्यावर भाईनीं शिक्षण खात्यांत नोकरी धरली आणि एज्युकेशनल इन्स्पेक्टर पर्यंत बढती मिळवून ते सन १९११ सालीं निवृत्त झाले. यानंतरचा त्यांचा बहुतेक काल ईशचिंतन, भजन, लेखन आणि प्रवचनमार्गें भक्ति प्रचार या कार्यांत जाऊं लागला. त्यांचा शिष्यवर्ग बराच असे. पुढें 'टाकी महाराज' म्हणन त्यांची फार प्रसिद्धी झाली.

टाकी महाराजांच्या कवितेंत काव्यरसापेक्षां ईशभक्तीचें उत्कट प्रेमच अधिक दिसून येतें, काव्यनिर्मितीचा त्यांचा हेतु ईश्वराचे गुणानुवाद गाऊन स्वतःचें व लोकांचें शाश्वत कल्याण करावें हाच होता. त्यांच्या स्फुट कवितां दोनशेंवर आहेत. त्यांपैकीं बहुतेक प्रकाशनांत आल्या असून अजून कांहीं अप्रकाशित आहेत. प्रकाशित कवितांतील त्यांच्या पहिल्या दोन कविता अशा आहेत—

(१] रामा तूं येई, मम हृदयीं वास करी ॥धृ॥ चैन नसे मज तुजविण देवा । धांव घेई झडकरी ॥१॥ दश दिशा मज शून्य भासती । धीर धरूं कुठवरी ॥२॥ शंकरचरणामृत तें पाजुनि । त्वरित तारीं नरहरी ॥३॥

[२] भगवंता तूं निर्गुण असूनी सगुण भाससी भक्तां रे ॥धृ.॥ मज दीना तें तुजविण कोणी त्रात। नाहीं बापा रे ॥१॥ ऐहिक सुखासी व्यर्थचि भुलनी घालविलें वय वायां रे ॥२॥ शंकरचरणावांचुनि कांहीं नेणों तरणोपाया रे ॥३॥

पुरुषार्थ दीपिका, लघुबोध, प्रेमामृत, सद्भक्ति विजय, असे टाकी महाराजांचे बरेच ग्रंथ आहेत.

महाराजांच्या चरित्रकारांनीं त्यांच्या ग्रंथासंबंधीं लिहिलें आहे–" प्रेमानें **पुरुषार्थ** गाउनि स्वयें तो **दीपिकीं** बोधिला, सारांशें **लघुबोधिं** तोचि कथुनीं सर्वांसही अर्पिला ॥ तीं गीतेंच **सुरेशगीत** स्वरूपीं **प्रेमामृतीं** ओंविलीं। त्या श्रीवामनभक्त शंकरसुता अर्पी प्रणामावली॥

पुरुषार्थ दीपिका—मानवी जीवनाचें अंतिम ध्येय काय व ते कसें साध्य करावें, याचें टाकी महाराजांनीं यांत सुंदर विवेचन केलें आहे. हा ग्रंथ सन १९१७ त लिहून झाला व १९१८ त प्रकाशनांत आला. पृ. ६९७, मूल्य ३ रु.

लघुबोध—यांत पुरुषार्थ दीपिकेचें सार थोडक्यांत दिलें आहे. हा ग्रंथ १९२१ सालीं प्रसिद्ध झाला. पृ. ११२, मूल्य १ रु.

प्रेमामृत—गीतेवरील टीका थोडक्यांत समजण्यास हें पुस्तक उपयुक्त आहे. हें १९२२ त प्रकाशनांत आलें; पण तें १९२१ मध्येंच लिहून पूर्ण झालें होतें.

सद्भक्तिविजय—जगांतील सर्व धर्मशास्त्रांत गीतेची योग्यता कशीं श्रेष्ठ आहे याचें यांत रसाळ विवरण केलें आहे. हें पुस्तक स. १९२७ त प्रसिद्ध झालें.

आपण कोणत्या संतांपासून काय शिकलों हें भाईनीं पुढील अभंगांतून सांगितलें आहे—

"नाथें शिकविलीं गुरुदेव भक्ति। पंडितें विरक्ति वर्षियेली ॥ १ ॥ सद्गुरु शंकरें दिलें पूर्ण ज्ञान। केलीं तीं जतन मांगिरीशें ॥ २ ॥ आद्य गुरुरायें भक्तिपंथ वर्म। भागवत धर्म दावियेला ॥ ३ ॥ तुकारामवाणी रामदासस्वामी गोडी हरिनामीं चाखविली ॥ ४ ॥ आणखी बहुत संतभक्त थोर। त्यांचे उपकार किती वर्णू ॥५॥

दि. १४ ऑक्टोबर १९३५ रोजीं यांनीं आपली इह लोकची यात्रा संपवली. + + +

क. मंगेश रामचंद्र टाकी

कवि मंगेशराव टाकी हे रामचंद्रराव टाकी महाराज यांचे चिरंजीव. महाराजांनीं स्थापन केलेल्या सदभक्ति प्रसारक मंडळाचें कार्य यांनीं उत्साहानें पुढें चालविलें. यांनीहि बरेच ग्रंथ लिहिले. यांचे अनेक अभंग व स्फुट पदें प्रसिद्ध आहेत.

सद्भक्तिप्रकाश हें टाकी महाराजांनीं सुरू केलेलें मासिकहिं यांनीं उत्साहानें पुढें चालू ठेवून त्यांतून अनेक ग्रंथ प्रसिद्ध केले. सुप्रसिद्ध साहित्यिक कै. विष्णु रंगाजी शेळडेकर यांचें गौड सारस्वत ब्राह्मण आणि त्यांचे कुलदेव हें पुस्तक याच मासिकांतून प्रकाशनांत आलें. या मासिकांतून क. मंगेशराव टाकी यांचे अनेक अभंग व पदेंहि प्रसिद्ध झालीं आहेत.

श्रीकृष्णाचे सद्गुरु—हें पुस्तक कवि मंगेशराव टाकी यांनीं पहिल्या प्रथम लिहिलें. सन १९३८ सालीं सद्भक्ति प्र मंडळातर्फें तें प्रकाशनांत आलें. पृ. ६४, मूल्य रु. ०--८--०

गीताध्याय सारामृत—गीताध्यायांतील सार यांत कवि मंगेशराव यांनीं थोडक्यांत रसभरीत लिहिलें आहे. सन. १९४० सालीं हें पुस्तक सद्भक्ति प्रसारक मंडळातर्फें प्रसिद्ध झालें आहे. पृ. १९९, मूल्य २ रु. + + +

क. रामचंद्र विष्णु माडगांवकर

कवि माडगांवकर यांचा मूळ गांव मडगांव; पण व्यवसायानिमित्त ते मुंबई येथेंच होते. यांनीं कित्येक स्फुट कविता लिहिल्या आणि कांहीं काव्य ग्रंथहि लिहून प्रकाशनांत आणले. तुकारामाची गाथा, रामदास स्वामींचे समग्र ग्रंथ ज्ञानेदवकृत भावार्थदीपिका असे त्यांचे तीन ग्रंथ विशेष प्रसिद्ध आहेत.

तुकारामाची गाथा— हा गाथा ग्रंथ कवि रामचंद्र विष्णु माडगांवकर यांनीं सन १८८५ सालीं लिहून पूर्ण केला; तथापि प्रकाशनांत आला तो सन १८८६ सालीं. मुंबईच्या निर्णय सागर छापखान्यांत त्याचें मुद्रण झालें. पृ. ६२०, मूल्य २॥ रु.

रामदास स्वामींचे समग्र ग्रंथ— या ग्रंथाची छपाई देखील निर्णय सागर प्रेसमध्येंच होऊन तो सन १८९० सालीं प्रकाशनांत आला. पृ. ७२७, मूल्य २॥ रु.

श्रीज्ञानदेवकृत भावार्थ दीपिका— कवि माडगांवकर यांचा हा तिसरा काव्यग्रंथ. हे तिन्हीं ग्रंथ त्यांनीं स्वतःच प्रसिद्ध केले. हा सन १९०७ सालीं प्रकाशनांत आला. याची पृष्ठसंख्या ३६८ असून मूल्य २ रुपये होतें.

+++

क. सुरेंद्र कृष्ण माडगांवकर

तारण माधुकरी— हें काव्य पुस्तक सुरेंद्रराव यांनीं मुंबई येथेंच लिहिलें आणि तेथील कर्नाटक प्रेसमध्यें छापून घेऊन तेथेंच सन १९२९ सालीं प्रसिद्ध केलें. पृ. २०, मूल्य २ आणे.

* * *

भार्गव सगुण कामत वाघ

अद्वैत तत्त्वज्ञान—हें काव्य पुस्तक क. वाघ यांनीं रायबंदर येथेंच छापून घेऊन प्रसिद्ध केलें.

श्रीभगवद्गीता—गीतेचा हा ओवीबद्ध संक्षेप आहे. हें दुसरें पुस्तकहि कवीनें रायबंदर येथेंच छापून घेऊन प्रसिद्ध केलें.

+++

क. माधव नारायण वैद्य

कवि माधव नारायण वैद्य यांचें जन्म गांव अंत्रूज महालांतील केरी हें असून ते तेथील सुप्रसिद्ध वैद्य घराण्यांतील आहेत. यांचे काव्य ग्रंथ किंवा गद्यग्रंथ अन्य कुठें दिसत नाहींत. फुटकळ कविताहि उपलब्ध नाहीं. तथापि खानापूरच्या 'लोकमित्र' मासिकांत यांच्या अवघ्याच कविता प्रसिद्ध झालेल्या अवलोकनांत आल्या. यांचा एकुलता एक ग्रंथ म्हणजे 'म्हाडदोळची यात्रा.'

म्हाडदोळची यात्रा – म्हाडदोळच्या तत्कालीन जत्रेचें यांत यथार्थ वर्णन आलें असून द्यूतगृह व जुगाऱ्यांची केविलवाणी स्थिति यांचें विविध वृत्तांतील काव्य वेधक आहे. जत्रेंत घडणाऱ्या अन्य प्रकारांचेंहि मजेदार वर्णन आहे. मुद्रण निर्णय सागर प्रेसमध्यें शके १८१४ त म्हणजे सन १८९२ सालीं झालें. पृ. ३६, मूल्य ४ आणे.

*++

क. विष्णु रंगाजी शेळडेकर

केंपे तालुक्यांतील असोळडें हें कविवर्य विष्णु रंगाजी शेळडेंकर यांचें जन्मगांव. सन १८७२त यांचा जन्म झाला आणि सन १९४८ सालीं त्यांचें निधन झालें. वयाच्या २२व्या वर्षी यांची काव्यरचनेस सुरवात झाली आणि ७६व्या सालीं अंतःकालीन प्रकृति अस्वास्थ्यांत ती बंद पडली. २२ ते ७६ अशा ५४ वर्षांच्या कालांत त्यांनीं अनेक काव्यग्रंथ, शेंकडों स्फुट कविता आणि कांहीं गद्यग्रंथहि लिहिले. क. शेळडेकर यांची ठळक काव्यसंपदा पुढीलप्रमाणें आहे.

१ **श्रीशांतादुर्गा स्तोत्र**- शेळडेंकर यांचें हें पहिलें काव्यपुस्तक सन १८९५ सालीं प्रसिद्ध झालें. याची छपाई मुंबई येथें निर्णयसागर प्रेस-मध्यें करण्यांत आली. आकार छेटा. मू. २ आणे.

२ **पूर्णसार**- मुद्रक व प्रकाशक द. गो. सडेकर, धनंजय प्रेस, खानापूर, पृ. ३७, मूल्य अडीच आणे.

३ **श्रीदामोदर पद्यामृत**- प्र.- शि. ह. केंकरे, मुद्रण धनंजय प्रेस, खानापूर.

४ **मद्यपान निषेध**- प्र.- हितचिंतक मंडळी. मुद्रण- निर्णयसागर प्रेस, मुंबई.

५ **पूर्णदास चरित्र**- मुद्रण- धनंजय प्रेस, खानापूर. सन १८९६.

६ **पद्यसुंदरी**- प्र.- शि. ह. केंकरे, मुद्रण- धनंजय प्रेस, खानापूर. सन १९००.

७ **स्तोत्र द्वय**- मुद्रण- धनंजय प्रेस, खानापूर. सन १९०१.

८ **श्रीशांतादुर्गा प्रार्थनाष्टक**- मुद्रण- आत्माराम मुद्रागार, फोंडें.

९ **श्रीशांतादुर्गा आख्यान**— प्र.- द. गो. सडेकर, खानापूर.

१० **देवीचरित्रत्रय**— निर्णयसागर प्रेस, मुंबई.

११ **श्रीचंद्रेश्वर महात्म्य**- ओवीबद्ध आठ अध्याय. मुद्रण- धनंजय, खानापूर, पृ. ३५, मूल्य ४ आणे. शके १८२४. दुसरी आवृत्ति शके १८३४.

१२ **देवीचरितामृत**— देवीचरित्राची ओवी बद्ध पोथी. मुद्रण- धनंजय, खानापूर. आवृत्ति १ली शके १८४०, आ. २री शके १८४९, मुद्रण- निर्णयसागर, मुंबई. आ. ३री शके १८६०, मुद्रण- गोमंतक प्रेस, मडगांव, पृ. ५६, मूल्य ८ आणे.

१३ **श्रीमांगिरिश शांतादुर्गाख्यान**— प्रकाशक- महादेव आणि कंपनी, मुद्रण- सद्-भक्ति प्रकाश प्रेस, मुंबई. पृ. २६, मूल्य ४ आणे सन १९३४.

१४ **श्रीसप्तशती**— मु.- गो. पुं. हेगडे देसाई, भारत प्रेस, केंपे, पृ. ४२, मूल्य चार आणे. सन १९३६ सालीं या काव्यपुस्तकाचें प्रकाशन झालें.

१५ **श्रीरामनाथ महात्म्य**—कविवर्य शेळडेकर यांचें हें अगदीं अखेरचें काव्यपुस्तक आहे. सन १९४७ त तें लिहावयास सुरवात होऊन बहुतेक पुरें होत आलें आणि अखेरचा नवमोध्याय १९४८च्या जानेवारीच्या आरंभींच पूर्ण झाला. तथापि उत्कट इच्छा असूनहि त्यांच्या हयातींत तें प्रकाशनांत येऊं शकलें नाहीं. त्यांच्या निधनानंतर त्यांचे बंधु श्री. गणबा रंगाजी शेळडेकर यांनीं तें मुद्रणासाठीं छापखान्यांत दिलें, पण दुर्दैवानें तेंहि निवर्तल्यानें त्याची मुद्रित प्रत पहाण्याचा योग त्यांनांहि लाभला नाहीं. पुढें छपाई पूर्ण झाल्यावर त्यांचे चिरंजीव डॉ. वामन गणबा शेळडेकर यांनीं हें ओवीबद्ध पुस्तक १९६४च्या पूर्वार्धात प्रकाशनांत आणलें याची छपाई पणजीच्या सदानंद मुद्रणालयांत झाली. कागद गुळगुळीत, मुद्रण ठळक, पृ. ७०, मूल्य १ रुपया.

या पुस्तकांत बांदिवडें येथील श्रीरामनाथ देवाचें महात्म्य आणि पौराणिक, ऐतिहासिक व प्रचलित माहिती ओवी वृत्तांत लिहिली आहे. विष्णुपंतांचा काव्याचा व्यासंग मोठा व त्यांची वृत्ति आध्यात्मिक असल्यानें त्यांचें काव्य भक्तिरसप्रधान वठणें साहजिक आहे. अथपासून इतिपर्यंत प्रस्तुत काव्यहि रसाळ आणि भाविकांनां आकर्षित करणारें असें वेधक आहे.

श्रीरामनाथ महात्म्य पुस्तकांतील नवमोध्यायांतील आरंभींच्या कांहीं ओव्या पहा—

"श्रीगणेशायनमः करुणार्द्र श्रीनीलकंठ रामनाथ । भक्तांसह नांदे बांदिवडें ग्रामांत । जाहलें जें स्थल सर्वेश्वरा पसंत । रामनाथीं म्हणती त्या ॥१॥ समुद्रमंथनीं विश्वसंहारकर । हालाहल केलें कंठामाजी स्थिर । जगद्रक्षणास्तव आपणावर । ओढून घेई संकट ॥२॥ भक्तां कारणें सदया जगदीशा । करूनियां घेशी ऐशी ही स्वदशा । ब्रम्हांडही करुणेवरूनि ऐशा । ओवाळुनियां टाकावें ॥३॥ देवा तूं अखिल जगाचा मायबाप । म्हणुनीच का तदपराध पाप । स्वशिरीं घेऊनियां भोगिशी पाप । त्यां अभाग्यां सुखवाया ॥४॥ हेंच तुझें ब्रीद तूं चालविशी । जनहि मोठे अकृतज्ञतेशीं । कल्पितो निज ब्रिरुदही ऐशी । सध्यस्थिति कां व्हावी ॥५॥ देवा तूं दया क्षमेची परमावधि । उभवीं मोहपटलासी निरवधीं । हरीं अज्ञानजन्य जनाच्याहि व्याधी । दावीं तव शिवपदा ॥६॥ ऐशी ही तनुमनें तुम्हांप्रति । करुणाकरा करूनि विनंती । करूं जिज्ञासू श्रोत्यां यथामति । पुढील वृत्त तव कथन ॥७॥ दक्षिण कोंकणाधिपति सौंधेकर । जाहले मध्य कोंकणी मंडलेश्वर । इती मराठी राज्यकर्त्यां करभार । सख्य करूनी तयांशीं ॥८॥ सौंधेकरांचा पंथ लिंगायत । बसवेश्वर हें तयांचें दैवत । अन्य धर्मी दुराग्रहाचें मत । नव्हतें त्यांचें कधांही ॥९॥ ऐसा सुखानें जाय बराच काळ । जनतेचाही होय योग्य सांभाळ । देवधर्मादि कृत्यीं त्यांचा गोंधळ । नव्हता तदा थोडाहि ॥१०॥ शेजार प्रदेशाचे अधिकारी । तयांशींहि तें सख्यत्वची धरी । परी अविधांनीं सौंधा नगरा । बळकाविलो त्या काल एकाकी ॥११॥ राजका णाभाजी पावधपण । याचेंच असावें प्रमुख धोरण । परि तयाचें जरा कमी प्रमाण । जाचक झालें राज्या ॥१२॥

* * *

लक्ष्मण नाईक खर्डे

कवि खर्डे हे बार्देश येथील राहाणारे. यांनीं चार पांच काव्यपुस्तकें लिहीलीं; पण प्रकाशनांत आलीं अवघीं तीनच.

१ भजनी पद्यहार — हें १९०५ सालीं लिहिलें गेलें; पण १९११ त छापून प्रसिद्ध झालें. याचा आकार छोटा असून पृ. १६ होतीं.

२ भगवद्भजनमाला — स. १९१५ व १९१६ या वर्षीं अनुक्रमें १ ला व २रा असे या भजनमालेचे दोन भाग प्रसिद्ध झाले. यांची छपाई पणजी येथील राव ब्रदर्स प्रेसमध्यें झाली.

पंचरत्नगीता - हें देखील काव्यपुस्तक सदर राव ब्रदर्स प्रेसमध्येंच छापून प्रसिद्ध झालें.

गजाननशास्त्री गायतोंडे

मुलांचे नित्यपाठ — कवि गायतोंडे यांचें हें पुस्तक पुणें येथें छापून निघालें.

महादेव सीताराम जोशी

अभिमन्यूचा पोवाडा — हा पोवाडा कवीनें खानापूर येथील धनंजय छापखान्यांत छापून घेऊन प्रसिद्ध केला. आकार छोटासा असून किंमत दीड आणा.

व्यंकटेश विठ्ठल पै

सुलोचना - लावणीच्या पद्धतीवर प्रस्तुत काव्याची रचना केलेली आहे.

दामोदर फटबा भांडारे

१ न्या. मू. **महादेव गोविंद रानडे** — सन १९०२ सालीं हें काव्यमय चरित्र भांडारे यांनीं लिहिलें आणि मुंबई येथें निर्णयसागर छापखान्यांत छापून घेऊन तेथेंच प्रसिद्ध केलें.

२ न्या. मू. **काशिनाथ त्रिंबक तेलंग** —कवि भांडारे यांचें हें दुसरें पुस्तक. हें पद्यात्मक चरित्र १९०५ त लिहिलें व १९०६ सालीं मुंबई येथें कर्नाटक प्रेसमध्यें छापून घेऊन प्रसिद्ध केलें. पृ. २४.

३ **श्री गौडपादाचार्य कारिका** - अद्वैतादि चार प्रकरणें यांत असून शेवटीं श्रीगौडपादाचार्यांची आरती दिली आहे. पृ. ८०.

४ **मांडुक्योपनिषद** — पृ. २५. मुद्रण — कर्नाटक प्रेस, मुंबई.

केशव नारायण पै

अपंक्तविजय दीपिका — पणजी येथील कामत महामाय यांच्या अपंक्त प्रकरणाची माहिती. पृ. १७७ मूल्य ४ आणे. प्रकाशन सन १८९६. प्रसिद्धीस्थान कालापूर.

राम विठ्ठल शिलकर

काव्य पुष्पांजली - ही काव्यपुस्तिका कवि शिलकर यांनीं फोंडें येथील आत्माराम मुद्रागारांत छापून घेऊन शके १८३१ सालीं प्रसिद्ध केली. पृ. ४७, मूल्य चार आणे.

रंगाजी गणबा शेळडेकर

मराठी पद्यात्मक व्याकरण – प्रकाशक – भिकाजी कृ. भांडारे, मुंबई. शके १८५४, पृ. ६४, मुद्रण – गणेश प्रेस पुणें. + +

गोविंद पुंडलीक हेगडे देसाई

हेगडे देसाई यांचें काव्य फारसें कुठें दिसत नाहीं. त्यांचें एकच काव्यपुस्तक अस्तित्वांत आहे व तें म्हणजे 'राष्ट्रीय ओव्या'.

राष्ट्रीय ओव्या— हें आठ पृष्ठांचें छोटेसें काव्यपुस्तक मुंबई येथील 'सेंचरी' प्रिंटिंग प्रेस-मध्यें छापलें व १९१४ सालीं तेथेंच प्रसिद्ध झालें.

***

वामन रामचंद्र नायक करंडे

'तोच मी' या टोपण नांवानें करंडेशास्त्री यांनीं स्फुट काव्य फार लिहिलें.पण यांचा एखादा काव्यग्रंथ प्रसिद्ध झाल्याचें कळत नाहीं. यांचें काव्य रसाळ पण खोंचदार आहे. फोंडू शास्त्री याच नांवानें ते विशेष प्रसिद्ध असून माशेल येथील एक लोकप्रिय आर्यवैद्य होते. यांच्या गद्य-ग्रंथांचा परिचय आमच्या पुढील पुस्तकांत येणार आहे.

* * *

अनंत सखाराम करंडे

बालबोध रामायण— अनंत स. करंडे यांचें वास्तव्य कवळें येथें होतें. यांनीं कित्येक मासिकांतून स्फुट काव्य लिहिलें आहे. यांचा ठळक काव्यग्रंथ म्हणजे बालबोध रामायण. हें आर्याबद्ध खंडकाव्य आहे. पृ. ४२. मुद्रण- श्री लक्ष्मीनारायण प्रेस, मुंबई.

* * *

रामकृष्ण अनंत काकोडकर

कवि काकोडकर यांची स्फुट काव्यरचना बरीच असली, तरी काव्यग्रंथ असे प्रकाशनांत आले ते पुढील चारच—

१ **बक्षीबहाद्दर जिवबादादा केरकर**— लष्करी सामर्थ्यानें शिंदेशाही गाजविणारे सेनापति केरकर यांचें हें उठावदार चरित्र आहे. पृ. ३०, मूल्य चार आणे. मुद्रण- आत्माराम मुद्रागार, फोंडें.

२ **सारस्वत चंपू**— पृ. १८३, मूल्य १॥ रु. मुद्रण- हिंदु प्रेस, मडगांव.

३ **वसुंधरा परिणय**— मनोवेधक काव्य. मूल्य १॥ रुपया.

४ **श्रीशिवाजी राज्याभिषेक**— छत्रपति शिवाजीच्या राज्यारोहणाचें काव्य. मूल्य १॥ रु.

* * *

अनंत तातोबा कामत

श्री. कामत हे हरंबल येथील राहाणारे असून अनेक मासिकांतून यांच्या कविता प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्यांचा विशिष्ट काव्यग्रंथ अजून उजेडांत आलेला नाहीं. प्रकाशनांत आलेल्या त्यांच्या नाटकांची माहिती दुसऱ्या पुस्तकांत येणार आहे.

* * *

भि. रामचंद्र पांडुरंग वैद्य

प्राणाचार्य रामचंद्र पांडुरंग वैद्य तथा दादावैद्य यांची सार्वजनिक क्षेत्रांतील विविध प्रकारची कामगिरी पाहिली म्हणजे त्यांनां 'सार्वजनिक दादा' म्हणणें विशेष शोभून दिसेल. गोमंतकांतील केरी येथील सुप्रसिद्ध वैद्य घराण्यांत सन १८५९ सालीं यांचा जन्म झाला आणि सन १९४७त त्यांचें निर्वाण झालें. ८८ वर्षांच्या आपल्या हयातींत, त्यांनीं लोकांसाठीं फार मोठें कार्य केलें. ते निष्णात आर्यवैद्य असल्यानें अनेक असाध्य रोग्यांनांहि त्यांकडून जीवदान लाभलें.

दादा वैद्य हे वृतपत्रकार, ग्रंथकार आणि प्रतिभासंपन्न कवि होते. काव्यतरंगिणी, स्थूलतनुवर्णन, स्फुरणगीता, आरती संग्रह इ. त्यांचे काव्यग्रंथ प्रकाशनांत आले असून स्फुट काव्यहि बरेंच आहे.

काव्यतरंगिणी — लेखक व प्रकाशक-रा. पां. वैद्य. मुद्रण-संगमोदय प्रेस, सांगें. विविध स्फुट काव्यांचा हा संग्रह आहे. पृ. २३७, आकार क्राउन, सन १९३०. यांतील काव्य सुरस व सुबोध आहे. रचना अगदीं साधी, पण वाचकांच्या मनाचा वेध घेणारी अशी आहे. एका कवितेची सुरवात पहा—

"वैद्यबाबा मी रोडलों कशानें । असावा कीं हो लठ्ठ वयोमानें ॥ वस्त्रें सळावें चालतसे आज। कृशत्वाची वाटते फार लाज ॥"

क. दादा स्त्रीशिक्षणाचे कैवारी असल्यानें जीवनाच्या सर्व क्षेत्रांत स्त्रियांची प्रगति व्हावी असें त्यांनां मनःपूर्वक वाटे. स्त्रीशिक्षणापासून होणारे फायदे त्यांनीं 'स्त्रीशिक्षण' या मथळ्याच्या कवितेंत ठीक दाखविले आहेत. तिचा पहिला चरण पहा—

"वडीलधाऱ्यांचा छळ सोसुनियां लिहिणें मी शिकलें । तयाचें सार्थक सखि जाहलें ॥ साधारण वाचण्यास जेव्हां गडे येउं लागलें । वाचिलें प्रसवशास्त्र तें भलें ॥ वहिनीच्या बाळंतपणीं गे मूल आडवें आलें । सुइणिचें धैर्य सकल खुटलें ॥ सर्वजणें गडबडलीं तेव्हां झटकन मी धांवलें । बुकांतील युक्ति एक शिकलें ॥"...

स्थूलतनुवर्णन— लेखक व प्रकाशक-रा. पां वैद्य. मुद्रण-संगमोदय प्रेस, सांगें. सन १९३०, आकार क्राउन, पृ. ८४. शरीर व इंद्रियविज्ञान या विषयावरील या पुस्तकाची रचना आर्या गीति या छंदांत केली आहे. याची प्रस्तावना देखील आर्याबद्ध आहे. प्रस्तावनेंत कवि म्हणतात—"कोणताहि विषय ज्याप्रमाणें पद्यांत तोंडपाठ राहातो तसा तो गद्यांत राहूं शकत नाहीं व ऐन वेळीं त्याचा उपयोग व्हावा तसा होत नाहीं म्हणूनच मी हें पुस्तक पद्यांत लिहिलें."

यांतील आर्या सरळ असून भाषा साधी असल्यानें सामान्य वाचकाला हि सहज समजणाऱ्या आहेत.

स्फुरणगीता—लेखक-रा. पां. वैद्य, प्रका-

शक–श्रीपति रामचंद्र वैद्य, पणजी. पृ. २५, प्रकाशन १९४१.

या काव्यपुस्तकांत कविवर्य दादांनीं विजयादुर्गेची प्रार्थना केली आहे. त्या प्रार्थनेंत ते म्हणतात—"हे अंबे, आपली तृष्णा अनेक विषयांवर आहे; पण त्यांतील मुख्य विषय राष्ट्रहित. तरी तो साधण्यांसाठीं तूं आम्हां भारतीयांस योग्य मार्ग दाखव." "नलगे मुक्ति धन संपदा। संतसंग दे गा सदा ॥" या तुकारामांच्या मागणीप्रमाणे दादांनीं स्वतःसाठीं कांहीं न मागतां राष्ट्रहितासाठीं योग्य मार्ग दाखव अशी देवीकडे प्रार्थना केली.

'स्फुरणगीता' हें काव्य नांवाप्रमाणेंच दादांकडून स्वयंस्फूर्तीनें लिहिलें गेलें, त्यामुळें त्यांत त्यांच्या अंतरंगातील निरनिराळ्या भागांचीं प्रतिबिंबें स्पष्ट उठलीं आहेत. या काव्याचें अनेक विद्वानांनीं कौतुक केलें आहे.

आरती संग्रह—यांत श्रीविष्णु, सूर्य, शंकर, अंबा इ. देवतांच्या सुलभ, सुंदर आरत्या लिहिण्यांत आल्या आहेत. आरत्या साध्या पण सुरस आहेत.

श्रीउद्यमस्तोत्र—वसंततिलका वृत्तांत याची रचना केली आहे. त्यांतील एक श्लोक असा आहे—"गावें शिवा म्हणति कोणि कुणी रमेशा। शक्तीस कोणि गणपासि कुणी दिनेशा ॥ रूप तुझींच मज सर्वहि वाटती तीं। श्रीउद्यमा! म्हणुनि तूज भजें सुचित्तीं ॥"

कविवर्यांनीं उद्यमाला देव मानून श्रेष्ठत्व व मांगल्यदर्शक 'श्री' या अक्षराची योजना उद्यमारंभीं केली आहे. इतकी त्यांची उद्यमावर भक्ति होती.

दादांनीं मात्रावृत्त, गणवृत्त, छंद अशा निरनिराळ्या प्रकारच्या कविता रचल्या; पण त्यांत आर्यावृत्त त्यांनां विशेष आवडे. आस्तिक्यशतक, मित्राचा उपदेश, श्रीगोकर्णक्षेत्र देवता प्रार्थना, अबलागौरव, गीतोपदेश पंचक, वैद्यनीति, नचिकेताख्यान, सत्पुरुषलक्षणें, आत्मबोध इ. त्यांच्या बऱ्याच कविता आर्यावृत्तांत आहेत. ऋणमोचन मंत्र या कवितेंत कर्जमुक्तीचा उपाय त्यांनीं कळकळीनें सांगितला आहे, तर सासर, जांवई, मुलीस उपदेश, हिंदु कुटुंबीण या कवितांतून प्रापंचिकांनां छान बोध केला आहे.

कविवर्य दादा वैद्य यांच्या कांहीं विनोदी कविताहि असून त्या मजेदार तितक्याच उद्बोधकहि आहेत. त्यांपैकीं त्यांची 'गुडगुडी' कविता त्यावेळीं बरीच गाजली होती. "सखि रात्रंदिन छळिते मला। सवत गुडगुडी।" अशा प्रकारची तिची वेधक रचना होती.

रामचंद्र दत्तात्रेय किंजवडेकर

क. किंजवडेकर शास्त्री यांचा जन्मगांव पेडणें; पण वास्तव्य पुणें. यांच्या संस्कृत मराठी कांहीं कविता प्रकाशनांत आल्या आहेत. यांचीं दोन काव्यपुस्तकें असलीं तरी प्रकाशनांत आलेलें एकच म्हणजे 'अभंगगाथा'.

अभंगगाथा—श्री एकनाथ महाराज अभंगगाथा हें यांचें काव्यपुस्तक बरेंच लोकप्रिय आहे. या पुस्तकाचें मुद्रण चित्रशाळा प्रेसांत पुणें येथें झालें असून त्याची पृष्ठसंख्या ८२४ व किंमत २॥ रुपये आहे.

भीमाजी मुकुंद राव देशपांडे

क. भीमाजी मु. राव देशपांडे यांनीं गतकालीन चित्ताकर्षणादि मासिकांत 'वज्रदेही' या नांवानें

बऱ्याच स्फुट कविता लिहिल्या आहेत. त्यांची कविता फार सुरस असे.

रामचंद्र कृष्ण कामत

ह. भ. प. रामचंद्र कृष्ण कामत यांचें वास्तव्य माशेल येथें असे. तेथील श्रीदुर्गादत्त मंदिराची स्थापना ते व त्यांचे कनिष्ठ बंधु ह. भ. प. विठ्ठल कामत ऊर्फ दिगंबरदास यांकडून झाली. यांचें बहुतेक सर्व काव्य आध्यात्मिक आहे. यांनीं मोठी ग्रंथरचना केली आणि स्फुट कविताहि लिहिली.

श्रीगुरुचरित्र — सुप्रसिद्ध गुरुचरित्राचें यांनीं मोठ्या परिश्रमानें संशोधन करून शुद्ध प्रत तयार केली. एक हजार पृष्ठांचा हा ग्रंथ शके १८६६त मुंबईच्या केशव भिकाजी ढवळे यांनीं प्रसिद्ध केला. मूल्य रु. २॥.

श्रीगुरुगीता — हें पुस्तकहि ढवळे यांनींच शके १८७४त प्रसिद्ध केलें. पृ. १४४, मूल्य १ रु.

याशिवाय त्यांचें गद्य वाङ्मयहि बरेंच असून कांहीं अप्रकाशीतहि आहे.

विठ्ठल कृष्ण कामत

ह. भ. प. विठ्ठल कृष्ण कामत यांचें साहित्यहि आध्यात्मिकच आहे. यांच्या कविता 'मुमुक्षु' इ. मासिकांतून आलेल्या असून श्रीदत्तपदामृत, श्रीलइरायपद्यामृत अशीं काव्यपुस्तकेंहि प्रकाशनांत आलीं आहेत.

श्रीदत्तपदामृत — हें छोटें पुस्तक सुब्राय गोपाळ उभयकर यांनीं मुंबई येथें प्रकाशित केलें असून त्याचें मूल्य ४ आणे आहे.

श्रीलइरायपद्यामृत — प्रकाशक- पुरुषोत्तम ज. पै अस्नाडकर, शके १८३०, पृ. १६, मूल्य १ आणा.

व्यंकटेश गिरी कारे

क. व्यंकटेश गिरी कारे यांचें काव्य विशेषसें कुठें दिसत नाहीं. प्रकाशनांत आलेली व कित्येकांच्या नित्यपठणांत येत असलेली त्यांची एकच काव्यपुस्तिका म्हणजे 'संकष्टनाशिनी'.

संकष्टनाशिनी — ही लहानशी ओवीबद्ध पोथी आहे. काव्य भावनाप्रधान आणि वाचकांच्या मनाचा वेध घेणारें असें आहे. संकटपरिहारार्थ अनेक भाविकांकडून या पोथीचें पठण चालू असतें. मुद्रण-विठ्ठलप्रसाद प्रेस, पंढरपूर. प्रकाशक- व्यं. गि. कारे, मडगांव. शके १८३२.

महादेव पां. मराठे

यांचें काव्य आध्यात्मिक असून जें त्यांचें एकच काव्यपुस्तक प्रकाशांनत आलें आहे त्याचें नांव 'सुवचनमाला' असें आहे.

सुवचनमाला — पृष्ठें ९५, आकार क्राऊन, मुद्रण-संगमोदय प्रेस, सांगें. १९२७.

नरसिंह शंकर पेडणेंकर

क. पेडणेकर यांचें प्रकाशनांत आलेलें एकच काव्यपुस्तक म्हणजे भजनसंग्रह.

सुलभ भजन संग्रह — ले.-न. शं. पेडणेकर. प्र-संतसेवा भजनी मंडळ-पणजी, मुद्रण-आर्यन प्रेस, पृ. ५२, मूल्य ३ आणे. अभंग ठीक आहेत.

गा. रामकृष्णबुवा वझे

गायनचार्य रामकृष्णबुवा वझे यांचें वास्तव्य अंत्रूमध्येंच असे. त्या महालांतीलें गायनकलेंत पुढें आलेले पुरुष आणि एका कालीं अंत्रूज महाल गाजवून सोडलेल्या बहुतेक साऱ्या प्रसिद्ध गायिका वझे बुवा यांचे शिष्य व शिष्यिणी होत. यांचे दोन तीन गद्य ग्रंथ प्रकाशनांत आले आहेत; पण काव्यपुस्तक प्रसिद्धीसें आलेलें एकच व तें म्हणजे 'श्रीरामकरुणालहरी'.

श्रीरामकरुणालहरी — वझेबुवांनीं हें पुस्तक लिहून बराच काल लेटला आणि कांहीं कालानंतर ते पुणें येथें गेल्यावेळीं त्यानीं तें लोकसंग्रह प्रेसांत छापून घेऊन तेथेंच प्रसिद्ध केलें. पुस्तक क्राउन आकाराचें पृ. ४८ असून मूल्य २॥ आणे आहे. काव्य श्लोकबद्ध व गेय आहे.

पुरुषोत्तम नारायण वर्दे

श्रीमांगिरीश महात्म्य — क. वर्दे यांचें हें एकच काव्यपुस्तक प्रकाशनांत आलेलें आहे. याचें मुद्रण मुंबई येथें मुंबई वैभव प्रेसांत झालें. पृ. १८४, मूल्य १ रु.

केशव शांबा शिरवईकर

श्रीदुर्गा स्तुति — काव्य आध्यात्मिक असून पुस्तिकेचा आकार लहानसाच आहे. पृ. १२, प्र.—आ. ह. केंकेर, भारत प्रेस, केपें.

गीतावली — प्र. केंकेर, पृ. १०, मुद्रण— भारत प्रेस.

मारुती स्तोत्र — छेटा आकार, पृ. १२, प्र. होडरकर.

पांडुरंग लाडू शिरोडकर

श्रीकामाक्षी महात्म्य — शिरोडें येथील श्रीकामाक्षी देवीचें महात्म्य यांत लिहीलें आहे. पुस्तिका लहानशीच आहे.

श्रीधर मुंकुद सांवर्डेकर

यांच्या कांहीं कवीता निरनिराळ्या तिमतकालिकांतून प्रकाशनांत आल्या आहेत. तथापि त्यांचें प्रकाशीत काव्य पुस्तक म्हणजे एकच 'राधामाधव'.

राधामाधव — हें छेटें काव्यपुस्तक सांगें येथील संगमोदय छापखान्यांत छापण्यांत आलें व कवीनें स्वतःच प्रसिद्ध केलें.

क. सदाशिव प्रभु भाटीकर

भाटी (सांगें) येथील सदाशिव प्रभू उर्फ नामबाब भाटीकर हे एक भावनाप्रधान कवि होते. यांचे अभंग भजनांत अजून कित्येक ठिकाणीं गायिले जातात. त्यांचें एकच काव्यपुस्तक ज्यो. ना. अ. पाटणकर यांनीं आपल्या संगमोदय छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें त्याचे नांव 'भजनावली'.

भजन वली — यांतील श्रीदत्तमहाराजांचा अभंग गोड व हृदयवेदक आहे.

क. सगुण प्रभु मोये

कविवर्य मोये यांचें जन्मगांव शिवोली; तथापि सर्व्हे खात्यांत सरकारी अधिकारी असल्यानें पणजीच्या जवळपास राहाणें भाग झाल्यानें त्यांचें वास्तव्य कालापूर येथेंच असे. निवृत्तीनंतर वयाच्या अखेरीपर्यंत तेथेंच त्यांचें निवासस्थान होतें. हे निःस्पृह, दिलदार आणि बोले तैसा चाले अशा सरळ वृत्तीचे मनुष्य असून समाजसुधारणे-कडे त्यांचें फार लक्ष असे. ते बहुश्रुत व वाङ्मय-प्रेमी असून 'भारतमित्रा' चे पूर्ण अभिमानी होते. विद्यार्थी दशेपासून त्यांना काव्याचा फार नाद असे. त्यांनीं अनेक कविता लिहिल्या. गोमं-तकीय जुन्या मासिकांच्या अंकांतून त्या अजून वाचण्यास मिळतात. सगळ्यांत भारतमित्रांत आलेल्या त्यांच्या कवितांची संख्या अधिक आहे. त्यांचें काव्य सुरस आणि फार उद्बोधक आहे.

'भूलोकींचें नंदनवन' ही १९५७ च्या भा. मित्राच्या अंकांतील पुढील एकच कविता वाचली तरी त्यांच्या काव्याचें मर्म सहज कळून येईल. पहा—

"स्वर्गिं नंदनवन रम्य असे एक। वसति कल्पद्रुम त्या स्थळीं अनेक॥ असे वर्णियेलें या परी पुराणीं। परी अजुनी तें पाहिलें न कोणी॥ १॥ बसे त्यांच्या छायेस जरा कांहीं। स्पर्शु न शके लव दुःख तया पाहीं॥ विपुल लाभे सुख शांति त्यास खास। होई मन ची सर्वही सफल आस॥२॥ असे नंदनवन फक्त एक नाकीं। असति परि तीं किती तरी याहि लोकीं॥ सूक्ष्म बघतांची विचार करोनी। कुणाच्याही तें येइ तदा ध्यानीं॥ ३॥ सुगुणि लाभति सत्पुत्र ज्या घरास। दिव्य नंदन-वन तेंच होय खास॥ पुत्र हेची तेथील कल्पवृक्ष। हाच अनुभव देतसे जगा साक्ष॥ सुखद त्याचा सहवास हीच छाया। लवहि बाधेना दुःख तया ठाया॥ सदा व्यापी आनंद त्या घरास। पूर्ण लाभे सुख शांति मानसास॥ ५॥

यांचा एकादा काव्यसंग्रह किंवा काव्यपुस्तक प्रकाशनांत आलेलें नाहीं. तथापि जुन्या कवींची काव्यसंपदा डोळ्यांपुढें येतांच कविवर्य मोये यांची-हि आठवण झाल्यावांचून राहाणार नाहीं.

* * *

क. व्यंकटेश अनंत नार्वेकर

क. नार्वेकर हे सांगें येथील राहाणारे असून त्यांचा पेशा शिक्षकाचा होता. काव्याचा फार नाद असल्यानें त्यांनीं कविता बरीच लिहिली आहे. अभंग, ईश्वरस्तुति, झुलवे, आरत्या अशा निरनिराळ्या काव्याची त्यांकडून निर्मिती झाली; तथापि त्यांचें प्रकाशनांत आलेलें महत्वाचें एकच काव्यपुस्तक म्हणजे कवितावद्ध मराठी व्याकरण

मराठी कवितावद्ध व्याकरण—यांत स्वर, व्यंजनें, वाक्यें वगैरे संबंधींची माहिती विविध वृत्तांतून व्यवस्थित लिहिली आहे. आकार क्राउन, पृ. ३२ मूल्य ५॥ आणे मुद्रक-भारत प्रेस कं., स. १९२३.

* * *

क. दत्ता रघुनाथ मोरजकर, (सांगें)

अष्टोत्तर शतावली—अभंग, पदें, स्तोत्रें अशा संकलनात्मक काव्यांचें हें त्यांचें एकच पुस्तक प्रकाशनांत आलें आहे. पृ ५१. मुद्रक संगमोदय प्रेस, सांगें.

* * *

क. जयवंत घनःश्याम मळकर्णेकर

श्री. मळकर्णेकर यांचा पेशा वकिलीचा असला तरी ते साहित्यक्षेत्रांत विशेष परिचित आहेत कवि म्हणून. यांच्या काव्याचें वैशिष्ट्य म्हणजे मार्मिकता. यांची कविता लहानशी असली तरी ती सुरस नि मार्मिक असते. गोमंतकीय व बाहेरीलहि अनेक नियतकालिकांतून यांच्या कविता प्रकाशनांत आल्या व येत आहेत. स्फुट कवितांची संख्या मोठी असली तरी अजून त्यांचा एखादा काव्यसंग्रह मात्र प्रकाशनांत आलेला नाहीं. दीर्घ काव्याचें प्रकाशनांत आलेलें यांचें एकच पुस्तक म्हणजे 'मानिफेस्त लीलामृत'.

मानिफेस्त लीलामृत – कवि ज. घ. मळकर्णेकर, केपें. प्र.–भारत प्रेस, लहान आकार पृ. ३४, मूल्य १ आणा, सन १९३६.

श्रीशांतादुर्गा वंदन – कवि–मळकर्णेकर व बोरकर, प्र.-श्री. ज्ञानेश्वर का. शे सांवर्डेकर, सांवर्डे. पृ. ८, मु.-नाडकर्णी ॲंड सन्स, मडगांव

कविवर्य मळकर्णेकर यांच्या अनेक कविता भारतमित्रांत प्रसिद्ध झाल्या असून त्यांपैकीं 'सद्‌भाग्य' ही एक नमुन्यादाखल येथें देतों.—

"दिसे यावें धांवून भाग्य वेगें। जुगाराच्या कुणि लागतात मागें ॥ आस खोटी ही करी द्रव्य नाश । खरें येतें सद्‌भाग्य सावकाश ॥१॥"

* * *

क. अनंत रा. शिवेंकर

'कवि आनंद' याच नावानें यांच्या कविता प्रसिद्ध होत असत. याचा काव्यसंग्रह किंवा काव्य पुस्तक असें कांहीं प्रकाशनांत आलें नाहीं. कांहीं नियतकालिकांतून फक्त स्फुट कविताच तेवढ्या प्रसिद्ध झाल्या आहेत.

* * *

क. पांडुरंग महादेव मराठे

सुवचनमाला — मराठे यांचें हें एकच पुस्तक प्रकाशनांत आलेलें आहे. प्रपंच व परमार्थ या संबंधीचें हें काव्यपुस्तक सांगें येथील संगमोदय छापखान्यांत छापून क. मराठे यांनीं स्वतःच प्रसिद्ध केलें.

* * *

क. बाबलो राम कोसंबे

यांच्या भक्तिमार्गप्रद अशा अवघ्याच कविता प्रसिद्ध झालेल्या असून कांहीं अप्रकाशीत असल्याचें कळतें.

* * *

भगवंत पद्मनाभ केणी (असोळणें)

खानापुरच्या गतकालीन लोकमित्र मासिकांत यांच्या कविता येत असत.

* * *

की. विठ्ठल वामन गोसावी

आमोणें (केपें) येथील हे कवि ओव्या रचण्यांत हुशार होते. यांचीं ओवीबद्ध कित्येक आख्यानें त्यांच्या वारसांच्या दप्तरांत असावीं असें दिसतें.

× × ×

गिरीधर पांडुरंग कामत (असोळणें)

स्फुट काव्याशिवाय यांच्या दप्तरांत कांहीं दीर्घ काव्येंहि होतीं असें कळतें.

\+ + +

क. राजाराम यशवंत मळये

ओवीबद्ध काव्यांत यांची लेखणी कुशल होती.

क. दत्तात्रेय तुकाराम पणशीकर

जुन्या जमान्यांतील हे एक चांगले कवि असून अनेक जुन्या मासिकांतून त्यांचें काव्य प्रसिद्ध झालें आहे. हे पेडणे येथें राहाणारे असले तरी त्यांचा स्नेहसंबंध गोव्याबाहेरच विशेष होता.

कविवर्य पणशीकरशास्त्री यांचीं चार पांच काव्यपुस्तकें प्रकाशनांत आलीं आहेत. त्यांचें पहिलें पुस्तक स. १८९० सालीं निघालेलें 'आनंदलहरी'.

आनंदलहरी—हें पुस्तक मुंबई येथें छापून पु. शि. प्र. देसाई यांनीं सन १८९० सालीं प्रसिद्ध केलें. पृ. १२२, मूल्य १२ आणे.

कुमार सन्मार्गदीपिका — कुमारांना बोधप्रद अशी सुंदर माहिती यांत आली आहे. काव्यरचना साधी पण वेधक आहे. मूल्य ६ आणे. या पुस्तकाचें मुद्रण व प्रकाशन सन १९१५ सालीं मुंबई येथें मनोरंजन प्रेसांत झालें.

कुमारिका सन्मार्गदिपीका — सन १९२३, प्रकाशक-केशव भिकाजी ढवळे, पृ. १४, मूल्य दीड आणा.

जामातास नजराणा — प्रकाशक-वि. ग. शेंबेकर, पुणें, सन १९२३, पृ. ३०, मूल्य ५ आणे.

बापाचा सासूरवासिनीस हितबोध - प्र.-वि. ग. शेंबेकर, पुणें, सन १९२४, पृ. ४०, मूल्य ६ आणे. सदरील चार पुस्तकें शाळाखात्यांत मंजूर झालीं होतीं. × × ×

क. वासुदेव लक्ष्मण पणशीकर

संस्कृत श्लोक व नंतर प्राकृत ओव्या अशा पद्धतीनें क. पणशीकर यांनीं निरनिराळ्या ९ पूजा व कथा लिहिल्या आहेत. पुस्तकांचें स्वरूप पोथीचें आहे.

ऋषिपंचमी पूजा व सार्थ कथा — मूल्य ४ आणे.

सोमवती पूजा व सार्थ कथा ४ आणे **संकष्टी पूजा** ४ आणे, **श्रीकृष्णजन्माष्टमी** ४ आणे, **शिवरात्री** ४ आणे, **वरदलक्ष्मी** ४ आणे, **मंगलागौरी** ४ आणे, **वामन द्वादशी** ४ आणे, **पिठोरीव्रतपूजा** ४ आणे.

विवाहदर्पण - मूल्य ३ आणे.

श्रीतुकारामाची गाथा—हें त्यांचें ११ वें पुस्तक, याचीं किंमत दीड रुपया होती.

सर्व पुस्तकें निर्णयसागर प्रेसचे मालक शेठ पांडुरंग जावजी यांनीं छापून मुंबई येथेंच प्रसिद्ध केलीं. × × ×

व्यंकटेश बाळकृष्ण भट

श्रीदेवकीकृष्ण स्तोत्र - माशेल येथील व्यंकटेश भट यांनीं रचलेलें हें स्तोत्र त्यांनीच प्रसिद्ध केलें असून भाविकांच्या नित्य पाटांत आढळतें. + + +

क. यशवंत सूर्यराव सरदेसाई

कविवर्य यशवंत सूर्यराव सरदेसाई उर्फ भाई देसाई यांचें जन्मगांव विर्डी; पण त्यांचें वास्तव्य मडगांवलाच असे. मडगांवच्या सार्वजनिक कार्यक्षेत्रांतील त्यांचें कार्य फार महत्वाचें आहे. निसर्गतःच त्यांचा काव्याकडे ओढा होता. निर्निराळ्या गोव्यांतील मासिकांप्रमाणेंच मनोरंजन, चित्रमयजगत् इ. बाहेरच्या नियतकालिकांतून त्यांच्या बऱ्याच कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांचें काव्य सुरस नि वेधक आहे.

क. सरदेसाई यांनीं स्फुट काव्य बरेंच लिहिलें असलें. तरी त्यांच्या काव्याचा एखादा संग्रह अजून प्रकाशनांत आलेला नाहीं.

सन १९३३ सालीं लिहिलेली त्यांची एक 'माझी आवड' नावांची कविता—

"तोचि हृदयिं सज आवडे। तयावरी मम प्रिति जडे ॥धृ०॥ भूतमात्र जे देखे नयनी। भगवंताची मूर्तीच मानी। तया-पदतळीं जीव घालुनी। टाकीं मग पाऊल पुढें ॥१॥ काया वाचा मन झिजवोनी। जगाचिया सुख शांति लागुनी। झटे निरंतर तत्त्वज्ञ मुनि। बोला आधीं कार्य घडे ॥२॥ सत्कार्याचा भरण्या पाया। गाडुनि घेई अपुली काया। यशोमंदिरावरिल कळस या। करुनी इतरां स्वतः दडे ॥३॥ अंकुर येतां बीज न उरतें। फळ दिसतां फुल गळुनी पडतें। चंद्र खुलवुनी रविमुख लपतें। सृष्टीचे हे गिरवी धडे ॥४॥"

क. दत्तात्रेय व्यंकटेश पै

एक प्रसिद्ध पत्रकार म्हणून जनतेला पै यांचा चांगला परिचय असला तरी ते कवि आहेत याची पुष्कळांना माहिती नाहीं. यांचें काव्य, अल्प पण मननीय आहे. 'महात्माजींस नमन' ही त्यांची कविता पहा—

"बहू जाहले या जगीं लोक थोर। परी मोहिनी मोहनाची अपार। धरी कस्तुरीही शिरीं ज्या सुगंधा। नये त्या महात्म्यास गांधीस वंदा॥ जरी कर्मचंद्र असे पितृस्थानीं। निघे कर्ममार्गी जगा सूर्यस्थानीं। सुकार्यी सदा मग्न ना लेश थारा। नमस्कार गांधीस त्या कर्मवीरा॥ धरीना करी शस्त्र हिंसात्म अस्त्र। परी निर्मितो जो नवें युद्धशास्त्र। जया पूतळा वाहि पोटीं सुपुत्रा। नमस्कार गांधीस त्या शांति मित्रा॥ करी दीनकार्यार्थ सर्वस्व त्याग। चतुर्वीध कारावरी कष्ट भोग तुरुंगांत राही तरी देई स्फूर्ती। नमस्कार गांधीस त्या त्यागमूर्ती॥ स्वदेशा स्वबंधूंस स्वातंत्र्ययुक्त। कराया झटे आणि होई समर्थ। अशा पुंगवांमाजि जो सर्वश्रेष्ठ। नमस्कार गांधीस त्या तत्त्वनिष्ठ॥ नवें श्रेष्ठ अर्पी जगा तत्त्वज्ञान। मनूमाजि जो वंद्य साऱ्या म्हणून। ठरे पूज्य संतांहि देशीं विदेशीं। नमस्कार गांधीस त्या तेजराशी॥ शठाशीं धरा शाठ्य हें तत्त्व हीन। जनां कारणें आत्मशक्ती विहीन। शठत्वांशिंही सत्य संदेशि जो त्या। नमस्कार गांधीप्रती आत्मजेत्या॥ प्रभू सत्य या लागिं मानी अभिन्न। पथीं देइ तत्प्राप्तिच्या आद्य स्थान। अहिंसेस, त्यागास साध्या विशारा। नमस्कार गांधीस सत्यावतारा॥ विविद्वत्सभा श्रेष्ठ साम्राज्यकार। शिरोधार्य मानीति नंगा फकीर। सुसत्कार श्वेतांहि ज्या राजवंद्या। नमस्कार गांधीस त्या विश्ववंद्या॥ जवाहीर, मोती नमीती जयाला। स्तवा ना अधीकार पैचा तयाला। परी धार्ष्ट्य केलेंचि होईल प्राप्त। क्षमा गांधीजी पायिं जी याचि दत्त॥"

× × ×

प्रा. अ. का. प्रियोळकर

प्रा. अनंत का. प्रियोळकर यांनीं अनेक मासिकांतून विविध कविता लिहिल्या आहेत. यांची कविता भारदस्त स्वरूपाची आहे. स्वतःच्या कवितांचा यांचा स्वतंत्र संग्रह प्रकाशनांत आल्याचें दिसत नाहीं. तथापि जुन्या काव्याचें प्रयत्नपूर्वक संशोधन करून अनेक ग्रंथ यांनीं संपादित केले आहेत व मराठी संशोधन मंडळातर्फे ते प्रकाशीत झाले आहेत. त्यांत पुढील काव्यग्रंथ विशेष उल्लेखनीय आहेत :-

१ रघुनाथ पंडितकृत दमयंती स्वयंवर २ मुक्तेश्वरकृत महाभारत ३ अमृतानंद विरचित योगराज टिळक ४ मोरोपंतांचे समग्र ग्रंथ ५ नवनीत (अठरावी आवृत्ति) **६ नलदमयंती स्वयंवर ७ फ्रेंच कथांचें मराठी पुराण ८ खिरस्ताचें यातनागीत ९ खिरस्ताचें वधस्तंभारोहण १० गंगामहात्म्य ११ मुसलमानी जुनी मराठी कविता १२ संत आंतोनीची जीवितकथा १३ मोरोपंती** स्त्रीगीतें १४ मोरोपंतांचीं (बारा) स्फुट काव्यें इ.

× × ×

क. वि. का. प्रियोळकर

श्री. वि. का. प्रियोळकर यांचें काव्य वेधक व मार्मिक आहे. त्यांनीं आपल्या स्वयंसेवक मासिकांतून अनेक कविता लिहिल्या आहेत. त्यांपैकीं 'देसांदमहात्म्य' हें त्यांचें खंडकाव्य विशेष प्रसिद्ध आहे. या खंडकाव्याचें पुस्तक त्यांनीं सन १९५१ सालीं मुंबईच्या युनिटी प्रेसमध्यें छापून घेऊन प्रसिद्ध केलें. त्याची पृ. १९४ आहेत. त्यांतील १२व्या अध्यायाच्या कांहीं ओव्या :-

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यैनमः श्रीदेसांदेश्वरायनमः । शरणागताचें रक्षण । हेंचि देसांदेश्वराचें ब्रीद जाण । समयीं तो वेंचिल प्राण । निज भक्तांचिये कारणें ॥१॥ तो आपुल्या उपासकांसि । सर्वथा न विसंबेल परियेसि । जैसि माय निज अर्भकासि । हृदयीं तैसा धरील पैं ॥२॥ त्याच्या अनुग्रहासि पात्र झाला । तो भिक्षादेहीपंथें चालला । जैसा उतरणी गाडा सोडिला । गडगडाट करोनि जातसे ॥३॥ वृक व्याघ्रांचिये समान । स्वभाव ज्यांचे क्रूरजाण । ज्यांहि गोड शब्द आमरण । न उच्चारिला एकहीं ॥४॥ जे इंदेपेंदेंति स्वतःसी बोलती । अन्यासि कधीं मागों नेच्छिती । किंवा निज शीर्ष कोणापुढती । न लवविति जन्मांतीं ॥५॥ ऐसे स्वाभिमानी नरशार्दुल । देसांदेश्वरापुढें वांकवाल । तैसे वांकती गा खुशाल । मऊ मेणापरीस पैं ॥६॥ सुप्तावस्था स्वाभिमानासि । प्राप्त होते तात्काळेंसि । मानापमानाच्या गोळ्यासि । गुंडाळोनि ठेवितसे ॥७॥ देसांदेश्वराचा जा परिवार । जुविजापासोनियां ओफिशियाल समग्र । भासतसे तयासि ईश्वर । नम्रीभूत होतसे ॥८॥ कुणी ओफिसिआल दिसतां मार्गावरी । धरणीपर्यंत वांकोनि सत्वरी । शंभर नंबरी आदेउस करी । कृपा व्हावी म्हणोनि ॥९॥ लगेचि खिशांत घाली हात । विडी काढोनि ओफेरेसेर करीत । फस्क घेवोनि पेटवित । नम्र किंकर होवोनि ॥१०॥ मग इस्क्रिव्हावांचे घरीं जाई । बाह्यप्रांतीं तिष्ठत राही । तो भेटतां तयासिहि । गोड शब्दें आळवित ॥११॥

* * *

पं. महादेव शास्त्री जोशी

नामवंत ग्रंथकार आणि सुप्रसिद्ध कथाकार या नात्यानें मराठी वाचकांस सुपरिचित असलेले पं. जोशी हे एक प्रतिभासंपन्न कवीहि आहेत. पुण्याच्या चैतन्य मासिकाचे संपादक कोल्हटकर शास्त्री यांनीं प्रसिद्ध केलेलें पं. जोशी यांचें सुलभ काव्यशास्त्र पुस्तक तर काव्याच्या नवीन अभ्यासूंना फार उपकारक वठलें आहे. यांच्या काव्यपुस्तकांतील मुलांचा नित्यपाठ, गोकुळच्या गौळणी, गोड स्त्रीगीतें यांचा सर्वसाधारण वाचकांनाहि ठीक परिचय आहेच; पण नवनीत रामायण, नवनीत भारत हीं पुस्तकेंहि सर्व दर्जाच्या वाचकांत फार प्रिय आहेत.

सुलभ काव्यशास्त्र-प्रकाशक-वा. शि. कोल्हटकर, पुणें.

मुलांचा नित्यपाठ - यांत स्तोत्रें इ. विविध संकलन आहे. पृ. ४४, मूल्य ८ आणे. प्रकाशन १९४६.

गोकुळच्या गौळणी-अनेक गौळणींचें संपादकीय भाष्यासह सुंदर संकलन. स. १९४९, आदर्श मुद्रण-पुणें, पृ. ८६, मूल्य २ रु.

गोड स्त्रीगीतें - अनुसूया, गौरीचें माहेर, भिल्लीण, कोकिळा, फुलांचें भांडण, अभिमन्यु, रुक्मांगद-मोहिनी, चिंधी, सतीचा अध्याय, अधिकमास अशीं १० काव्यें आरंभीं कथासूत्र व परिचय गद्यांत देऊन संकलीत केलीं आहेत. संपादक-पं. महादेवशास्त्री जोशी. प्र.-सौ. सुधा म. जोशी, ज्ञानराज प्रकाशन-पुणें, स. १९४९, पृ. १०१, मूल्य २ रु.

ज्ञानेश्वरी प्रवेशिका-ग्रंथराज ज्ञानेश्वरींतील प्रत्येक विषय ज्ञानेश्वरांच्याच शब्दांत पण गद्यांत लिहून त्यांतील रसाळ ओव्या मुळांतूनच दिल्यानें या पुस्तकाला विशेष महत्व आलें आहे. ज्ञानेश्वरीच्या अंतरंगाचा हा आकर्षक परिचय म्हणतां येईल. प्र.-सौ. म. अ. गाडगीळ, मंगल साहित्य प्रकाशन-पुणें. स. १९४७, पृ. १०२, मूल्य २ रु.

नवनीत रामायण-बालकांड, अयोध्याकांड, अरण्यकांड, किष्किंधाकांड, सुंदरकांड, युद्धकांड व उत्तरकांड अशा सात प्रकरणांतून यांत रामायणकथा दिली आहे. लेखकानें अगदीं सरळ पद्धतीनें सबंध रामायण यांत थोडक्यांत लिहिलें असून श्रीधरकृत रामविजय, मुक्तेश्वरकृत रामायण, निरंजनमाधवकृत चिद्बोध रामायण, वामनपंडितांचें रामायण, एकनाथकृत भावार्थ रामायण, मोरोपंतकृत छंदोरामायण, रामदासरामायण वगैरे संतकाव्यांतून निवडलेले प्रसंग यांत ठिकठिकाणीं घातल्यानें याची रचना फारच वेधक वठली आहे. प्र. वि. ह. दामले, पुणें. स. १९४६, पृ. ९९, मूल्य १॥ रु.

नवनीत भारत—महाभारतांतील कौरवपांडवांचा इतिहास यांत संक्षेपानें देतांना लेखक पं. जोशी यांनीं अनेक संत व पंत कवींच्या काव्यांतील आकर्षक उतारे यांत मोठ्या कुशलतेनें दिले आहेत. मुक्तेश्वरकृत महाभारत, श्रीधरकृत पांडवप्रताप, मोरोपंती भारत अशा लोकमान्य ग्रंथांतील मौलिक उताऱ्यांमुळें या पुस्तकालाहि विशेष महत्व प्राप्त होणें साहजिक आहे. आदिपर्व, सभापर्व वगैरे एकूण १० प्रकरणांत या पुस्तकाची रचना झालेली आहे. प्र.-श्री. द. श्री. गानू, पुणें. मुद्रण-राजगुरु प्रेस. स. १९५३, पृ. २००, मूल्य २॥ रु.

* * *

क. पांडबा दुभाषी

डिचोली येथील पांडुरंग शेणवीं दुभाषी ऊर्फ पांडबा दुभाषी यांच्या स्फुट कविताच तेवढ्या जुन्या मासिकांतून दिसतात.

* * *

क. बा. भ. बोरकर

आधुनिक मराठी काव्यक्षेत्रांत कविवर्य बाळकृष्ण भगवंत बोरकर यांचें स्थान वरचें आहे. मराठी वाचक त्यांना सौंदर्यवादी कवि म्हणून विशेष ओळखतात.

मानवी जीवनांतील सत्य, सौंदर्य, साधुत्व, सामर्थ्य, मांगल्य, प्रेम, श्रद्धा व निष्ठा यांवरच बोरकरांनी प्रेम केलें व जें जें अनुभवलें तें तें प्रांजलपणें काव्यांत प्रगट केलें. गोमंतकांतील निसर्गसौंदर्यानें तर ते गुंगूनच जातात. माझ्या गोव्याच्या भूमींत ही त्यांची कविता पहा—

माझ्या गोव्याच्या भूमींत आंब्या फणसांची रास। फुलीं फळांचे पाझर फळीं फुलांचे सुवास॥ माझ्या गोव्याच्या भूमींत वनश्रीची कारागिरी। पानाफुलांची कुसर। पशुपक्षांच्या किनारी॥ माझ्या गोव्याच्या भूमींत सागरांत खेळे चांदी। आतिथ्याची अगत्याची साऱ्या पड्रसांची नांदी॥ माझ्या गोव्याच्या भूमींत सुखाहुनी गोड व्यथा। रामायणाहुनी थोर मूक उर्मिलेची कथा॥ माझ्या गोव्याच्या भूमींत सारा माझा जीव जडे। पुरा माझ्या कवनांचा गंध तेथें उलगडे॥

आपल्या काव्यसांप्रदायाच्या परिचयांत बोरकर म्हणतात—"ज्या परंपरेवर आपण पोसतों, वाढतों, तिचा वारसा सहजच आपल्या अंगवळणी पडतो. ती प्रतिभा स्वभावच होतो म्हणाना. ज्ञानेश्वर, टागोर, तांबे यांनीं माझ्यावर फार संस्कार केले. त्यांत मराठी संत कवितेचा हातहि थोडा थोडका नाहीं. आरंभापासून जी चांगली कविता माझ्या कानावर पडली किंवा माझ्या वाचण्यांत आली तिनं माझ्या मनांत वेळोवेळीं घर केलं. ती मी धुंद होऊन गुणगुणत राहायचा. तिच्याशीं तन्मय होतांनां तिच्यांतील शक्ति मी आत्मसात करीत गेलों. ज्या ज्या गोष्टींवर मी प्रेम केलं त्यांच्या त्यांच्याशीं मी तन्मय झालों. या शक्तीमुळंच ती आपल्या परीनं माझ्यावर संस्कार करीत गेली; माझ्यांतल्या शक्ति जागवीत राहिलीं. १९३१-३२ मध्यें मी तांबे व टागोर आकंठ प्यालों आणि त्यांनीं माझ्या फुलत्या व्यक्तित्वाला विशाल अशीं नवीं क्षितिजें दाखविलीं."—बोरकरांची कविता.

१९३० ते १९६० हा त्यांच्या काव्यलेखनाचा बहरलेला कालखंड मानला जातो. या कालखंडांत त्यांनीं आपलीं जीवनविषयक, कलाविषयक, सौंदर्यपर, चिंतनपर अशीं अनेक काव्यें लिहिलीं. माझी आगबोट, मातृभूमीची भूपाळी, दुखणाईत दिवा, सूर्याचें प्रेमगीत, सावल्यांचें नृत्य, अमृतपट पारिजात, सांजवेळ, तेथें कर माझे जुळती, प्रतिभेस, दुधसागरास, दीपजागृति, सायंप्रार्थना, आसवांचीं गाणीं, ताज, जळण्यांतहि सुख आहे, अशा किती तरी सुंदर कविता त्यांनीं रसिकांनां सादर केल्या. त्यांच्या पुढील कांहीं निवडक काव्यपंक्ती पहा—

१) जळण्यांतहि सुख आहे ज्वालांतुन फुलण्यांचें। ढळण्यांतहि गुज आहे हित अंतिम कळण्यांचें॥ २) निळ्या जळावर कमान काळी कुठें दुधावर आलीं शेतें। थंडाव्याचीं कारंजीशीं कुठें गर्द बांबूचीं बेटें॥ ३) निवळल्या पायापरी माझें निळावलें मन। चंद्र हेलावे नभांत आणि ओलावे गगन॥

४) काळोखांतच दिसतें खरें। कोण भलें कोण बुरें ॥ पाहिलेंस खूप, आतां उमज। जशी नेक तशी निपज ॥

५) जळल्यावांचुन नाहीं ज्योति। काढल्यावांचुन नाहीं मोती। रडल्यावांचुन नाहीं प्रीति। नच घणावांचुनी देवपणा ॥

६) बाल्य निमालें, सरली मादक तरुणपणाची नवी नव्हाळी। लाख भुकांची, लाख मुखांची आली कानीं हांक विखाळी ॥

७) विहगा जाच उडून। तूं सृष्टीचा राजस राणा। नाजुक गोंडस गोजिरवाणा। शाहिरशाही वा तव बाणा। तान सांवरूनि, गान आवरूनि, लवकर जाच उडून ॥

८) मुलें अनंताच्या कळ्या। प्रकाशाला भुकेलेल्या। छायेखालीं विरसल्या। अंगणांत खेळवोनी फुलविल्या ज्यांनीं। मूक आसवांची त्यांनां सांगा म्हणूं गाणीं ॥

९) तेंथे कर माझे जुळती। दिव्यत्वाची जेथ प्रचीती। यशीं ज्यांनीं देऊनि निजशीर। घडिलें मानवतेंचे मंदिर। परी जयांच्या दहनभूमीवर नाहीं चिरा, नाहीं पणती। तेंथे कर माझे जुळती ॥

१०)वाटामध्यें शिरली गाडी। अन् रात्रीचा पडला पडदा। पण चित्रांची विचित्र वीणा। अजून करिते दिडदा दिडदा।

११) एका झाडाची ही छाया। एका पशूची ही माया। संसाराचे तापत्रय पुरे सुखानें सोसाया॥

१२) तूं तुझाच दीप आणि तूं तुझाच वाट। तूं तुझाच कळस आणि तूं तुझाच घाट ॥

१३) सरेल अपुलीं वाट। तिथें ही लाट अशीच फुटेल। पहांट होतां स्वप्न आपुलें फुलांत ओलावेल ॥

प्रतिभा, जीवन-संगीत, दुधसागर, गोव्याचीं क्रांतिगीतें, चित्रविणा, बोरकरांची कविता, गीतार अशीं त्यांची बरींच काव्यपुस्तकें प्रकाशनांत आलीं आहेत.

प्रतिभा—प्र. का. श्री. नायक, मुद्रण-मनोरंजन प्रेस, मुंबई. १९३०, पृ. ९०, किं. ८ आणे

जीवन-संगीत—प्र.-भारत गौरव ग्रंथ माला-मुंबई, १९३८, पृ. ८६, किं. रु. १-४-०

दुधसागर—प्र. के. भि. ढवळे-मुंबई. १९४७, पृ. ७०. मू. रु. १-१२-०

गोव्याचीं क्रांतिगीतें-प्र. नॅशनल कॉंग्रेस-गोवा, पृ. २५, किं. ०-४-०

चित्रवीणा—मौज प्रकाशन-मुंबई, १९६०, पृ. १००, किं. १ रु.

बोरकरांची कविता—मौज प्रकाशन-मुंबई, प्रथमावृति १९५९. द्वितियावृति १९६८, पृ. ३६४, मूल्य रु. १५.

गीतार—मौज प्रकाशन-मुंबई, १९६५, पृ. १००, मूल्य ४ रु. सन १९६७.

उत्तुंग कल्पना, सौंदर्यदृष्टि, आकर्षक रचना, प्रासादिक घडण, परिणामकारक शेवट, राष्ट्रीय वृत्ति, ध्येयवादी विचारसरणी, अशीं यांच्या काव्याचीं ठळक वैशिष्ट्यें आहेत.

× * ×

सन १९४६ च्या १८ जून रोजीं फिरंगी अमदानींत मडगांव येथील पहिल्या स्वातंत्र्य सभेंत कविवर्य बोरकर यांनीं स्वतः रचून ओजस्वी स्वरांत गायिलेलें स्वातंत्र्यगीत—

स्वातंत्र्याची सिंहगर्जना— त्रिवार मंगळवार ! आजला त्रिवार मंगलवार। स्वातंत्र्याची सिंहगर्जना अतां इथें उठणार ॥ धृ.॥ सह्य पर्वता, भार्गवसिंधो ! उभारुनी हात । लाख मुखांनी ललकारुनियां द्या तिजला साथ ॥ हे राण्यांच्या उठा शिळांनो, लावा लाल टिळे । अन् वायूंनो, फुलवा अमुच्या हृदयांतील इंगळे ॥ कुलेश्वरांनो, या वक्षांतुनि करा त्वरें संचार ॥१॥ लिहिल्या या ज्या ओळी त्यांची वाळली न शाई। डोळे भरुनी तोंच देखिली उडलेली लाही ॥ धन्य लोहिया, धन्य भूमि ही धन्य तिचे पुत्र। धन्य तयांचा त्याग-देखते जनतेचे नेत्र ॥ धन्य होउनी लिहिलेल्यांचा मीही साक्षात्कार ॥ २ ॥ कौल मिळाला, फुटला नारळ, गुढी उभी झाली। आणि माउली, चढला कुंकुम पुन्हां तुझ्या भाल ॥ झडली भीति । चढली नीती, तुटला गे लोभ। सामर्थ्याचा अतां अंतरीं उफाळला क्षोभ ॥ या पुढती तव पायांवरती या रक्ताची धार ॥३॥

★

क. घनःश्याम सांब मळकर्णेकर

जुन्या जमान्यांतील कवींमध्यें हे एक मार्मिक कवि होते. यांच्या कित्येक कविता, सत्संग मोद वृत्त, मधुमक्षिका या मासिकांत व खानापुरच्या लोकमित्रांत प्रसिद्ध झाल्या आहेत. × ×

क. राम गिंडे

यांच्या कांहीं कविता खानापूरच्या लोकमित्र मासिकांत प्रकाशनांत आल्या आहेत. * *

क. म. ग. भट

'दैवज्ञ वल्लभा' नांवाचें यांचें एकच पुस्तक प्रकाशनांत आलें आहे. त्यांत आधीं श्लोक व नंतर टीका दिली आहे. सन १९२९, पृ. ५० मूल्य ०-१२-० + +

क. र. सी. देसाई

'सह्याद्रि खंड' पूर्वार्ध व उत्तरार्थ हा ग्रंथ यांनीं संपादित केला असून तो मुंबई येथें श्री. द. वि. पाठक यांनीं शिवाजी मुद्रणालयांत छापून प्रसिद्ध केला आहे. १९४७, पृ.१२१ मूल्य ३ रु. * *

वैं. शिवा फटू पै आंगले

यांनीं काव्यकुंज नांवाचा कांहीं गोमंतकीय कवींच्या काव्यांचा संग्रह संपादून गोमंतक सा. से. मंडळातर्फे प्रकाशीत केला आहे. सन १९३० कविता ४९, पृ. ८८, कापडी बांधणी, मूल्य १२ आणे. + +

डॉ. वि. बा. एर. देसाई

'उधाहरण कथा' नांवाचें महानुभाव काव्य यांनीं संपादन केलें असून तें मुंबई म. ग्रं. सं. तर्फे प्रकाशनांत आलें आहे. * *

क. वि. का. आजरेकर

'आमुच्या फकिरीबाणा' ही यांची कविता गो. सा. से. मंडळाच्या 'कथाकुंजांत' आली आहे. यांचें काव्य बोधक आहे. × ×

क. भगवंत भास्कर केणी

यांच्या कविता व समस्यापूर्ति मागें खानापुरच्या लोकमित्र मासिकांत येत असत. × + *

न्या. मू. पुरुषोत्तम मंगेश लाड

कविवर्य लाड यांचें जन्मगांव बार्देशचें वागाळी, पण शिक्षण आणि नंतर नोकरी यांमुळें त्यांचें निवासस्थान अखेरपर्यंत गोव्याबाहेरच होतें. रहिवास बाहेर असला, तरी गोव्याबद्दलचा त्यांचा जिव्हाळा कधींच कमी झाला नाहीं. याचें प्रत्यंतर त्यांच्या अनेक काव्यांतून दृगोचर झालें आहे. यांचें काव्य सुरस नि सुबोध असून वाचकांच्या हृदयाचा सहज वेध घेणारें आहे. अनेक महाराष्ट्रीय मासिकांतून आणि भारत-मित्रांतून यांच्या कित्येक कविता प्रकाशनांत आल्या आहेत. माधुरी, मधुपर्क व कृतिका असे यांचे तीन काव्यसंग्रह प्रकाशनांत आले आहेत.

माधुरी—प्र.-द. गो. सडेकर, धनंजय प्रेस, खानापूर. कविता २१, पृ. २५, किं. ०-४-०.

मधुपर्क—प्रकाशक-केशव भिकाजी ढवळे, मुद्रण-मुंबई वैभव प्रेस, मुंबई. सन १९४३, पृ. ९८, किं. १ रु.

कृतिका—प्र.-के. भि. ढवळे, मुद्रण-मुंबई वैभव प्रेस. सन १९४५, पृ. ९२, किं. १॥ रु.

+ + +

क. दामोदर अच्युत कारे

प्रसादयुक्त व भावनावाहक भाषा, कल्पना-शक्तीचा सुरम्य विलास, वेधक उपमा, कल्पना-विलासांनां सुरम्य व सात्त्विक भावनांची जोड यांमुळें काव्यरसिकांनां श्री. दा. अ. कारे यांच्या काव्यांत दिसणारी आकर्षकता आल्हादकारक वाटणें साहजिकच आहे. यांच्या कित्येक कविता रत्नाकर, मनोरंजन, प्रतिभा, पारिजात, भारत-मित्र वगैरे अनेक मासिकांतून प्रकाशनांत आल्या आहेत. तथापि त्यांचा काव्यसंग्रह असा प्रसिद्ध झाला तो एकच 'नंदादीप'.

नंदादीप—कवि-श्री. दा. अ. कारे, प्रकाशक-काशीनाथ श्रीधर नायक, गोमंतक छापखाना मुंबई. गोमंतक सा. से. मंडळ-पुरस्कृत. सन १९३४, कविता ५८, पृ. १०४, मूल्य १। रु. या संग्रहांतील 'नंदादीप' ही खालील कविता पहा—

मृदु करें उजळिला स्वन्मंदिरीं नंदादीप। राहो तेवत संतत तव चरणांसमींप॥ नको तेजावी झळाळी जननेत्र दीपवाया। ठेवीं हृदयीं ओलावा ज्योत पायीं जागवाया॥ नाना रंगी तुज माला अर्पायाला जन किती। दिनभरी कोलाहल दारीं तुझिया करिती॥ शिरावया तयांमाजी अधीर न हा होईल। परी प्रतीक्षा करीत शांत अंतरें राहील॥ येतां निःस्पंद नीरव मध्यरात्रीचा समय। तव पायीं हा ओपील उचंबळलें हृदय॥ तव मुखाभोंवतालीं तेजोवलय विणील। कलेसर्वे अंतरींचे त्यांत भावही गुंफील॥ अपार्थिव किरणांनीं तुझे चरण चुंबील। तेजोलहरी अंतर लोपवितील मधील॥ तुज पाहील स्तिमित अर्धोन्मीलित नयनीं। मूक हृद्गत पाझरो मग सहस्त्र किरणीं॥ संथ. ज्योतीमाजी जागो प्रीति अथांग आंतर। मधुरिमा चांदण्याचीं येवो स्वर्ण-तेजावर॥ लय लागो तें एकांतीं विरो दृश्याचा पसारा। गूढ मंद भाव-दीप्ति भरो मंदिर गाभारा॥

× × ×

सौ. लीलावतीबाई तारकर पेडणेकर

ईशस्तवन, सुस्वागत्, मोद पसरला चोहिंकडे अशा या कवयित्रीच्या तीन कविता गो. सा. से. मंडळातर्फे निघालेल्या 'काव्यकुंजांत' प्रकाशनांत आल्या आहेत. कविता सरळ साध्या व वाचनीय आहेत.

* * *

क. व्यं. वि. वैद्य

श्री. व्यंकटेश विष्णु वैद्य यांचा जन्म सन १९०० सालीं कुंकळ्ळी येथें झाला. शिक्षणानंतर नैसर्गिक कलानेंच त्यांची दृष्टि वाङ्मयाकडे वेधली आणि पुढें काव्य, कथा, कादंबरी, नाटक इ. साहित्यप्रकार त्यांनीं यशस्वीपणें हाताळले. यांचीं कांहीं गद्य पुस्तकें प्रकाशनांत आलेलीं असलीं; तरी ठळक अशीं काव्यपुस्तकें अजून प्रसिद्ध झालेलीं नाहींत. आजपर्यंतच्या कालांत प्रसिद्धी पावलेल्या अशा त्यांच्या काव्यपुस्तिका म्हणजे दोनच; पहिली श्रीमहालसा स्तवनामृत व दुसरी श्रीमहालसा स्तोत्र.

श्रीमहालसा स्तवनामृत – मुद्रक व प्रकाशक–द. गो. सडेकर, धनंजय प्रेस, खानापूर स. १९३२, पृ. ४०, मूल्य ४ आणे.

श्रीमहालसा स्तोत्र – प्र.–श्री. पां. श्रीं. टिल्लु, ललिता प्रकाशन, मुंबई २, स. १९६५, पृ. ३०, मूल्य २५ पैसे.

श्री. वैद्य यांच्या विविध विषयांवरील अनेक कविता गोव्यांतील व बाहेरीलहि अनेक नियतकालिकांतून प्रकाशनांत आल्या आहेत. त्यांची काव्यरचनापद्धत **गोमंतवंदन** या खालील कवितेवरून सहज कळून येईल.

भारत जननी विशाल मानिनी गोमंतक बाला। प्रेमें तिजला प्रभातकालीं करूं वंदनाला ॥ध्रु०॥ पश्चिम सागर हर्षरवानें धूतो चरणाला। शिर्षावरती नीलरत्नमय सह्याद्रीचो माला ॥१॥ झुळझुळ वाहति अंगावरुनी तरंगिणी सु-जला। अघनाशिनि, मांडवी, कुशावति घालाया स्नानाला ॥२॥ चंद्रनाथ गिरि मध्यभागिं हा खडा उभा झाला। श्रीचंद्रेश्वर जागृत राही तुजला रक्षायाला ॥३॥ जणुं दुग्धाचा सागर सुंदर करितो अभिषेकाला। मधुर जलानें शीतल स्नानें ताप तुझा हरिला ॥४॥ कल्पतरूंच्या सुंदर राई धरिती छत्राला। शिरीं भासते चामर ढाळी पुगि-तरुंची माला ॥५॥

* * *

क. द. ता. पेडणेकर

माजी सत्संग मासिकांत यांच्या कांहीं कविता आल्या आहेत.

× × ×

क. वामन नाईक

माजी चित्ताकर्षण मासिकांतून 'माध्यान' ही व इतर कांहीं यांच्या कविता प्रसिद्ध झाल्या आहेत.

* * *

क. वामन ता. मेडणेकर

प्रेमचि विश्वा खुलवितें, मागें फीर तरी रे अतां, रुष्ट बालिकेस अशा यांच्या कविता माजी 'नाभिकोदय' मासिकांत प्रकाशनांत आल्या आहेत.

× × ×

क. बाळकृष्ण अनंत बाके (मडगांव)

गद्यलेखनाप्रमाणेंच यांनीं निरनिराळ्या विषयावर अनेक मासिकांतून पद्यलेखनहि केलें आहे. 'भारतमित्र 'मधूनहि यांच्या कांहीं कविता प्रकाशनांत आल्या आहेत. यांच्या कित्येक कविता मार्मिक व सुबोध आहेत, तशाच कांहीं विनोदीहि आहेत. १९३० सालीं गो. सा. से. मं. तर्फे प्रसिद्ध झालेल्या **काव्यकुंज** मध्यें आलेली 'बालिकेस' ही त्यांची कविता मार्मिक आहे. अजून त्यांचा काव्यसंग्रह मात्र प्रकाशनांत आला नाहीं.

\+ + +

क. वसंत वैकुंठ कारे

मडगांव येथील साहित्यिक श्री. वसंत वैकुंठ कारे यांचा निसर्गतःच काव्याकडे कल असल्यानें त्यांकडून काव्यरचना बरीच झाली आहे. भारत, भारतमित्र, अलंकार, उदय, राष्ट्रमत वगैरे विविध नियतकालिकांतून त्यांच्या ज्या स्फुट कविता प्रकाशनांत आल्या आहेत त्या ध्येय-प्रधान असल्यानें रसिकांनां बऱ्याच आवडल्या आहेत.

'राष्ट्रमत' मध्यें प्रसिद्ध झालेल्या '**जीवन-सार्थक**' या पुढील कवितेवरून त्यांच्या काव्य-रचनेची पद्धत अवश्य कळून येईल –

माय कष्टवुनी जीव जन्मि आला। आणि 'पोरा' चा 'प्रौढ' पुढें झाला॥ परी आला तैसाचि परत गेला। हाय! नर तो भू भार मात्र झाला॥ अमुप संपत्ती मिळविली तयानें। जीव अपुला जगविला विलासानें॥ आयु सरतां परि मृत्युच्या मुखांत। काय अंतर पशु अन् अशा नरांत?॥ धन्य ते नर, कष्टले जे परार्थ। कधीं शिवला नच जयां मनां स्वार्थ॥ देह त्यांचे अदृश्य जरी झाले। कीर्तिरूपें ते अमर जगीं झाले॥ प्रभो, पदकमलीं एक मम विनंती। नको धिक्कारूं तृप्त करीं रे ती॥ देह माझा लोकार्थ नित झिजावा। कोकसेवेतचि मग्न तो असावा॥

कवि कारे यांच्या निसर्गादि अनेक विषयां-वरील कविता प्रसिद्ध झालेल्या असल्या तरी त्यांत राष्ट्रीय व सामाजिक विशेष खुलून दिसतात याचें कारण त्यांचें राष्ट्रावरील आणि समाजावरील अवर्णनीय प्रेम हेंच असावें. *

क. कृ. ह. भ. रेगे

कवळें येथील कवि श्री. कृष्ण हरि भट रेगे यांचा जनतेला ज्योतिषि या नात्यानें विशेष परिचय असला तरी ते एक आध्यात्मिक वृत्तीचे कवि आणि कीर्तनकारहि आहेत. आपल्या कीर्तनो-पयोगी आख्यानांसाठीं त्यांनीं विविध वृत्तांत अशी काव्यरचना केली, तशीच नियतकालिकां-तूनहि निष्ठेनें काव्यसेवा बजावली. आजपर्यंतच्या कालांत कवि रेगे यांच्या खालील चार पांच काव्यपुस्तिका व कांहीं काव्यपत्रकें प्रकाशनांत आलीं आहेत.

इतिहासात्मक श्रीशांतादुर्गा स्तोत्र– प्र.-कृ. ह. रेगे, कवळें. १९६१, पृ. १६, मूल्य २० पैसे.

श्रीशांतादुर्गा स्तोत्र – (श्रीमांगिरीश, महालक्ष्मी स्तोत्रांसह) १९६३, पृ. १६, मूल्य २० पैसे.

श्रीशांतादुर्गा स्तोत्र – (चतुःशताब्दि महोत्सव प्रकाशन) १९६६, पृ. १६, मूल्य २५ पैसे.

मंगलारती – (विविध ३१ आरत्या) १९६७, पृ. १६, मूल्य ३० पैसे.

पुढील श्रीगणपतीच्या आरतीवरून क. रेगे यांच्या काव्यरचनेची वाचकांनां कल्पना येईल—

भावें करूं आरती। गणपती। सतत असों द्या मजवरि प्रीती॥धृ०॥ सुखविं सतत या भारत देशा। आपदा पुऱ्या वारुनि ईशा। श्रीगजवदना ही पदिं विनती॥१॥ * * *

क. बहुगुण अ. कामत वाघ

रायबंदर येथील जुन्या पिढींतील या कवीचें काव्य मुंबईच्या 'महाराष्ट्र सारस्वत' मासि-काच्या १९५०च्या मे-जूनच्या अंकांत आलेलें आहे. सदर अंकांत 'गोमंतकांतील एक अज्ञात मराठी कवि' म्हणून त्यांचा त्यांच्या कवितांसह चांगला परिचय करून दिला आहे. * * *

क. शंकर रामाणी

कविवर्य शंकर रामाणी यांच्या स्फुट कविता अनेक नियतकालिकांतून प्रकाशनांत आलेल्या असून जुन्यांप्रमाणेंच नव्या मासिकांतूनहि त्या येत आहेत. सूर्यफुलें, कातरवेळ, आभाळवाटा असे त्यांचे काव्यसंग्रहहि प्रसिद्ध झाले आहेत.

सूर्यफुलें — सन १९४९, मुद्रक-सदानंद मुद्रणालय-पणजी, प्रकाशक-स्वतः, पृ. २५ मूल्य १० आणे.

कातरवेळ — सन १९५९, मुद्रक-फेमस प्रिं. प्रेस,प्र.-सागर साहित्य प्रकाशन-मुंबई, पृ. ५६, मूल्य १॥ रु.

आभाळवाटा – स. १९६७, मुद्रण-मौज प्रिं. ब्यूरो, प्र.-मौज प्रकाशन-मुंबई, मूल्य ४ रु.

'झाडांच्या हिरव्या कळा' या पुढील कवितेवरून श्री. रामाणी यांची काव्यरचना पद्धत समजून येईल.

झाडांच्या हिरव्या कळा रान मिणमिणलें; धरतीस उन्हाचा ळळा, भान रुणझुणलें... नवतीला झुळझुळ फुटे नजर खडकाळ, पंखांत फितुर गोमटें अ-जुन आभाळ...चांदणें कुंवारुन पिसें, मत्त मनमोर, नसनसांतुनी कवडसे चैत्र-वनभोर ... + + +

क. म. रु. प्रतापराव सरदेसाई

क. महाबळेश्वर रु. प्रतापराव सरदेसाई यांच्या अनेक कविता निरनिराळ्या नियतकालिकांतून प्रकाशनांत आल्या आहेत. अलीकडे मात्र त्यांची लेखणी मंदावलेली दिसत आहे. यांचे स्फुट काव्य बरेंच असलें तरी 'हिरवळ' या एका कवितासंग्रहाशिवाय दुसरा संग्रह प्रकाशनांत आलेला दिसत नाहीं.

हिरवळ – सन १९३०, मुद्रक-ना. अ. पाटणकर, संगमोदय प्रेस-सांगें, प्रकाशक - स्वतः पृ. ४०, मूल्य ६ आणे.

स. १९३०ला प्रसिद्ध झालेल्या 'काव्यकुंज' या संग्रहांतील 'गूढ कोडें' या पुढील कवितेवरून त्यांच्या काव्यरचनेचा सहज परिचय होईल.

नीलनभाच्या गवाक्षांतुनी हळूच डोकावे तारा। तोंच अकस्मात् खळकन् तुटुनी कालमुखीं मिळतो थारा ॥ नाजुक वेलीवरी उमललें सुंदर एखादें फूल। तोंच कुणाच्या निर्दय हाता खुडण्याची तें ये भूल ॥ अमर्याद सिंधूच्या अंकीं जलबुद्बुद प्रेमें नाचे। तोंच पावतो भंग बिचारा आघातानें लहरीचे ॥ प्रिय मातेच्या मांडीवर जो बालक खेळे लडिवाळ। तोंच घालुनी झेंप त्यावरी दूर करी कर्दनकाळ ॥ नवी कल्पना उद्भवते जों एखाद्याच्या चित्तांत। तोंच टाकिती पुसुनी तिजला विचार-संभ्रम इतुक्यांत थकल्या दमल्या जिवास लाभे आनंदाचा कण एक। जाळपोळुनी तोंच करी अहा, दुःखाग्नी त्यातें खाक ॥ दृश्यें असलीं येती चित्तीं एकामागुनी एकेक। हृदय थरारे, नयनहि करिती अश्रूंचा मग अभिषेक ॥ कां चालावा जगतामाजी भीषण ऐसा हा खेळ। कुंठित होई मति या प्रश्नें घालाया नच ये मेळ। * * *

क. रा. ना. सुजाक

क. राघोबा नाईक सुजाक यांचें ओवीबद्ध **रामचरित्र** कांहीं कालापूर्वीं प्रकाशनांत आल्याचें कळतें; पण विशेष माहिती मिळत नाहीं. ×

क. सौ. सीताबाई कुंडईकर

पणजी येथील सुप्रसिद्ध धेंपे घराण्यांत सन १८८७ सालीं यांचा जन्म झाला आणि श्रीमान् शिवराम शेणवीं कुंडईकर यांच्याशीं विवाहबद्ध होऊन त्या सन १८८६ सालीं कुंडई येथील नामवंत कुंडईकर घराण्यांत आल्या. उभय घराणीं सुखवस्तु असल्यानें त्यांचें जीवन केवळ ऐषआरामांत जावयाचें; तथापि क. सीताबाई या जात्याच आध्यात्मिक वृत्तीच्या व समाजप्रेमी असल्यानें धार्मिक व सामाजिक ग्रंथवाचनाकडे त्यांचें लक्ष अधिकाअधिक वेधलें जाऊन त्यांनां काव्यरचनेची स्फूर्ति झाली आणि त्यांकडून बरीच काव्यनिर्मिती झाली. या त्यांच्या काव्यांत आध्यात्मिक कविताच विशेष आहेत. सुप्रसिद्ध साहित्यिक रा. कृ. कामत चंदगडकर यांनीं लिहिलेल्या त्यांच्या चरित्रांत जो त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध झाला आहे. त्यांत पदें, अभंग इ. त्यांच्या निवडक २१ कविता आल्या आहेत. खालील अभंग त्यांपैकींच एक आहे.

दाशरथी राम, तोचि आत्माराम। आनंदाचें धाम हृदयस्त ॥ मुकुंदकृपेनें फेरा चुकविला। राम तो भेटला अंतर्यामीं ॥ सीताबाई म्हणे वेगीं त्वरा करा। चरण ते धरा मुकुंदाचे ॥ *

क. वामन शिवराम कुंडईकर

कविवर्य वामन शिवराम कुंडईकर हे कै. सौ. सीताबाई कुंडईकर यांचे पंचम पुत्र. यांचा जन्म सन १९१० सालीं झाला. आध्यात्मिक वृति आणि काव्याची आवड यांचा वारसा त्यांनां मातोश्रींकडून लाभला. या उपजत गुणांनां आवश्यक असें सशास्त्र संस्कृत व मराठी शिक्षण मिळाल्यानें त्यांचा योग्य विकास होण्यास ठीक मदत झाली.

क. कुंडईकर यांच्या काव्य संपदेंत सामाजिक व राष्ट्रीय कवितांपेक्षां आध्यात्मिक कवितांची संख्याच अधिक आहे. स्फूर्तीप्रमाणें त्या त्या वेळीं रचण्यांत आलेल्या कविता त्यांच्या हस्तलिखितांच्या वहींत लिहिलेल्या असल्या तरी त्या प्रकाशनांत आल्याच पाहिजेत अशी त्यांनां फारशी उत्कंठा नसते, त्यामुळें प्रसिद्धीस आलेल्यांपेक्षां अप्रसिद्ध स्थितींतच त्यांच्या कविता अधिक असाव्यात असें वाटतें. भारतमित्रादि गोव्यांतील आणि ध्रुव इ. पुण्या मुंबईकडील मासिकांतून यांच्या कित्येक कविता प्रसिद्ध झाल्या आहेत. इ. भ. प. कामतकृत सौ. सीताबाई कुंडईकर यांच्या चरित्रांत त्यांच्या विविध विषयांवरील सदतीस कविता प्रकाशनांत आल्या आहेत. खालील 'गीतासार' हा त्यांची कविता त्यांपैकींच एक आहे—

कर्मफल वासना- सोडिं बापा। मानवा देत जी त्रिविध तापा ॥धृ॥ आसक्तिहिन कर्म, तेंचि गा निष्कर्म। सांगतों वर्म तुज शत्रुतापा ॥१॥ कमल उदकीं जसें। चित्त कर्मीं तसें। ठेवितां भोगिसी शांति अनुपा ॥२॥ कूर्मपादांवरी इंद्रियां आवरीं। विषयसुख हा दरा जाण तूं पां ॥३॥ सर्व कर्ता हरी, उमजुनी अंतरीं। त्यजुनि शोका करी घेइं चापा ॥४॥ पार्थ प्रियमित्र तूं, म्हणुनि तुज गौप्य हें। सांगुनि दावितों विश्वरूपा ॥५॥

क. बाबन शेणवीं शिरवईकर (केपें)

यांच्या कांहीं कविता जुन्या सत्संग व चित्ताकर्षण मासिकांतून आणि भारत पत्रांतून प्रकाशनांत आल्या आहेत.

क. परशुराम जनार्दन केणी कुंकळ्ळी

यांच्या कविता माजो लोकमित्रांत प्रसिद्ध झाल्या असून त्यांच्या संग्रहांत अप्रकाशितहि कांहीं असाव्या असें वाटतें. हे बरेच काव्यरसिक आहेत.

* * *

कवि वासुदेव भास्कर नायक

स्व. क. वासुदेव भास्कर नायक तथा रंगनाथ नायक हे रिवण येथील रहिवासी असले तरी न्यायालयांतील नोकरीमुळें त्यांचें निवासस्थान फार कालपर्यंत केंपें येथेंच होतें. साहित्यक्षेत्रांत प्रवेशण्याची स्फूर्ति देखील त्यांनां केंपें येथेंच झाली. दि. १६ मे १९०२ रोजीं त्यांचा जन्म झाला आणि ५ जून १९४९ रोजीं मृत्यु ओढवला. त्यामुळें त्यांनां आयुष्य अवघें ४७ वर्षें लाभलें. सन १९२८ सालीं म्हणजे वयाच्या २६व्या वर्षीं मराठी साहित्यक्षेत्रांत प्रवेशण्याची यांनां ओढ लागली आणि जीवनाच्या अंतापर्यंत २१ वर्षे त्यांनीं मराठी सारस्वताची एकनिष्ठतेनें गद्यपद्यादि विविध प्रकारांनीं सुरेख सेवा बजावली. काव्य, कथा, कादंबरी, निबंध, नाट्यछटा, नाट्यसंवाद, टीका वगैरे कोणतेंहि मराठी साहित्यमंदिराचें दालन यशस्वितेनें हाताळल्यावांचून त्यांनीं सोडलें नाहीं.

क. नायक यांचें विविध साहित्य निरनिराळ्या पत्रांसएक नियतकालिकांतून प्रसिद्ध झालें आहे. पार्तुगीज रिपब्लिक, कर्नाटकचा प्रवास, पो. रि. व गोमंतकीय हिंदु, उत्तर हिंदुस्थानची सफर, गोव्याचा ऐतिहासिक टिपणें, आश्रिता, पो. हिं.चा सं. इतिहास, जगण्याची कला, चरकांतील चिपाडें अशीं त्यांनीं अनेक गद्य पुस्तकें लिहिलीं आणि मठकर पुराण, न्यायपुराण, मानिफेस्त पुराण ब्लॅक मार्केट पुराण अशीं त्यांचीं चार काव्यपुस्तकें प्रकाशनांत आलीं. हीं चारहि मार्मिक, विनोदी, मजेदार पण उद्बोधक आहेत. शेवटच्या दोन काव्यपुस्तकांनीं तर त्या वेळीं मोठी खळबळ उडवून दिली. विविध वृत्तांत व विविध नियतकालिकांत यांच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या असल्या तरी आपल्या चारहि काव्यपुस्तकांची रचना त्यांनीं ओवी वृत्तांतच केली आहे.

मठकर पुराण—सन १९३४, प्र.—निर्भीड प्रकाशन-मुंबई, पृ. १६, मूल्य ०-२-०.

न्यायपुराण—स. १९३५, प्र.-द. गो. सडेकर-खानापूर, पृ. २०, मूल्य ४ आणे.

मानिफेस्त पुराण—स. १९३६, प्र.-ना. भा. नायक, रिवण, पृ. ३२, मूल्य ४ आणे.

ब्लॅक मार्केट पुराण—स. १९४८, प्र.-गो. पुं. हेगडे देसाई, केंपें, मोठा आकार, पृ. ४०, किं. १० आणे.

क. नायक यांच्या ब्लॅक मार्केट पुराणांतील कांहीं ओव्या :—

पोळें नामक गांवांत। जिथें फिरंगी हद्द संपत। तेथें होता राहात। पागी एक जातीचा ॥१॥ नांव तयाचें खेमू तारी। तयासी असती दोन नारी। दोघीहि सवती जरी। प्रेमभरें नांदती ॥२॥ वडील जायेसी नव्हतें संतान। म्हणोनी केलें दुजें लग्न। धंदा करोनी निर्विघ्न। संसार चालवी आपुला ॥३॥ सुक कायदा कारबारवर। लादितें झालें कॉंग्रेस सरकार। खेमूचा तैं वाढला जोर। झाला गबर पागी तो ॥४॥ भरोनी रायभान्यांची भर। गोव्याच्या हद्दीसमोर। थाटिले दोन गुत्ते थोर। गांवठी दारू विक्रीचे।५॥ खुद्द कारवारचे प्रतिष्ठीत नर। सुंकेरी सदाशिवगडचे इतर। कोडीबाग माजाळीचे सटर फटर। गुत्त्यावरी नित्य येतां॥६॥ अस्तास जातां अंशुमाळी। पोळ्यांत नित्य चाले

दिवाळी। ब्रम्हानंदीं लावण्या टाळी। करिती सारे सुरापान ॥७॥ एक मागे फेणी। दुजा म्हणे येती घाणी। मिसळोनियां सोडापाणी। मासियेर देईजे ॥८॥ रात्रौ साडे आठ वाजतां। घरीं जाण्यासी निघतां। हेलकाविती सारा रस्ता। मोज माप घेउनी ॥९॥ दारूचा करितां व्यापार। खेमू झाला गबर। पैसा मिळविला अपार। पुंजीवाला झाला तो ॥१०॥ इतक्यांत ब्लॅक बाजार। सुरू झाला दुनियेवर। तांदुळ खरिदण्या वारंवार। पोळयांत जाती गोवेकर ॥११॥ खेमूची व्यापारी नजर। स्थिरावली त्या गिऱ्हाइकांवर। मग करिता झाला ब्लॅक बाजार। उभय गुत्ते राखुनी ॥१२॥ काणकोणांत मिळणारी दारू। सर्वे लागला पिपांत भरूं। जोरांत केला सुरू। चोरटा व्यापार दारूचा ॥१३॥ पोळेंच्या मेटासमोर। दर्याच्या निवांत वेळेवर। चिरेबंदी असे घर। तया खेमू पाग्याचें ॥१४॥ कारवार माजाळीचे लोक। अचूक येती खेमूसमीप। पिपांवरी पिप। शेंकड्यांनीं खरिदती॥१५॥ सर्वे आणिती तांदुळ। परत जातां नेती नारळ। किनाऱ्याच्या नावा सकळ। असती अनुकूल तयांसी ॥१६॥ त्या नौकांत भरून। मद्यपिपें नेती चोरून। तुफानहिं दुर्लक्षून। सफर करिती काळरात्रीं ॥१७॥ तांदळांचे गरजू येती। खेमूचे पाय धरिती। म्हणती आणिली गाडी रिती। नच पाठवूं परत ॥१८॥ ऐशा अडल्यांच्या माना। तो मुरगाळी नलगतां क्षणां। दिडी दुप्पटीनें द्रव्य जाणा। रोख ठोक घेई मोजून॥१९॥ इतक्यांत वितुष्ट आलें। खेमूनें कारकुनासी घालविलें। फिर्याद-अर्जी सादर केलें। हां हां म्हणतां कारकुनें ॥२०। पोलीस घेउनी कामदार। आला पोळेंच्या किनाऱ्यावर। भर दुपारीं बुस्कार घर केलें खेमूचें ॥२१॥ तांदुळ मद्यासह चोरटा माल। तिथें सांपडला विपूल। पोलीस घेती ताब्यांत सकळ। भरलीं शंभर खेमूचीं ॥२२॥ मग करितां आप्रेसांव। बंद पडोनी कुरासांव। न घेतांहि देवाचें नांव। खेमू गेला यमपुरीं॥२३॥ घरादाराचा झाला लिलांव। गृहिणींनाहि पडलें लिसांव। अंतीं खेमूचें नांव गांव। लोक सुद्धां विसरले ॥२४॥

× × ×

क. गोंदजी नाईक

हे सांखळी येथील जुन्या जमान्यांतील कवि लावणी करण्यांत तरबेज होते. यांच्या लावण्या गोव्यांतील जुन्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत.

\+ + +

क. बाळकृष्ण जगन्नाथ नाटेकर

म्हापशें येथील या कवीनें गवळणकाला व बाजीराव मस्तानी नाटक या आपल्या पुस्तकांतून सुंदर पदें लिहिलीं आहेत. या पुस्तकांची माहिती गद्यवाङ्मयाच्या इतिहासांत येणार आहे.

* * *

क. वासुदेव जगन्नाथ नाटेकर

यांनीं आपल्या संगीत हरिश्चंद्र नाटकांत रचलेलीं पदें ठीक आहेत.

\+ + +

प्रा. मनोहर ल. सरदेसाई

मार्मिक, वेधक नि बोधक, मराठी तशाच कोंकणी कविता रचण्यांत सुप्रसिद्ध साहित्यिक कविवर्य प्राध्यापक मनोहरराय सरदेसाई मोठे पटाईत आहेत. यांची कविता पाहिली म्हणजे काव्यरसिकच नव्हे; तर अरसिकहि ती वाचल्यावांचून सोडणार नाहीं इतकी ती हृदयाला भिडणारी असते. अशा त्यांच्या अनेक कविता विविध नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांचा संग्रह प्रकाशनांत येणें आवश्यक आहे. '**सुंदर माझा गोवा**' ही सरदेसाई यांची पुढील कविता पहा —

भारतभूच्या सिंधु-तिरावर सुंदर माझा गोवा। चैतन्याचा, मांगल्याचा इथेंच माझा ठेवा ॥ध्रु०॥ मंगेशीं ही माझी काशीं संथ मांडवी गंगा। त्रिभुवन तारक अंबाबाई माझी शांता-दुर्गा ॥ चंद्रगिरीच्या शिखरावरती ध्वजा यशाची उभवा ॥१॥ कुळागराचीं छाया गमते मातेची जणुं माया। पूण्यभूमिच्या पायांपाशीं लोळण घेई दरया ॥ या भूमीचा विजय-पवाडा एक-दिलानें गावा ॥२॥ इथें शांतिचा गंध दरवळे स्फुरे क्रांतिची ज्वाला। आकांक्षांचें निळें पाखरूं भिडतें आभाळाला ॥ लक्ष करांनीं असाच राखा स्वातंत्र्याचा दिवा ॥३॥ या धरतीचें हृदय फुलांचें लोखंडाची छाती। वैभव आहे अमुचें उज्ज्वल अमुच्या कणखर हातीं ॥ लाल मातिच्या कणाकणांतुन भविष्य घडवूं नवा ॥४॥

× × ×

कवि र. वि. पंडित

'भारती' द्वैमासिकाचे एक संपादक, प्रसिद्ध साहित्यिक आणि कीर्तिमान कवि श्री. र. वि. पंडित यांच्या अनेक मराठी व कोंकणी कविता अनेक मासिकांतून प्रसिद्धीस आलेल्या आहेत. त्यांचे कांहीं काव्यसंग्रहहि प्रकाशनांत आले आहेत. मराठीपेक्षां यांच्या कोंकणी कविताच अधिक प्रसिद्धीस आलेल्या असल्या, तरी दोन्हीं भाषांमधील कविता सारख्याच सुरस आहेत. त्यांची '**येथें उद्दाम**' ही कविता पहा —

येथें उद्दाम वासना, तेथें अनघ यौवन। सत्तामद हा इकडे, तेथें सजल नयन ॥ इथें मिष्टान्नांचा वीट, तिथें कदान्न मिळेना। चैन चटावली येथें, तेथें जीवन जुळेना ॥ मृदु रेशमी दुलया येथें खुपती अंगास। तेथें फाटक्या चिंध्यांत चाले अखेरचा श्वास ॥ रक्त शोषून दीनांचें येथें वैभव वसलें। तेथें आधींच मेलेल्यांस दैव पीडीत बसलें ॥ धून संगीताची येथें धुंद रंगली दिवाळी। तेथें आर्त जीवनाला रात्र अमेची लाभली ॥ येथें आहे सर्व कांहीं कांचनाची सारी माया। नाहीं नाहीं येथें परी एक हृदयींची माया ॥

× × ×

क. हिरबा ना. सरदेसाई

मडकई येथील क. हिरबा ना. सरदेसाई यांचें काव्य सांधेसुदें पण वेधक आहे. मार पाठ, ध्रुवाख्यान वगैरे यांच्या पांच सहा काव्यकृति प्रकाशनांत आलेल्या असून इतरहि कांहीं स्फुट कविता प्रसिद्ध झाल्या आहेत.

* * *

क. माधव रामकृष्ण महाले

पणजी येथील कवि माधव रा. महाले पुरोहित यांच्या कांहीं कविता खानापुरच्या लोकमित्र मासिकांतून व अन्य नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. 'महाराष्ट्र सारस्वत' मासिकांतील '**गोमंत भू प्रशस्ति**' या त्यांच्या कवितेंतील कांहीं चरण :-

नमित तुज माय भू विविध गुणशालिनी। ज्ञानि जन पालिनी सुफल फल दायिनी ॥धृ०॥ शौर्य-तेजोगुणीं कितिक जन जन्मुनी। देह तुज अर्पुनी कीर्तिमय होउनि। जाति ते येथुनी वन्दनिय तूं जनीं। तव सुयश गायनीं जाति कवि मोहुनी ॥१॥ जन्मले किति इथें सत्कलावंत ते। पावले मान्यते अन्य देशीं जिथें। तुजमुळें देवते मानिती धन्य ते। सुगुण तव पसरुनी देति या त्रिभुवनीं ॥२॥ * * *

क. कै. दत्ताराम जगन्नाथ बोरकर

बोरी येथील हे कवि गद्य व पद्य साहित्य-सेवेंत कुशल होते. 'सत्संग' मासिकांत सारस्वत विलाप' या मथळ्याखालीं आर्यावृत्तांत यांच्या अनेक कविता गतकालांत प्रसिद्ध होऊन गेल्या आहेत. याच वृत्तांत त्यांनीं लिहिलेलें 'न्या. मू. काशीनाथ त्र्यं. तेलंग' यांचें छोटें चरित्र प्रसिद्ध झालेलें आहे. या पुस्तकाच्या पद्यमय प्रस्तावनेंत त्यांनीं लिहिलें आहे—"प्रस्तावना असावी ग्रंथ असेनाहि कां लहानचि तो। यास्तव कविता-ग्रंथा कवितामय ही लहानशी रचिती."

कै. बाबनो वामन शिर्वेकर यांची एक बोधक कविता — "हे सद्‌बांधव, सखे सोयरे एक विनंती मान्य करा। झडकरि टाकुनि दिवाळखोरी सुधारणेचा मार्ग धरा॥ देशि स्वस्तता होती तेव्हां खुशाल केली मौज तुम्हीं। ईशकृपेनें प्रपंचसौख्यीं कांहीं न वस्तु पडली कमी॥ सुखकर असल्या समयीं वैभव अन्या अपुलें दावाया। चालि रीति तुम्हि जडुनि घेतल्या व्यर्थ डौल जगिं मिरवाया॥ निःस्पृहतेची कमाल केली, जोडुनि यास्तव दोन करां। प्रार्थितसे बा. वा. शि. तुम्हां यांतिल दोषां माफ करा॥" × × ×

क. सदानंद जांबावलीकर

कवि सदानंद जांबावलीकर हे मुळचे जांबावलीचे, पण शिक्षकी पेशामुळें बऱ्याच कालापासून त्यांचें वास्तव्य मडगांवलाच झालेलें आहे. यांचें काव्य भावनाप्रधान असतें. अनेक विषयांवरील यांच्या कविता अनेक नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या असून हल्लीहि येत आहेत. काव्यरचनेप्रमाणेंच काव्यगायनांतहि ते मागें नाहींत. 'राष्ट्रमत' दैनिकांत आलेली 'शांतिदीप' ही त्यांची एक कविता—"सदा हिंदभूचा जळो शांतिदीप। युगानुयुगें अन् उरो तो निकोप॥ घुमो दूर त्याचा खरा कीर्तिनाद। मिळो आणि त्याला नवा विश्वसाद॥ मनूजामनीं शांतितत्त्वें स्थिरावो। पशूतुल्य-वृत्ती पुरी नष्ट होवो॥ सरो भ्रांत, भीती, अशांती, विपत्ति। वसो सख्य, समता जगीं नित्य अंतीं॥" + + +

क. वि. ज. बोरकर

कवि वि. ज. बोरकर यांच्या कित्येक कविता विविध नियतकालिकांतून आलेल्या आहेत; पण काव्यपुस्तक असें कांहीं प्रकाशनांत आलेलें दिसत नाहीं. काव्याप्रमाणें कथा, निबंध इ. गद्यलेखनहि यांचें बरेंच प्रसिद्ध झालेलें आहे.

* * *

क. केशव सांतबा वैद्य

हे एक जुन्या पिढींतील कवि असून कुंकळ्ळी येथें यांचें निवासस्थान होतें. यांचा जन्म सन १८६१ सालीं झाला व सन १९१८त म्हणजे वयाच्या अवघ्या ५७व्या वर्षी त्यांनां मृत्यु आला. नैसर्गिक आवडीमुळें प्रापंचिक व्यवहार संभाळूनहि त्यांनीं बरेंच वाङ्मय निर्माण केलें. त्यांत त्यांची नाट्यरचनाच अधिक. कवि म्हणून त्यांची विशेष प्रसिद्धी नसली; तरीं तत्कालीन लोक एक चांगले नाटककार म्हणून त्यांनां ओळखत असत. त्यांनीं जीं कांहीं नाटकें लिहिलीं त्यांत सावित्री, वरुणयाग, पार्थप्रतिज्ञा, मदालसा, दत्तभक्तिप्रभाव, बभ्रुवाहन, दक्षयज्ञ, हीं जास्त लोकप्रिय होऊन त्यांचे प्रयोगहि वठले. त्यांतील पद्यरचना सौभद्र, शाकुंतल, शारदा, अशा नाटकांतील चालींवर करण्यांत आलेली आहे.

क. वैद्य यांच्या कांहीं कविता गोवात्मा, सत्संग, स्वधर्मसेवा या नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. **नवनीतीचें सार** या त्यांच्या पुढील कवितेवरून त्यांची काव्यरचनापद्धत कळून येते.

मोहक गहिरे चंचल लोचन, तरंग दाविति तव हृदयींचे ॥ स्वेदबिंदुची मुक्तामाला। भालीं गालीं गुलाब फुलला ॥ ऊर धडधडे, स्फुरण अंचला। भाव मनोहर तनुलतिकेचे ॥१॥ माधुर्याचें सुधा-निकेतन। ओसंडे सर्वांगीं यौवन॥ रसिक नरांतें नव संजीवन। देत सुनिर्मल दर्शन ज्यांचें ॥२॥ प्रेरक मन्मथ एकचि झाला। युवयुवतीच्या उत्कंठेला। अनुभव सकलहि नर नारींला। कमनिय वैभव प्रेमलतेचें ॥३॥ चित्तामधिं अनुराग प्रकटतां। समाजबंधन तुटे तत्वतां ॥ लौकीकाची नुरे सांगता। हृदयवेदना जाति लयाला ॥४॥ बंधन मारक मंगलतेला। पावित्र्याला, ध्रुव सत्याला ॥ उत्कर्षाला, शुभ-कार्याला। हेंच सार जणुं नवनीतीचें ॥५॥ *

क. महादेव विठ्ठल हेदे

अंत्रूज महालांतील शिरोडें येथील या कवीच्या कांहीं कविता चित्ताकर्षण, सत्संग इ. मासिकांतून प्रसिद्धीस आल्या आहेत. **वीरमोहन-प्रभावती** व **भारतीवीर** या नाटकांतील त्यांचीं पदें इतर काव्यापेक्षां लोकांनां विशेष आवडलीं होतीं.

* * *

क. विश्वनाथ पांडुरंग हेदे

यांच्या कांहीं कविता जुन्या मासिकांतून आलेल्या असल्या तरी त्यांच्यापेक्षां त्यांनीं आपल्या नाटकांत जी पद्यरचना केली ती जास्त वेधक ठरली.

संगीत नल-दमयंती, आठ अवतार, संगीत गौळणकाला अशीं जीं त्यांचीं तीन नाटकें प्रसिद्धीस आलीं त्यांत गौळणकाल्यांतील पदें लोकांनां जास्त आवडलीं.

\+ + +

क. शंकर ब. आरस

नियतकालिकांतून यांच्या कविता दिसत नसल्या तरी यांनीं अभंगांचें आपलें एक छोटें पुस्तक स्वतः प्रसिद्ध केल्याचें कळतें. त्याचें नांव **अभंगावली** असें असून मूल्य एक आणा होतें.

\+ + +

क. वासुदेव लक्ष्मण वझे

साहित्यिक वासुदेव लक्ष्मण वझे यांचा जन्म झाला बांदिवडेंच्या नागेशीं येथें; पण शिक्षणानिमित्त पुण्यालाच त्यांचीं बरींच वर्षे गेलीं. संस्कृतच्या अभ्यासानंतर पुण्याच्या कीर्तन संस्थेंत शिक्षण घेऊन त्यांनीं त्या संस्थेची पदवी मिळविलीं. आपल्या कीर्तनांत ते स्वतः रचलेल्या आख्यानांचाच विशेष उपयोग करतात. या आख्यानासाठीं त्यांनीं निरनिराळ्या वृत्तांत काव्यरचना केली आहे. त्यांच्या कविता नियतकालिकांतूनहि आल्या आहेत. मराठींप्रमाणेंच कोंकणी कविता रचण्याचीहि त्यांनां कधीं कधीं स्फूर्ति होते. श्री. वझे यांचीं सात आठ गद्य पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत; पण अजून काव्यपुस्तक प्रकाशनांत आलेलें नाहीं.

पुणें येथील दैनिक काळ पत्राच्या १५ ऑगस्ट १९५४च्या अंकांत त्यांची एक सडेतोड कोंकणी कविता प्रथमच प्रसिद्ध झाली होती. दैनिक भारत, दुधसागर, राष्ट्रमत इ. पत्रांत आलेल्या त्यांच्या मराठी कविता वाचनीय आहेत.

सन १९५८च्या दुधसागर पाक्षिकाच्या दिवाळी विशेषांकांत प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या कवितेंतील कांहीं चरण :—

'जैशीं पक्व फळें तरूवरून तीं हातीं पडे रक्षकां। तैसें एकदिनीं मिळेल सहजीं स्वातंत्र्य गोमंतका। ऐसें कोणि वदे, सबूर म्हणती, पंचांग पाहे कुणी। शांतीची ध्वनिमुद्रिका वरि खरी लावीं कुणी भाषणीं॥ हां हां आयकिलें पुराण असलें आतां हवी हो कृती॥ तें तें ऐकुनि कान पार किटले दिङ्मूढ झाली मती॥ जें जें युक्त तुम्हां जसें दिसतसे तें तें करा सत्वरी। गोव्याच्या दशदिग्तमीं उजळण्या ओजस्वि दीपावली॥

क. यशवंत पां. रामाणी

यांचा निसर्गतःच काव्याकडे ओढा असल्यानें व्यवसायांतून मोकळा झाल्यावर मिळालेल्या वेळांत स्फूर्ति झाली म्हणजे लिहिलेल्या कांहीं कविता यांच्या संग्रहांत आहेत. त्या प्रकाशनांत आल्याच पाहिजेत अशीं त्यांनां हुरहुर नसल्यानें अजून त्या प्रसिद्ध झालेल्या नाहींत.

कवळें येथील श्रीशांतादुर्गा चतुःशताब्दि समारंभाच्या प्रथम वर्धापनदिनीं श्रीशांतामंदिरांत गायिलेली श्री. रामाणीरचित एक आरती :—

आरती तुज श्रीशांते। करितों भावें माते ॥ध्रु०॥ तूं विश्वाची जननी। त्रिभुवनीची सम्राज्ञी। दावी दया दासातें। प्रार्थीं तुजला दयिते॥१॥ तूं सगूण निर्गुणता। तूं सिद्धीची दयिता। करीं पाखर श्रीमाते। शिरिं ठेउनियां हस्तातें॥२॥ मनीं न ठेवि दुजाभाव। मज हृदयीं देई ठाव। हाच एक ध्यास मतें। जगदंबे भवानि माते॥३॥

क. गोविंद विनायक बर्वे

गोभक्त बर्वे म्हणून यांची गतकालीं प्रसिद्धी होती. हे समर्थ-सेवक असून यांनीं गोरक्षणाप्रमाणेंच श्रीरामदासांच्या कार्यावर कित्येक कविता रचलेल्या आहेत. **दासबोधांतर्गत निवडक वेंचे, सामर्थ्यसोपान, समर्थांचें कार्य** अशीं यांनीं तीन चार पुस्तकें लिहून प्रसिद्ध केलीं आहेत.

\+ + +

क. सौ. विजया सरमळकर

मडगांव येथील श्री. सौ. विजया वासुदेव सरमळकर या कथा नि कविता लिहिण्यांत चांगल्या वाकबगार आहेत. यांचें काव्य मराठी असो किंवा कोंकणी असो चांगलें वेधक असतें.

राष्ट्रमत दैनिकाच्या स्वातंत्र्यदिन अंकांत आलेली त्यांची एक कविता :—

लागे मृगाची चाहूल

निळ्या नभीं मेघ दाटे
वारा उचले पाऊल
विद्युल्लता डोळे मोडी
लागे मृगाची चाहूल
ह्हाळयांच्या झुल्यावरी
करी प्रतिज्ञा चातक
आशा निराशेचा तया
दिन रात ध्यास एक
मोरावरी बैसुनीयां
सरींवर आल्या सरी
वठलेल्या तरुलता
गोड हंसल्या अधरीं
चोहींकडे अंथरला
गालीचाहि मखमली
उष्में कष्टलेली भूमी
मोदें जणूं विसावली

*

कु. प्रफुल्ल माडगांवकर

या कवयित्रीचा 'सुमन गुच्छ' हा कविता संग्रह प्रकाशनांत आलेला असला, तरी नियत-कालिकांतून कांहीं हिच्या कविता दिसत नाहींत.

*

कु. प्रभा कामत

निरनिराळ्या बारा छोट्या अभंगांच्या संकल-नाची हिची एक छोटी पुस्तिका प्रकाशनांत आली असून तिचें मूल्य एक आणा आहे. *

क. कु. तेजस्विनी वसंत कारे

कवयित्री कु. तेजस्विनी वसंत कारे (मडगांव) या महाविद्यालयीन विद्यार्थिनींची कविता भावनाप्रधान असते. राष्ट्रमतादि नियतकालि-कांतून हिच्या कविता प्रकाशनांत येत आहेत.

राष्ट्रमत दैनिकांतील तिची एक कविता :–

हिंदमाईचा गोवा !

हिंदमाइच्या कडेवरी हा
तिचा लाडका गोवा !
स्वावलंबनें करूं पहातो
तिची अहर्निश सेवा !
फल-पुष्पांचा, जल-वृक्षांचा
विपुल धनाचा ठेवा !
नरवीरांचा अन् संतांचा
सकल कलांचा गोवा !
जय-गीतांचीं शाहीरांनीं
उच्च रवानें गावा !
हिंदमाइच्या कडेवरी हा
तिचा लाडका गोवा !

कु. रेखा रेगे

हिची 'पुष्करणी' ही छोटी काव्य पुस्तिका स. १९६० सालीं मुंबई येथें प्रकाशनांत आली असून तिचे प्रकाशक श्री. गो. स. रेगे हे आहेत. आकार डेमी १६ पेजी, पृ. १६, मूल्य पाव रु.

कु. सुमन नाटेकर

हिच्या कांहीं कविता 'उषा' या नांवानें प्रसिद्ध झाल्या आहेत. * * *

कु. हिरा दा. पाणंदीकर

मडगांव येथील एक महाविद्यालयीन विद्यार्थिनी कवयित्री कु. हिरा दामोदर पाणंदीकर हिच्या कित्येक कविता नियतकालिकांतून प्रकाशनांत आलेल्या दिसत आहेत. तिच्या काव्याची रचना-पद्धत वेधक वाटते. राष्ट्रमत दैनिकमधील तिची एक कविता :—

रात्र चिंब...

रात्र चिंब ओलेती
अवसेची दीर्घ रिपरिप
दोन स्वप्नाळु नेत्र
रोखलेले अवकाशांत
तिथें ढगाळलेली उणीव
पूर्णबिंबाची
अन् उरी पोटी लेवून
दीपांच्या अगण्य लेखा
आसुसलेल्या ओघानें
धो धो वाहे आकाशगंगा
अन् तिथेंहि रेंगाळली
दोन स्वप्नील भिंगांची उणीव
दोन उभ्या सरळ वाटा
समांतरीत दिशांतरीत
मागें पुढें कुठेंही
छेदत नाहींत, भिडत नाहींत.

*

कु. सुलभा मोरजकर

क. कु. सुलभा मोरजकर हिची एक काव्य-पुस्तिका गतसालीं प्रकाशनांत आलेली दिसली. त्या पुस्तिकेचें नांव **कलिका** हें असून आकार अगदीं छोटा, पृ. ८ व किंमत ५ पैसे आहे. गर्व, निर्झर अशा कांहीं तिच्या कविता नियत-कालिकांतूनहि प्रसिद्ध झालेल्या आहेत.

*

कु. शैला धोंड

क. कु. शैला धोंड हिच्या कांहीं कविता नियतकालिकांतून आलेल्या दिसत आहेत. राष्ट्र-म[illegible]निकांत आलेली तिची एक कविता :—

वर्षा

दाहक हें मन माझें
अंगोअंगीं पेटलेलें
श्वासांतूनहि माझ्या
अंगार हो भडकलें
कुंडलींत आहे माझ्या
ग्रीष्माची ती साडेसाती
अवकृपा झाली त्यांत
दुष्ट या वरुणाची
स्वप्न होतें माझें हिरवें हिरवें
जगाची समृद्धी चिंतण्याचें
विटून गेला स्वप्नील रंग
अन् झाला ग पूर्ती-भंग
तोंच छंदांत आला
छंदिष्ट साजण ग माझा
आनंदें खेळतो झपूर्झा
अन् सुखवितो गात्रां-गात्रां
प्रतिक्षेच्या पिसावर
हेलावलें स्वप्न
अन् स्पर्शाच्या साफल्यावर
गातो माझा हर्ष

*

कु. अर्चना सावंत

क. कु. अर्चना सावंत हिच्या दुधसागर, नौकानयन, जलविहार अशा कांहीं कविता निरनिराळ्या नियतकालिकांत प्रसिद्ध झाल्या आहेत. या कवयित्रीचें काव्यपुस्तक असें कांहीं अजून प्रसिद्ध झालेलें नसलें, तरी एक प्रका-शनाच्या मार्गावर आहे.

*

क. मो. ग. रांगणेकर

कविवर्य मोतीराम गजानन रांगणेकर यांची आज नाटककार व नाट्य दिग्दर्शक म्हणून मोठी प्रसिद्धी असली तरीं ते एक मार्मिक व सिद्धहस्त कवीहि असून त्यांचें काव्य रसिकांना फार आवडणारें असें आहे.

श्री. रांगणेकर यांचें मूळ घराणें गोव्यांतील चिखली गांवचें आणि कार्यक्षेत्र मुंबई आहे. स. १९३० ते १९४० या कालखंडांत त्यांनीं वृत्तपत्र क्षेत्रांत प्रवेश केला आणि नवीन, चटकदार, आकर्षक, सुटसुटीत व गुदगुल्या करणाऱ्या गद्य पद्य साहित्यानें वाचकांच्या मनाचा वेध घेतला. अरुण, आशा, चित्रा, वसुंधरा अशीं त्यांचीं नियतकालिकें व त्यांतील चमचमीत साहित्य—मेजवानी मराठी वाचकांच्या अजूनहि दृष्टीपुढें आहे.

सोमोल्लंघन मृगजल अशा कादंबऱ्याहि त्यांनीं लिहिल्या. कुलवधू, आशीर्वाद, नंदनवन, एक होता म्हातारा, माहेर, रंभा, वहिनी, जयजयकार या नाटकांतील त्यांच्या आकर्षक व रसभरीत पद्यरचनेवरून त्यांच्या काव्याची अवीट गोडी कळून येते.

नियतकालिकांतील देखील त्यांच्या कविता वेधक, बोधक नि मजेदार आहेत.

'गीतें व भावगीतें' असा त्यांचा एकच काव्यसंग्रह प्रकाशनांत आल्याचें दिसतें. हा कवितासंग्रह १९४९ सालीं मुंबई येथें प्रसिद्ध झाला. त्याचीं पृष्ठें ५० असून मूल्य रु. ०-८-० आहे.

क. रांगणेकर यांचीं खालील भावगीतें पहा :

मन रमणा

मनरमणा ! मधुसुदना ! मुखीं राहो माझ्या प्रभो ! हें नाम सदा ॥धृ०॥ आठवितां रे गोकुळींच्या बाळलीला । आनंदें नटला जीव हा ॥ येइल का रे काळ ऐसा । द्याया सौख्य पुन्हा॥१॥

क्षण आला भाग्याचा

क्षण आला भाग्याचा । आला सौख्याचा ॥
हांसत नाचें, नाचत नाचें हें मन माझें ॥धृ०॥
प्रेममया जावनि या । जरि राहिलें रंगुनियां ।
आला उदयाला, बहराला । मंगल दिन हा ॥१॥

आणिन भूवरी नंदनवन रे

आणिन भूवरी नंदनवन रे । होशिल तूं जरि माझा ॥
पूजिन आणुनी माणिक मोतीं । होशिल तूं जरि माझा ॥
घेउनि येईन अमृत सारें । न्हाणिन तुजला राया ॥
गुंफिन माला नक्षत्रांची । होशिल तूं जरि माझा ॥धृ०॥
गुंगुनि माझ्या प्रेमगीतांनीं । गौरवितें जग मजला ॥
होइल का रे सौख्य मनाला । जोंवरि तूं नच माझा ॥
मृत जगताला जीवन द्याया । आळविती जन मजला ॥
मीच कुणातें आळवूं आतां । होशिल तूं कधिं माझा ॥१॥

या खेरीज श्री. रांगणेकर यांच्या संग्रहांत बऱ्याच हस्तलिखित कविताहि असाव्या असें वाटतें.

* * *

क. ह. वि. देसाई

कवि श्री. हरि विठ्ठल देसाई यांचें जन्मगांव पेडणें, पण व्यवसायानिमित्त वास्तव्य मुंबईलाच आहे. हे एक नामवंत साहित्यिक असून त्यांनीं कित्येक कादंबऱ्या व अनेक नाटकें लिहिलीं आहेत. नाटकांतील पद्य रचना पाहूनच त्यांच्या काव्य कल्पकतेचें व काव्यरचनेचें कौतुक वाटतें.

× + ×

क. ना. के. शिरोडकर

कवि श्री. ना. के. शिरोडकर यांच्या कित्येक कविता विविध नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या असून त्या सुरस व सुबोध आहेत. × ×

क. गोपाळराव मयेकर

कवि. श्री. प्रा. गोपाळराव मयेकर यांची लेखणी बहुप्रसवा दिसत नसली, तरी समर्थ असून त्यांचें काव्य रसाळ नि वेधक असतें. '**सारा मंडप कोसळतांनां**' या मथळ्याची त्यांची एक कविता —

सारा मंडप कोसळतांनां मनांत उभा मात्र एक खांब
तोही जेव्हां पडेल तेव्हां त्यांतच उन्मेल उद्यांचा नरसिंह
रडून रडून डोळ्यांच्या उरल्या खांचा आतां उरलं काय
उरला फक्त एक थेंब अस्तित्वांतून ठिबकणारा
स्मितांच्या देखण्या पायघड्यांनीं ओठांनीं सजवला समारंभ
काळजाचा ठाव घेईल असें हसूं अजून फुटलेंच नाहीं !
लाटा तर सारख्या फुटताहेत मनाला गोंजारीत-लाथाडीत
क्षितिजाच्या शिंपल्यांत फेडील असा वेग यायचाच आहे.

शब्दांतल्या पऱ्यांचे कंठ सुजून गेलेत तेंच तेंच गाऊन गाऊन
सुजनांच्या ओंकाराची धून अजून गात्रांत घुमलीच नाहीं
न संपणाऱ्या माळावरती एक ढिपरु उलणारें-फुटणारें
आभाळाला झेलील असा अंकुर उरीं जपणारें

× * +

क. शशिकांत सरदेसाई

कवि श्री. शशिकांत सरदेसाई यांच्या कित्येक कवितां विविध नियतकालिकांतून प्रकाशनांत आलेल्या दिसत आहेत. '**दोन क्षण**' या त्यांच्या कवितेतील कांहीं चरण —

दोन क्षण हंसण्याचे दोन क्षण रडण्याचे
दोन क्षण गोड गोड स्मृतीसाठीं जपण्याचे !
दोन क्षण रुसण्याचे दोन क्षण फसण्याचे
दोन क्षण अंधारांत आसवांशीं हंसण्याचे !
दोन क्षण फुलण्याचे दोन क्षण झरण्याचे
दोन क्षण स्वप्नांनां मातीमध्यें पुरण्याचे !
दोन क्षण चालण्याचे दोन क्षण थांबण्याचे
दोन क्षण ओळखीचा रस्ता सुद्धां चुकण्याचे !

क. हि. मा. कामत

कवि हि. मा. कामत यांच्या सुरस कविता अनेक नियतकालिकांतून प्रकाशनांत आलेल्या दिसत आहेत. 'खट्याळ चंदामामा' ही त्यांची एक कविता—

चंदामामा नाहीं आला नाहीं आले आज तारे ।
सांग सांग आई का ग गेले संपावर सारे ? ॥
झाली का ग आकाशांत अशी महागाई फार ।
देवबाप्पाच्या राज्यींहि काय उणाच पगार ? ॥
का ग आली कधी स्वारी नीट वेळेवर कामा ।
खरा शोभतो पुढारी खट्याळ हा चंदामामा ! ॥

+ + +

क. ना. भा. नायक

कवि नारायण भास्कर नायक यांनीं वयाच्या चौदाव्या वर्षी साहित्य क्षेत्रांत प्रवेश केला. 'जललहरी' ही त्यांची पहिली कविता मुंबईच्या सयाजी-विजय पत्रांत प्रसिद्ध झाली. यानंतर मनोरंजन, उद्यान, नवयुग, प्रफुल्लता, लोकमित्र, व्यायाम, प्रभात, भारत, चित्रमय जगत, काव्य रत्नावली, भारतमित्र वगैरे अनेक नियतकालिकांतून यांच्या कविता प्रकाशनांत आल्या आहेत. त्यांपैकीं कित्येक टोपण नांवांनेंहि प्रसिद्ध झाल्या आहेत. **श्रीरामनाथ स्तुति**-ही त्यांची पहिली काव्य पुस्तिका. हिचीं पृ. ८, मुद्रण धनंजय प्रेस, खानापूर. सन. १९१८.

भजनांजलि—क. ना. भा. नायक, मुद्रक व प्रकाशक—द. गो. सडेकर, धनंजय प्रेस, खानापूर. आकार क्राऊन सोळा पेजी, पृ. ४०, मूल्य चार आणे. सन १९२०. यांत अभंग व आरत्या यांचा संग्रह आहे.

सरिता—क. —ना. भा. नायक, मुद्रक व प्रकाशक—दामोदर सांवळाराम यंदे, मुंबई २, आकार डेमी बारा पेजी, पृ. ५०, मूल्य ४आणे. सन १९२१. या काव्यसंग्रहांत निसर्गवर्णन व सागरी दृश्यें यांवरील छ व्या मोठा कविता आहेत.

उल्हास—विनोदी कविता संग्रह पृ. १६, मूल्य १ आणा, मु. व. प्र. दा सां. यंदे मुंबई. स. १९३२.

तुळशी महात्म्य—छोटी पुस्तिका, मुद्रक व प्रकाशक—श्री. वसंत वैकुंठ कारे, मित्र छापखाना, मडगांव, सन. १९६०. किं. १॥ आणा.

सौभाग्यालंकार—छोटी पुस्तिका, मुद्रक व प्रकाशक—श्री. व वै. कारे, मित्र प्रेस, मडगांव, किं. १॥ आणा, १९६०.

श्रीसरस्वती स्तुति—पृ. ८ १९६१.

स्वर--तरंग—विनोदी, वेधक नि बोधक आगामी काव्यसंग्रह. या संग्रहांतून प्रकाशनांत येणाऱ्या व भारतमित्र मासिकांत प्रसिद्ध झालेल्या 'भंजन-भक्ति' या काव्यांतील कांहीं चरण—

नवयुगीन युक्ती। वोकाळली भंजन-भक्ती। परी कधींच नाहीं मुक्ती। अशा नकली भक्तीला॥ रामनाम वदत उठे। काळा बाजार करीत सुटे। त्यांनां म्हणती लबाड मोठे। तेही करिती ताच कृती॥ देवा आळविती दुष्ट। प्रतीपक्षा व्हावया नष्ट। म्हणती न पडावें कष्ट। किमपीहि आपणा॥ भरोनियां तीव्र खटला। म्हणे बडगा दावूं शेवटला। प्रसंगीं निर्वाहि घटला। तरी जमीन साध्य होईल॥ वकील, साक्षी ताब्यांत। निकालदातेहि खिशांत। परी परमेश्वरें निवांत। कृपा केली पाहिजे॥ हा खटला जिकल्यावर। करूं रंगपूजा सत्वर। मोठा बकरा करूं ठार। पूर्वावरी देवाच्या॥ सटर फटर काम। भागवितों पंचखाद्य करून। परी असलें मोठें प्रकरण। सामान्य नवसें साध्य नसे॥ म्हणोनी आंगविलो रंगपूजा। देवा, आतां नच भेदी दुजा। लुटावया तव कीर्तीची मजा। मार्गणें माझ सत्य करी॥ ऐसे हे नीच भक्त। प्राशिती लोकांचें रक्त। परी देवद्वारीं नाचत। विठ्ठल विठ्ठल म्हणोनी॥ वनांतील वाटमारे। किंवा खिसेकापू सारे। यांपेक्षांही दुष्ट खरे। असले भक्त जाण पां॥ यांचा न धरावा विश्वास। हे देवासहि खातील खास। यांच्या जवळपास। कधींच कोणी राहूं नये॥... नाना हेतूंना व्यापिले। नाना दुःखांनीं गांजिले। त्यासाठींच देउळीं आले। आळवावया देवातें॥ देवा आळवितां मनीं। चित्त न राहे एकेस्थानीं। आत्मा धावता अस्थानीं। परमात्मा जाणतसे॥ कित्येक होती भजनांत दंग। करिती विविध भक्ति रंग। परी कदापि न होई भंग। दंभ दुष्ट वासनेचा॥ अंतरीं नाहीं शुद्ध भक्तीचा उमाळा। न ओळखती जनता जनार्दनाला। जो पूर्णपणें स्वार्थांध बनला। देव कैसा मिळेल तया?॥

क. र. वि. प्र. गांवकर

क. र. वि. प्रभु गांवकर यांच्या कांहीं कविता राष्ट्रमत दैनिकांतून व अन्य नियतकालिकांतून प्रकाशनांत आल्या आहेत. 'केदार' ही त्यांची एक 'सागर' मधील कविता —

गेलेल्या समयांचा हरवलेल्या प्रीतीचा सांडलेल्या अश्रूंचा रचलेल्या मनीषांचा भंगलेल्या स्वप्नांचा सहन, करितें धार अन् आळवितें केदार.

★

क. ना. कृ. बोरकर

क. ना. कृ. बोरकर यांची 'सागर' मधील एक कविता **'आशा'**—

इथेंचि आहेत कांटे इथेंचि आहेत फांटे परि विचारमंथनांतुनी जीवन सुसह्य वाटे ॥ रंगांत मिसळले रंग रंगविला सुंदर धागा । परिश्रमाच्या फुलवासानें सुगंधिल ही जागा ॥

× ×

क. चंद्रकांत पार्सेकर

क. चंद्रकांत पार्सेकर यांची एक सुंदर कविता **'जीवन अन् कवि'**

जीवन पुष्पमय फुलांचा सडा उजळतें अंग
कडान कडा
शब्दफुलांवांचुनि काय द्यावें ? मी तर पामर
कवी बापुडा
जीवन प्रीतीचा मधुर घडा गात्रीन गात्रीं
बाजे चौघुडा
गातांच आहे, कितीक गावें ? मी तर पामर
कवी बापुडा
जीवनासाठीं चाले पहा लढा स्वार्थापायीं
जाई झणीं तडा
तुटवी धागे कसा जुळवावा ? मी तर पामर
कवी बापुडा
जीवनसागर भवतीं खडा भार पेलण्या उचलला
विडा
अहो, छेंदापायीं झालों वेडा मी तर पामर
कवी बापुडा

★

क. अनंत भा. काणकोणकर

क. अनंत भा. काणकोणकर यांची एक कविता -

इच्छेच्या भृंगाला नाहीं सोनेरी धागा क्षितिजाला नाही कडा, हवी मज जागा आकाशाच्या पानावर आकांक्षेचें फुल ताऱ्यांसोबत पाहे माझें
गजलेलें मूल
गगनीं भरारावें वनीं तरारावें विजेच्या
धारेवर गंडस्थळ फोडावें
मातेच्या कुशीत रुणझुण गावें पुरानें पिळलेल्यांचा
घाम मी व्हावें
दुष्काळाच्या धारेंत करपून मी जावें भू-कंप
—पीडितांचा आसू कण बनावें
नको मज हव्यास, फक्त तयांचा वास इतिहासाच्या
पानावर व्हावा माझा भास.

+ + +

क. ज. पां कामत

कवि जयराम पांडुरंग कामत यांच्या कविता मांडवी वगैरे नियतकालिकांतून येत असतात. 'सागर' मधील त्यांची एक कविता **वरदान**

ओला गडद अंधार व्यथित हळवा चूर काज-
व्याच्या शलाकेनें रोमांचित आरपार
कुठें तरी खोल खोल मुक्या मनीं उठले बोल
वेदनेचें वरदान करी तापसाचें बल
आतां मिठींत आभाळ झालें निःशब्दव्याकुळ
मिटलेल्या नयनांना मोहवती इंद्रनील.

× * +

क. किसन धुरी

यांच्या **'पूर्ण चंद्रमा'** या कवितेचे कांहीं चरण—

नभमंडपीं आज दिवाळी रत्नदिपांनीं उज-
ळत फुलली
साज गाज मन कोण तयांचा उधळून टाकिलें
दाही दिशांना
पूर्ण चंद्रमा आज झळकला कलाकलांना
बहरून आला
रथीं बैसुनी स्वर्ग परीच्या हासत बोलत स्वर्गी
आला.......

कवि श्रीपाद गोविंद हेदे

श्री. श्रीपाद गोविंद शेणवीं हेदे हे शिरोडें येथील रहिवासी असून जुन्या पिढींतील एक अनुभवी लेखक व कवीहि आहेत. लिंबू-नारळाची कैफियत, अन्योक्ति, मदिरा, दिपवाळी अशा यांच्या कित्येक कविता माजी 'भारत' पत्रांतून प्रसिद्ध झाल्या असून अलिकडेच दोन कविता 'राष्ट्रमत' दैनिकांत वाचल्याचें स्मरतें.

क. हेदे यांचें एक अन्योक्ति काव्य असें आहे :—

बहु थोडें लिहितो, कवित्व करितो, ज्ञानी पहा मानितीं !
अंगीं लांब झगा, चालहि बरी, सभ्यत्व ये ये रितीं ॥
मोठें मंदिर, कर्से दौलत तशी, श्रीमंती वाखाणिती ।
मोठा धोवट सोंवळा साधुच गमे, सत्यत्व न जाणिती ॥१॥

✤ ✤ ✤

क. रामकृष्ण द. सहकारी

श्री. रामकृष्ण द. सहकारी हे एक उत्साही साहित्यिक आहेत. शिरोड्याजवळच्या रानखोलचे हे राहाणारे. शेती भाती, समाजकार्य आणि साहित्यसेवा असें यांचें त्रिविध कार्य मोठ्या उत्साहांत जिद्दीनें सुरू आहे. त्यांचे विविध विषयांवरील अनेक लेख निरनिराळ्या नियतकांत प्रकाशीत झाले आहेत. गतसालीं 'आमची शेती' असें एक पुस्तक लिहून त्यांनीं प्रसिद्ध केलें आहे.

श्री. सहकारी यांची काव्यसेवाहि कौतुकास्पद आहे. त्यांची एक कविता 'गा एकचि गान !' :—

ये सजणे, बैस इथें ! गा एकचि गान
ऐकुनि जें मन निवेल हरपुनि मम भान ! ॥धृ०॥
उघडीं तव वदनकमल । त्यांतुनि नित मधुर विमल
गोड शब्द रसगंगा वाहूं दे छान ! ॥१॥
ऐकुनि तव मधुर बोल। अंतरिंचा धरिन तोल
दवडूं नको व्यर्थ काल, करुं दे रसपान ॥२॥
मन्मनिंच्या तारांतुन । मधुर ध्वनि उमटवीन
करिन तुला साथ सखे घे एकचि तान ॥३॥
बोल तुझे आठवीन । स्मृतिरूपें सांठवीन
मम मानस मंदिरांत स्मरुनि तव ध्यान॥४॥
मन्मन झालें अधीर। कुठवर धरुं सांग धीर
गा एकचि गान तुझें तृप्त करीं कान ॥ ५ ॥

× ❊ ×

कवि रामदास प्रभु

श्री. रामदास प्रभु यांचें गद्य लेखन जितकें वेधक तितकेंच पद्य लेखनहि आकर्षक आहे. अनेक नियतकालिकांतून यांच्या सुरस कविता प्रसिद्ध झालेल्या असून आजहि काव्यांतील नवीन नवीन प्रकार वेधक पद्धतीनें ते वाचकांपुढें ठेवीत आहेत. लोकसत्ता विशेषांकांतील त्यांची एक कविता '**माझें गोव्यांत माहेर**' :—

माझे वडील कुबेर दिला रत्नांचा अहेर । माझें गोव्यांत माहेर माझें गोव्यांत माहेर ॥
माझ्या माहेराची वाट जाईजुईचा ग थाट । असा दवळ दवळ बाई मावेना मनांत ॥
असे नारळ मधाळ कुळागरें काळीं शार । माझ्या माहेराचं पाणी त्याला अमृताची सर ॥
लावतांनां सांजवात आई मला आठवते । नदी भेटते सागरा उगमाचा ध्यास घेते ॥
माझा भाऊ भावजय कृष्ण-रुक्मिणीचा जोडा।आला वसंत माघारा मला माहेरचा ओढा॥
माझ्या मायेच्या माहेरीं देव येतो पाहुणेरा । अजूनहि चालवितो चांगुणेची परंपरा ॥

गोमंतक परदास्यांतून मुक्त झाला त्यावेळीं रचण्यांत आलेली कवि रामदास प्रभु यांची एक कविता '**गोवा माझा स्वतंत्र झाला**' —

बाजत तासे झांजा घुमटें । मुक्तरवानें घुमवित गीतें ॥
सांग सख्या रे सांग जगाला । गोवा माझा स्वतंत्र झाला ॥

कविवर्य रामदास प्रभु यांचे काव्यसंग्रह मात्र अजून फारसे प्रकाशनांत आलेले दिसत नाहींत. फक्त 'शब्दुली' हा एकच संग्रह तेवढा पहाण्यांत येतो.

शब्दुली—कवि—श्री. रामदास प्रभु; प्रकाशक—श्री. बा. द. सातोस्कर, सागर साहित्य प्रकाशन, मुंबई. मुद्रक—माधव प्रिं. प्रेस, अलिबाग. सन १९६४, पृ. ६४, मूल्य २ रुपये.

× ※ ×

क. रामराय गो. कुंकळयेंकर

श्री. रामराय गो. कुंकळयेंकर यांचा अलीकडेच एक लहानसा काव्यसंग्रह प्रकाशनांत आला आहे. त्यांतील एक कविता '**मी पाहूं इच्छितों**':—

मी पाहूं इच्छितों—
तो पांडुरंगमय तुकाराम
मी पाहूं इच्छितों —
शाकुंतल घेऊन नाचत
असलेला तो गटे
मी पाहूं इच्छितों—
विवस्त्र स्थितीत
धांवत असलेला
तो आर्किमेडिस

मी पाहूं इच्छितों—
ताजमहालाचा आराखडा
आंखीत असलेला तो हात
आणि मी पाहूं इच्छितों—
तो महान किमयागार कीं,
ज्याचें रक्त,मांस व हाडें जुळवून
केल्या प्रतिमा
आणि ओतल्या त्यांत
महान् महान् चेतना

\+ + +

कवि विष्णु कुर्डीकर

क. विष्णु कुर्डीकर यांच्या कविता कित्येक नियतकालिकांतून आलेल्या आहेत. 'गोमंतक' विशेषांकांतील त्यांची एक कविता '**रात्र**' :—

तुला झोंप येतां
मला जाग येते
स्वैर मी असतें
तूं नसतां . .
रात्र रात्र शब्दें
रानकिडे गाती
चंद्र तारांगण
दिवे ओंवाळिती

तुझें माझें नातें
कोड्यांत सांगतें
मी तुझी जननी
उपाशीं जगते....
तुला जाग येतां
मला मरण येतें
पुनर्जन्म घेतें
तूं नसतां..... *

कवि वामन मंगेश दुभाषी

कवि वामन मंगेश दुभाषी उर्फ ऋग्वेदी यांच्या अनेक कविता अनेक ठिकाणीं प्रकाशनांत आल्या आहेत. त्यांचीं कांहीं काव्य पुस्तकेंहि निघालीं आहेत. त्यांत '**अभंग गीतांजली**' विशेष लोकप्रिय आहे. त्यांतील पुढील दोन कविता :—

जागवीं भारता

भयशून्य जेथें चित्त मानवाचें ।
मस्तक तयाचें उच्च जेथ ॥
जेथ ज्ञान नांदे मुक्त आणि साध्य ।
होवोनी आराध्य सकलिकां ॥
संसाराचे जेथ खंड न पडले ।
ऐक्य न बुडालें कलहानें ।
हृदयांतुनियां उत्साहें फुटती ।
शब्द सत्य प्रीतियुक्त जेथ ॥
स्रवति अजस्र लक्षविध जेथ ।
शुद्ध अविरत कर्मधारा ॥
दशोदेशीं सर्व दिशांमाजीं कर्में ।
पूर्णत्वार्थ नेमें धांव घेती ।
जेथ न बुझाला ओघ विचारांचा ॥
तुच्छ आचारांच्या वाळवंटीं ॥
जेथ पौरुषातें वाव मिळे सदा ।
कर्तृत्व शतधा प्रगटतें ॥
सकल कर्मांची चिंता तूं वहासी ।
योग्य मार्गें नेसी जनां जेथ ॥
करीं निज हस्तें निर्दय आघात ।
चेतवां भारत तेथ स्वर्गीं ॥
स्वर्गीं या उत्तम जागवीं भारता ।
प्रभो विश्वनाथा मायबापा ॥

चरण तुझे

वसती ज्या ठायीं दीनार्त पतित ।
विराजति तेथ चरण तुझे ॥
तुझीया चरणीं प्रणाम करीतां ।
तुज भगवंता न पावे तो ॥
अवमानितांच्या तळीं तुझे पाय ।
नच शिर होय नम्र तेथें ॥
भूषणविहीन वेष हा घेऊन ।
दीन नारायण हिंडसी तूं ॥
नम्र नच होई तव माझें शिर ।
घोर अहंकार आड येई ॥
नसे ज्या सौंगडी इष्ट मित्र नसे ।
तयां लाभतसे संग तुझा ॥ * *

कवि सुधाकर प्रभु

कविवर्य सुधाकर प्रभु यांच्या अनेक कविता विविध नियतकालिकांतून आल्या असून कांहीं काव्यसंग्रहहि निघाले आहेत. यांचें ऐतिहासिक व इतर गद्य साहित्य तर बरेंच आहे. त्याचा पुढील पुस्तकांत उल्लेख येईलच. **साधना** व **आरती** असे त्यांचे दोन काव्यसंग्रह पंढरपूर येथील सहकार प्रकाशनतर्फे प्रसिद्ध झाले आहेत. दोन्हीं तेथील श्रीपांडुरंग मुद्रणालयांत मुद्रीत करण्यांत आले आहेत.

खास मुलांसाठीं लिहिलेल्या त्यांच्या कविता तर शिशुवर्गाला फार आवडणाऱ्या आहेत. **'चला नाटक करूं या'** या त्यांच्या पुस्तकांतील पुढील दोन कविताः- **नवलाचा आरसा** व **अंगाई** :—

नवलाचा आरसा

आतां एका राव .... नवलाचें गांव
या गांवांत सोन्याला .... मातीचा भाव
तिथून हा आणला .... नवलाचा आरसा
याला ठाऊक सारें .... कोण आहे कसा
याला विचारा .... डोंगराचें नांव
सांगेल तुम्हांला .... हिऱ्याचा भाव
रत्नांचा डोंगर .... माणकांची खाण
याची सर्वांशीं .... जान पहचान

अंगाई

बाळे जो जो अंगाई ...... गायी लक्ष्मी आई
आज गोकुळीं प्रमुदित सारे ...... मुलें माणसें गाइ वासरें
रूपांजली तूं खाण रुप्याची ...... जो जो अंगाई
छान सजविला तुझा पाळणा ...... कशा शोभती राघू मैना
रूपांजलिचे खेळगडी हे ...... जो जो अंगाई
बोल बोलती चिमणे डोळे ...... पाळण्यामधुनी बाळी खेळे
माधूजींच्या हृदयिं विराजे ..... जो जो अंगाई

* * *

क. बबन प्रभु

क. बबन प्रभु हे एक चांगले साहित्यिक असून त्यांनीं कांहीं नाटकें व कित्येक प्रहसनेंहि लिहिलीं आहेत. परचुरे प्रकाशन, कोठावळे प्रकाशन यांच्यातर्फे त्यांचीं कित्येक पुस्तकें प्रसिद्ध झालीं आहेत. उद्बोधक विनोदी कविता लिहिण्यांत यांचा चांगला हातखंडा आहे. × + ×

क. प. रा. सिनारी

क.प.रा.सिनारी यांच्या कांहीं ऐतिहासिककविता लोकमित्र मासिकांतून प्रकाशनांत आल्या आहेत. *

क. चिंतामण गणेश जोशी

क. चिं. ग. जोशी यांच्या कांहीं कविता सन १८८६ व १८८७ च्या सुमारास प्रसिद्धीस आल्या होत्या. हे बार्देशमधील वागाळी येथील असून पुढें ते मुंबईलाच राहत असत. * * *

क. केसरीनाथ धुमे

क. केसरीनाथ सीताराम धुमे हे मूळचे कुंभारजुवें येथील रहिवासी; पण पुढें त्यांचें वास्तव्य मुंबईलाच झालें. यांनीं स्फूट कविता बऱ्याच लिहिल्या; तथापि त्यांचा संग्रह असा कांहीं प्रकाशनांत आलेला दिसत नाहीं. 'वाहवा रे जांवई' हें एक काव्यपुस्तक तेवढें त्यांचें प्रसिद्ध झालेलें आहे.

व्हावा रे जांवई— क. के. सी. धुमे, प्र.—श्री. यशोदाबाई देऊळकर. सन. १९०३. पृ. ३०, मूल्य २ आणे. याच काव्याच्या आधारानें त्यांनीं पुढें याच नांवाचा एक फार्स रचला व त्याचें प्रकाशन मुंबईच्या इंदुप्रकाश प्रेसमध्यें झालें. + + ÷

क. अनंत रघुनाथ टोपले

क. अनंत रघुनाथ टोपले हे म्हापशें येथील राहणारे असून यांनीं बराच काळ शिक्षणदानाचें महत्वाचें कार्य केलें आहे. गद्य लेखनाप्रमाणेंच यांचें काव्यलेखनहि बरेंच आहे. × × ×

क. रघुनाथ अनंत टोपले

क. रघुनाथ अ. टोपले हे क. अ. र. टोपले यांचेच चिरंजीव असून वडिलांप्रमाणेंच यांनीं बरीच काव्यरचना केली आहे. * * *

क. केशवशास्त्री सावईकर

ह. भ. प. केशव गणेश शास्त्री सावईकर यांनी अभंग काव्य बरेंच रचलें असून ओवीबद्ध छोट्या पोथ्याहि लिहिल्या आहेत. भजनांत अभंग गातांनां हे भक्तिभावानें तल्लीन होऊन जात असत. यांचा जन्म सावई येथें झाला आणि अवसान त्यांच्या जांब्रावली येथील निवासस्थानी झालें. भक्तिमार्गाचा प्रसार करतां करतांच यांनीं देह ठेवला. पुराण, कीर्तन, प्रवचन, भजन हे त्यांचे ईशभक्ति मार्ग अनेक भक्तांनां आवडून ते त्यांकडे आकर्षित झाले. त्यांचें उपास्य दैवत श्रीगोपालकृष्ण हें होतें. त्यांचें शिष्यवृंदहि बराच आहे. क. सावईकर यांचें प्रकाशनांत आलेलें ठळक काव्यपुस्तक म्हणजे 'भक्ति विलास'. याशिवाय श्रीकृष्णलीला, श्री विठ्ठल ध्यान व गोकुळ अशा त्यांच्या तीन छोट्या पुस्तिकाहि प्रसिद्ध झाल्या आहेत.

१ **भक्ति विलास**—यांत क. सावईकर यांचे निरनिराळे अनेक अभंग आले आहेत. सन १९३० सालीं हें पुस्तक सांगें येथें ज्यो. ना. अ. पाटणकर यांच्या संगमोदय छापखान्यांत छापून जांबावली येथें प्रकाशनांत आलें. आकार क्राऊन, पृ. ७२.

२ **श्रीकृष्णलीला**— ओवीबद्ध काव्यपुस्तिका, १९३१, मुद्रण—धनंजय प्रेस, खानापूर, आकार छोटा, पृ. ८, विनामूल्य.

३ **श्रीविठ्ठल स्तोत्र**— ओवीबद्ध स्तोत्र. १९३२, मुद्रण–पंढरपूर, लहान आकार, पृ. ४, विनामूल्य.

४ **गोकुळ**—यांत अभंगवृत्तांतून वाचकांस गोकुळदर्शन घडविलें आहे. आकारानें पुस्तिका अगदीं लहान, पण त्यांत प्रगटलेला कवीचा भक्तिभाव वेधक आहे. पृ. ८, विनामूल्य. मुद्रण धनंजय छापखाना, खानापूर.

×

क. त्रिविक्रम वि. सहकारी

क. त्रिविक्रम वि. सहकारी यांच्या कांहीं कविता आर्यविज्ञान, लोकमित्र वगैरे मासिकांतून येत असत. त्यांची 'उद्धव कृष्ण संवाद' ही एक कविता :—

उद्धव—कृष्ण संवाद

उद्धव बोले कृष्णा ! कथ मजला भक्तिधर्म हा स्पष्ट ।
ज्यानें विशुद्ध ऐशा वैराग्यासी न होतसे कष्ट ॥
तापत्रय संत्रस्ता ! भगवंता ! पाहिं तूं अतां मजला ।
नाहीं त्राता कोणी म्हणूनि आलों असे शरण तुला ॥
पडलों महान् संकटिं कालाग्नी करितसे मला दंश ।
यावेळीं करिं ईशा मांत्रिकरूपें विषाग्नि विध्वंस ॥
ऐकुनि उद्धववाणी भगवंतें आदरें तया कथेंल ।
पूर्वीं धर्मप्रवरें भीष्में धर्मा अहो असें मथिलें ॥
पांडव कुरुंच्या युद्धा समाप्ति होतां सुहृद् वियोगानें ।
शांतनुला धर्म म्हणे बहुधर्मा ऐकिलें सुयोगानें ॥
आस असे मनिं माझ्या ऐकाया योग्य मोक्ष धर्मांची ।
भीष्में कथिली सरणी अशुद्ध शुद्धादि सर्व कर्मांची ॥
हा मोक्ष धर्म साधा साधाया योग्य भक्तिमार्ग बरा ।
होतां ज्ञान तयाचें विभ्रम शत्रू पळोनि जाय घरा ॥
एकात्मता समस्तीं असणें हें भक्तिचें खरें तत्त्व ।
तेणें निरखुनि माया सिद्धी आणिमादि दाविती सत्व ॥
बोले उद्धव तेव्हां देखुनि विपरीत प्रश्न घोटाळा ।
त्यांचा निरास करुनी तोडी भ्रमरूप सर्प–वेटाळा ॥
यम हा किती प्रकारें नियम तसा आचरावया धीट ।
कृष्णा, शम दम तैसे धृतिस्थितिक्षा कथीं मला नीट ॥
तप दान शौर्य कैसें त्यागीं सत्यानृता धना इष्टा ।
यज्ञ कुणा, बल कोणा; मग, तैसा लाभ दक्षिणा, स्पष्ट ॥
ही विद्या श्रीही तसी सुख कोणा दुःखही कुणा वदणें ।
पंडित मूर्ख ज्ञानी पंथा स्वर्गहि तसा निरय कथणें ॥
बंधू, गृह. आढ्य कुणा, दरिद्रि वा कृपणहो कुणा बोलूं ।
भक्ति प्रधान ईश्वर संशय नाशाविना कसा तोलूं ? ॥
श्रीकृष्ण वदे तेव्हां हिंसा सोडा असत्य न वदा हो ।
दुःसंगा टाकोनी शुद्ध मनें शुद्ध संचय करा हो ॥ ++

क. काश्यप

'काश्यप' या टोपणनांवें कविता करणारा कवि ना. अ. पाटणकर हे असावेत असा कांहीकांचा समज आहे. त्यांच्या आर्यविज्ञान मासिकांत आलेली एक कविता, 'ओळख':—

पडे भ्रांति ज्यांना स्वकीयांचि ही ती। परां लागिं पैं आप्त जे मानितातो ॥
कधीं आपदेचा जयां वीट नाहीं। अशां आर्यविज्ञान सन्मित्र पाहीं ॥
आम्हीं कोण, आलों कुठें, काय केलें? स्वकीयांहि पूर्वी कसें कार्य केलें ॥
असा अंतरीं ऐ न ज्यांच्या विवेक। तयालागीं हें आर्यविज्ञान चोख ॥
खरे आर्यसिद्धांत दूरी राहाती! नवे पंथ नाना रणें माजताती ॥
अज्ञानें जनाची दिशाभूल होई। तया कारणें आर्यविज्ञान पाहीं ॥
जगन्मान्य विद्वान् जे कीर्तिवंत। असे भारतां जन्मले भाग्यवंत ॥
तयांचीं चरित्रें सदा जीं पवित्रें। कथी आर्यविज्ञान सौभाग्यचित्रें ॥
जुनी देवभाषा जियेमाजि वंद्य। पुराणेंस्मृती शास्त्र आणीक वेद ॥
तियेलागिं आजी मृता बोलतीं हो। म्हणूनी तुम्हां आर्यविज्ञान लाहो ॥

×××

क. रा. द. दीक्षित

कवि रा. द. दीक्षीत यांच्या कांहीं कविता जुन्या मासिकांतून आढळतात. त्यांची एक कविता :—

आदेश

गेलें वर्ष सुखाचें दुःखाचें वा असो परी, आज।
आलें नवीन वत्सर, गत गोष्टींशीं नसे अम्हां काज ॥
पुढतीं अनुभव ज्यांचा घेणें आहे तयास सज्ज असा ॥
कर्तव्यकर्म जाणुनि संग्रामामाजि धीर वीर जसा।
संसार हाच मोठा सुखदुःखांचा सदैव संग्राम!
विजयी होति जयांमधि उद्यमशालीच कीं गुणग्राम ॥
कलियुगिं या मनुजाला आहे आयुष्य फार मोलाचें।
यास्तव जपून वागा रत्नादिक तेंहि त्या न तोलाचें ॥
पळ पळ पळतें त्याचें अमृत बिंदूपरी तया गणुनी।
उद्योग कल्पवृक्षा पोसा प्रेमें अहर्निशीं झटुनी॥
उद्योग हाचि पुरुषा कार्य सिद्धीस पोंचवी।
आराधन करा त्याचें भारता येत थोरवी ॥

**

क. भिकू ग. अभिषेकी

ह. भ. प. भिकू गणेश अभिषेकी यांनीं विविध वृत्तांत काव्यरचना केली आहे. त्यांचें प्रकाशनांत आलेलें एक काव्य, ' उद्योग ' : –

सारी सृष्टि म्हणे नरां, सतत हो उद्योग लोकीं करा ।
उद्योगेंचि असाध्य होय सुलभ, क्षेमावरी अक्षरा ॥
निर्लोभें करितें क्रिया अविरत त्यागोनि निंदादरा ।
संतुष्ट जनता जनार्दन तेंच तो स्वार्थ माझा खरा ॥
आकाशीं रविचंद्रमा युगुल तें रात्रंदिवा संचरे ।
तारा हा नित उद्यमां असरे त्यांतें कदापि न ॥
सूर्याच्या किरणीं समुद्र सलिल प्राशूनियां जें बरें ।
मेघांचे गण अष्ट मास वरि तें देती करोनि बरें ॥
आनंदें विविध प्रकार वितरी जिवांसि धान्यें सदा ।
धातूही निजगर्भि वाढवुनि जी देते परार्थी मुदा ॥
लोकाघाताइ साहुनि प्रचुर कीं हीरादि रत्नें कदा ।
देते ती वसुधा जनास सुचवी, उद्योग दे फायदा ॥
क्षुद्रा ती मधुमक्षिका जमवुनी पुष्पांतुनि दे मधा ।
देती पुष्प फलां तरु प्रसवुनी सानंद नाना विधा ॥
स्वाती बिंदु गिळुनि शुक्ति बनवीं मुक्तां वरीं दे बुधां ।
उद्योगाविण दीर्घ जीवितहि कीं सृष्टी म्हणे ते सुधा ॥
भूमि ही फिरते सदा सलिल किं वाहे जगा तोषवी ।
वाहे वायु विशाल संतत जन प्राणांसि जो जीववी ॥
विद्युत्तेज तसी तमा निवटिती कार्यें करीती नवीं ।
सर्वाधार भलें असे गगनही उद्योग पांचां भवीं ॥
ब्रह्मा विश्व रंची अनेकविध तें, विष्णू करी पालना ।
शंभू कालमिषा धरूनि करितो जीवांसि कीं शासना ॥
इंद्रादी सुर उद्यमींच निरत त्यांतेहि आलस्य ना ।
आलस्यें अपकर्ष, उद्यमचि दे उत्कर्ष उच्चासना ॥
केला जो निजपूर्व जन्मीं मनुजें उद्योग लोकीं तया ।
ज्ञाते ठेविति दैव नाम किं दुजें मानूं नये तद्भया ॥
त्याची मूढ मनीं धरूनि बहु मी उद्योग टाकावया ।
पाहे, पंगु तये बने उभयहि ऐश्वर्य ये कैवि या ॥
गीतेंत व्यवसाय मीच जयही सांगे हरी भारता ।
यासाठीं व्यवसाय जेथचि जय प्राप्ती तिथें निश्चिता ॥

* * *

क ल. उ. सामंत

कवि लक्ष्मण उ. सामंत हे निरंकाल येथील राहणारे असून यांच्या कांहीं कविता गोमंतकीय नियतकालिकांतून प्रसिध्द झालेल्या दिसून येतात. प्रकाशनांत आलेल्या काव्यापैकीं त्यांची एक कविता 'सह्याद्रि'

सह्याद्रि

सह्याद्रीच्या उंच विभागा। उंच उंचशा अनेक रांगा ॥
पाऊलवाटा तिरप्या रेषा। कडेहि पाषाणांच्या जागा ॥ १ ॥
कोंकण खालीं वरी देश हा। सह्याद्रीचा आसमंत हा ॥
फेंस रुपेरी स्वच्छ हांसरा। शुभ्र रंग तो दूधसागरा ॥ २ ॥
घाटामधुनी जों ये गाडी। विवरें मार्गी विशाल झाडी ॥
लता तरूंनां वेढीं ओढीं। प्रत अमर हो जगांत गोडी ॥ ३ ॥
वन्य पशू किति करिती फेरी। गर्द झाडिच्या सुंदर रानीं ॥
शीतल वारा गंध घेउनी। रम्य घालितो मना मोहिनी ॥ ४ ॥
कड्यावरोनी उड्या टाकिती। निर्झर धारा कितीक दिसती ॥
सह्याद्रीचीं भूषणेंच तीं। रम्य रुपेरी वरी चमकती ॥ ५ ॥
गतेसिंहासाचींच साधनें। किल्ले फत्तर सुवणक्षरें ॥
गतकालीचें वैभव सारें। सभोंवतालीं करित पहारे ॥ ६ ॥
पुढतो सागर-लाटा दिसती। उंचवळे जणुं मनींची प्रिती ॥
सह्याद्रीची वर्णन-उक्ति। सरेल का ती कधिं कल्पांतीं ? ॥ ७ ॥

क. श्यामसुंदर देसाई

कवि श्यामसुंदर देसाई यांच्या कांहीं कविता 'राष्ट्रमत' मधून प्रकाशनांत आल्या आहेत. त्यांतीलच ही एक कविता—

तूं चित्त चोरुनीयां

'कान्हा छळीत राध' कां हें पटेल कोणा। तूं चित्त चोरुनीयां,हा चित्तचोर मी ना ॥ ध्रु० ॥
ना झुंजू मुंजू होतो यमुनाजलासि येसोहि। ना संगतीं कोणीहि चाहूल त्यांत घेसी ॥
अडवी न, दक्ष राहे शिकवीत सावधाना। तूं चित्त चोरुनीया, हा चित्तचोर मी ना ॥ १ ॥
का गोरसास शिंकीं ? नसतीं कडया कपाटें ?। घट मातीचेच कांते ? जाती फुटून वाटे ॥
पाणी कुठें मुरे तें राधे ! कुणा कळेना। तूं चित्त चोरुनीयां, हा चित्तचोर मी ना ॥ २ ॥
ऐकुन वेणुनाद धांवून येसी वेगीं। कां मंत्रमुग्ध व्हावें ? तूं का कुणी कुरंगी ॥
अपराधि पारधी का? मोहून चित्त गाना। तूं चित्त चोरुनीयां, हा चित्तचोर मीं ना ॥ ३ ॥
नंदाघरींच काय तव ठेव ठेवेलेली ?। ना काम धाम धंदा ? कुंजांत कां अवेळीं ॥
वदसी न याहुनी का ? 'माझें तुझें पटना।'तूं चित्त चोरुनीयां हा चित्त चोर मी ना ॥ ४ ॥

क. स. रा. केणी

क. सज्जन राम केणी यांचे कांहीं गद्य लेख प्रसिद्ध झालेले असले तरी त्यांचें पद्यलेखन फारसें कुठें प्रकाशनांत आलेलें दिसत नाहीं. तथापि त्यांना काव्यरचनेची आवड असून त्यांच्या संग्रहांत अप्रसिद्ध अशा कांहीं कविता असाव्या असें वाटतें. त्यांची एक कविता 'श्रीरामनाथ स्तवन'

श्रीरामनाथ स्तवन

जयतु जय श्रीरामनाथा । कल्पतरुची तूं अनाथा ॥धृ०॥
अंकिं अंबा शिरीं गंगा ! चंद्रमौळी भस्म अंगा ॥
स्कंधिं खेळवी जो भुजंगा । नमन त्या श्रीरामनाथा ॥

× × ×

क. बा. स. बवें

श्री. बाळकृष्ण सदाशिव बर्वे यांचें गद्यलेखन गोव्यांतील व बाहेरीलहि अनेक नियतकालिकांतून सुरू आहे. 'गातुवित' मासिकाचे ते संपादक असून त्यांनीं कांहीं पुस्तकेंहि लिहिलीं आहेत. तथापि त्यांचा पद्यसंग्रह असा अजून प्रकाशनांत आला नाहीं. ते कविता लिहितात; पण त्यांचें प्रमाण अत्यल्प आहे.

* * *

क. श्री. पां. नार्वेकर

श्री. श्रीशंकर पांडुरंग नार्वेकर हे लेखक, तसेंच कवीहि आहेत. शिवमहिमा, जयमाला, मधुमंगल अशीं संगीत नाटकें लिहून त्यांनीं प्रकाशनांत आणलीं आहेत, यांच्या कविता मार्मिक आहेत. मात्र अजून त्यांचा काव्यसंग्रह असा कांहीं प्रकाशनांत आला नाहीं.

× × ×

क. स. पां. बवें

क. सखाराम पांडुरंग बर्वे यांचा लेखक किंवा कवि म्हणून लोकांनां जितका परिचय आहे त्यापेक्षांहि नाटककार, पेटीवादनकार, संगीत शिक्षक म्हणून त्यांची विशेष प्रसिद्धी आहे. सुंदर चालींवर त्यांनीं बरीच काव्यरचना केली आहे.

* * *

क. कृ. के. रायकर

क. कृष्ण केशव पै रायकर यांचें काव्य भक्तिरसपर आहे. यांचें वास्तव्य मुंबई येथें होतें. जुन्या काव्य रत्नावलींत यांच्या कविता येत असत. यांचा कवितासंग्रह प्रकाशनांत आलेला दिसत नाहीं.

* * *

क. विष्णु निपाणीकर

क. निपाणीकर यांच्या कांहीं कविता पणजींच्या माजी कला मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या आहेत.

* × *

क. ना. र. केंकरे

क. ना. र. केंकरे यांनीं रचिलेलीं गुलाबराव महाराजांचीं पदें कृ. ज. थळी यांनी मुंबई येथें प्रसिद्ध केलीं आहेत.

× * ×

क. शहाजी साखळकर

कवि शहाजी साखळकर यांच्या कांहीं भक्ति-रसपर कविता इतो प्रकाशनांत आलेल्या दिसतात. 'दोन अभंग' हीं त्यांचीं विद्या वार्षिकांतील दोन काव्यसुमनें नमुन्यासाठीं देण्यांत येत आहेत.

— १ —

शत जन्म माझे जरी गेले देवा । तुझ्या भक्तिपात्र नाहीं मी केशवा ॥
हावरें माझें मन नावरे आतां । तुझा कृपा हस्त ठेवी माझ्या माथा ॥
जीवित माझें आतां संपुष्टांत आलें । नाहीं बा म्या केले पुण्य कांहीं ॥
बाप नाहीं आई, बहिण नाहीं भाऊ । कैसा जगीं राहूं तुजवीण ॥
पूर्ण ना शिक्षण अपूर्ण माझें । लहानाहून लहान दास तुझा ॥
सांगु कुणा आतां मनींची ही व्यथा । धांव पंढरीनाथा मायबापा ॥
खचित जन्म माझा जातो आज वायां । कुणा पडू पांया तुजवीण ॥
लज्जा वाटे जिवा, त्रासलों या दुःखीं। अंतःकालिं तुझें नाम राहो मुखीं ॥
कवित्वाची आस धरूनी मनाशी । संतकविजनांशीं प्रणिपात ॥
रखुमाईच्या कांता ऐकावी विनंति । तुझिया नामें मोक्ष द्यावा मज अंतीं॥

— २ —

नरदेहीं बहूत कष्ट झाले । कैक विसरले नीतिधर्म ॥
द्रव्य लालसेंन स्वार्थांध बनले । ओळखिना झाले भाऊबंदा ॥
काम मोहें लोभें मोहूनियां गेले । नाम विसरले देवा तुझें ॥
सत्य नीतिधर्म पायीं तुडविती । धन लुबाडिती सज्जनांचें ॥
ऐशी बुद्धि मज नको देऊं देवा । नित्य तुझी सेवा घडो मज ॥
आणिक तुज कांहीं न मागे मी आतां। सत्य नीति माझी न ढळो कल्पांता॥
मागतो मी देवा पुन्हा पुन्हा आतां । तुझ्या नामें मन रंगो आतां ॥
तुझ्या नामें पाप विलयासी जावो । फोडूनियां टाहो शहाजी म्हणे ॥ ★

क. भारती नाईक

क. भारती नाईक यांची 'विद्या' वार्षिकाच्या नवीन अंकांतील 'जीवन' ही एक कविता—

जीवन

काय असे हें जीवन आमुचें निव्वळ भासापरी ।
आज असे परि उद्यां मिटायचें दुबळ्या स्वप्नांपरी ॥
भेदभाव तूं करूनी मानवा दुफळीला नको देऊं विसावा ।
पीडितांची तूं कर सेवा जीवन तव सुखवाया ॥
स्वार्थासाठीं झिजवूनी काया नको घालवूं जीवन राया ।
परस्परांवर करूनी माया पसर तूं प्रीति-छाया ★ ★

क. अनिल परुळेकर

क. **अनिल आ. परुळेकर** यांची 'विद्या' वार्षिकमधील 'चांदणं' ही एक कविता—

चांदणं

शुभ्र तुषारलं दूध ।	मुग्ध झालं आसमंत ।
आकाशाच्या अंतरांत ।	पाझरलं चांदणं ॥
वारा वाहे नदींतून ।	त्यांत वृक्षांच्या सावल्या ।
शुभ्र तृणांचे गालीचे ।	जग सारें चांदण्याचें ॥
रातराणीचा सुगंध ।	हाही चांदण्याचा गंध ।
वाटे वहावा अनंत ।	हा विश्वाचा आनंद ॥
देहामधून गेहांत ।	वाहे स्फूर्तीचं अमृत ।
संथ मनाच्या डोहांत ।	फुटे ओला चिंब नाद ॥

★ ★ ★

क. श्यामसुंदर जांबावलीकर

कवि **श्यामसुंदर गो. जांबावलीकर** यांची 'विद्या' वार्षिकमधील एक कविता 'सार्थक' —

सार्थक

तिमिर जाऊनि प्रकाश उजळे जगती चोहोंकडे ।
परि न हटती माझ्या मनींचें विषण्णतेचें कडे ॥
पाऊल पुढती टाकायास्तव अखंड मी धडपडें ।
परि कुणाचा जीव सदोदित माझ्यासाठीं रडे ॥
काय करावें कसें करावें मार्ग मला ना कळे ।
मृगजल देखुनि धाव धाऊनी तृषार्त मी तळमळें ॥
विधिलेख जो लिहिला आहे रडुनी का तो टळे ॥
तरीहि का मी एकसारखा सुखामागुनी पळे ॥
नाशिवंत जर जग हें, सारी क्षणभंगुर काया ।
गुरफटून मग मोहजाळीं जाऊं नको तूं वाया ॥

× + +

क. रघुवीर पं. नाईक

क. रघुवीर पं. नाईक यांची एक कविता

गीत

हरवलेलं प्रेम
गवसलं मला—
अहंतेच्या,
काळ्या फत्तरांत.
कल्पतरूच्या,
बनांमध्ये.
निरभ्र नभीं,
चंद्ररोहिणीसेंव.
वाक्फुलांच्या,
अंधारांत.
मोगरीच्या
मस्त सुगंधी.
कनकाच्या,
शैल शिरीं.
आणि
बेभान होऊन,
नक्षत्रांच्या
रुपेरी रात्रीं,
मुक्त छंदीं,
गाईलें हें गीत
तुतारीसम.

★

क. द. मा. निगळ्ये

कवि द. मा. निगळ्ये यांची 'विद्या' वार्षिकांतील 'काळ चालला' ही एक कविता—

काळ चालला....

काळ चालला वेगानें वहात... . झाणि मी झालों आनंदानें बेहोष
जसें पावसाचें पाणी . हंसूं लागलों पूर्णचंद्रासारखा
कुणाची दखल न घेतां वहात जातें . पण काळाच्या उलट्या फेऱ्यांत सांपडलों
राहातात फक्त अस्पष्ट खुणा . वळवाच्या पावसाप्रमाणें
आणि रोहावलेले दगड . जीवनांतील आनंद निघून गेला
एक काळ असा हता— . राहिल्या फक्त अस्पष्ट खुणा...स्मृति
जेव्हां माझ्या जीवनांत— . भारावलेलं हृदय....
वसंतानें केला प्रवेश . काळ चालला वेगानें वहात..,

★

क. रघुनाथ गणेश तळवडकर

कवि रघुनाथ गणेश तळवडकर हे अंत्रूज महालांतील फोंडें येथील रहिवासी. हे एक ध्येयप्रधान साहित्यिक होते. ठिकठिकाणच्या महाराष्ट्रीय नियतकालिकांतून आणि गोमंतकीय मासिकांतूनहि त्यांच्या बऱ्याच कविता टोपण नांवानें प्रकाशनांत आल्या आहेत. भारत-मित्राच्या सातव्या सालच्या सहाव्या अंकांत त्यांची जी एक कविता प्रसिद्ध झाली होती ती ही —

आहुति

विजयनगरचा कृष्ण राय नि महाराष्ट्र वीर ।
शिवछत्रपती, तानाजी वा बाजी बल्लाळ ॥
करी घेउनी शीर आपुलें कां लढले सांगा ।
स्वातंत्र्याविण अन्य न कांहीं कारण या यंगा ॥
सिंहगडावर बाजी पडला, बापू अष्ट्याला ।
प्रेमभरानें आम्हीं त्यांच्या गातों शौर्याला ॥
स्वतंत्रतेच प्रीय भक्त ते यासाठीं नाचे ।
स्तुती तयाची मोदभरानें परि अमुच्या वाचे ॥

*

रामदास कवि गिरिकंदरिं त्या कां जाउनि बसले ।
त्यक्तभोग होउनी तुक्याचे नयन जलीं न्हाले ॥
विद्यारण्यहि माधव मौनी त्यागी कां झाले ? ।
कां भर्तृहरी राज्य त्यागुनी संन्याशी बनले ? ॥
कंटकमय संबंध सोडुनी कटु तर जगताचा ।
स्वातंत्र्याचल—शिखरीं व्हावें आरुढ ही इच्छा ॥
म्हणुनी मजला स्वतंत्रता जी देवि महात्म्याची ।
अनन्य भक्ती तिची करावी ही इच्छा जाची ॥
तडकन् सारे बंध तोडुनी मानस सृष्टीचे ।
निरिच्छ बनलों; ये ये आतां स्वतंत्रता दयिते ॥
नको भोग ते नको मला ते व्यवहारहि सारे ।
बद्ध करीती मानस माझें यासाठीं बारे ॥
अशा विचारा आणुनि चित्तीं पूर्ण साधु बनलों ।
आयुष्याचा काळ सुखानें घालविता झालों ॥
परन्तु एक्या दिनी सकाळीं बसुनी कांतारीं ।
करीत आराधना प्रभूची केवळ ती सारी ॥
काव्योत्सुक जन एका आतां काय अशुभ घडलें ।
चित्त सर्व तें माझें असतां ईशचरणिं रमलें ॥

नकळत कोणा गृह त्यागुनियां दीड वर्ष झालें ।
छळूं नका यापुढें प्रिया मज, हताश मी बनलें ॥
कुठें करावा शोध आपुला, काय गती झाली ? ।
सौख्यामध्यें कोणी माझ्या माती कालविली ? ॥
दुःखा वेगें व्याप्त सखी ती वचन असें बोले ।
दीन वदन कमलासम लोचन अश्रूंनी भरले ॥
दिव्य सतीच्या सौंदर्याला दिव्य तेज चढलें ।
मानस माझें बधीर होउनी काव्ययुक्त झालें ॥
चरणिं तियेच्या लीन होउनी दीन काव्य वदलों ।
" देवी ! आतां क्षमा करी मज, पापी मी बनलों ॥
नको शिवाजी रामदासही, नकोच स्वतंत्रता ।
स्वतंत्रते, तूं काव्यदेविची पदवी घे आतां ॥
दीर्घ परिश्रम करुनि मिळविलें ज्या स्वातंत्र्याला ।
तव पदिं देवी ! अर्पण करितों, पदरीं घे त्याला ! ॥

× × ×

कवयित्री गोदावरी विष्णु नायक

कवयित्री गोदावरी विष्णु नायक (मडगांव) यांचा काव्यरचनेकडे नैसर्गिकच कल होता; पण पूर्वायुष्यांत त्यांचें काव्य कुठेंच प्रकाशनांत आल्याचें दिसलें नाहीं. उत्तर वयांत लिहिलेलें त्यांचें आध्यात्मिक काव्य मात्र वाचकांपुढें आलें. ' चाखूं आम्ही सारे ज्ञानामृत ' हें त्यांचें काव्य-पुष्प अनेकांनां आवडलें. अंतरंगाप्रमाणेंच त्याचें बाह्यांगहि ठीक वठलें.

चाखूं आम्ही सारे ज्ञानामृत — (प्रकाशिका—श्री. सौ. मोगा माधव विर्जीनकर, मुद्रण —सागर साहित्य प्रेस, मुंबई. पृ. ३२ सन १९५८.

* *

क. गोपालकृष्ण भोबे

क. गोपालकृष्ण भोबे यांचें काव्यापेक्षां गद्य वाङमयच वाचकांपुढें विशेष आलें आहे. त्यांनीं अनेक पुस्तकें लिहिलीं, नाट्य वाङमयालाहि जन्म दिला, पण निव्वळ काव्यपुस्तक असें कांहीं त्यांचें प्रकाशनांत आलें नाहीं. तथापि त्यांची अभंगरचना भावनाप्रधान व वेधक होती आणि अभंग गाण्याची त्यांची पद्धतहि आगळीच होती. त्यांचें काव्य अल्प असलें तरी गोड व गेय आहे.

× × ×

क. सुनाबाई केरकर

क. सुनाबाई केरकर या मूळच्या पेडणें महालांतील केरी येथील असून त्या मुंबईलाच राहात असत. यांच्या कविता साध्या बालबोध वळणाच्या असत. सन १८९६त यांनीं एक संगीत नाटकहि लिहिलें होतें. त्याचें नांव ' छत्रपति संभाजी '

* *

क. डॉ. अनंतराव सरदसाई

कवि डॉ. अनंतराव सरदेसाई यांचा पेशा डॉक्टरीचा, पण काव्यरचनेकडे त्यांचा जन्मजात कल आहे. त्यांनीं निरनिराळ्या विषयांवर अनेक कविता रचल्या व निरनिराळ्या नियतकालिकांतून त्या प्रकाशनांतहि आल्या; पण त्यांचा काव्यसंग्रह प्रकाशनांत आला तो एकच 'अमर काव्यें' हा.

अमर काव्यें— (प्र. डॉ. अनंतराव सरदेसाई, म्हाडदोळ) मुद्रण—सागर-साहित्य मुद्रणालय-पणजी, १९६९, पृ. ५२, मू. २ रु.

या त्यांच्या काव्यसंग्रहांतील ३२ कवितांपैकीं एक कविता :—

देशभक्ताचें मृत्युपत्र

चंद्रकिरणांच्या प्रकाशीं ..... मृत्युपत्रा लिहितसें
आसवांची साक्ष याला ..... अन्य येथें कुणि नसे.
क्रूर मौंरें जाइं मरुनीं ..... जीविताची खात्रि ना
'मातृभू मम' बोललों मी ..... शासकां हा हो गुन्हा.
सकल माझे बंधुभगिनी ..... सारखेची हो मला
'देशभक्ती-धैर्य' माझें ..... समचि वांटीं त्यांजला.
वारसा हा घेउनियां ..... पर कयांशीं भांडणें
मृत्युपत्रीं वारसांशीं ..... हेंच माझें मागणें.

×××

कवि तारानाथ

कवि तारानाथ हे पणजीचे रहिवासी, पण त्यांचें निश्चित नांव कळत नाहीं यांच्या कवितां जुन्या मासिकांतून प्रसिद्ध झालेल्या दिसून येतात. त्यांची 'प्रभात' मासिकांतील 'तुझ्याविना' ही कविता—

तुझ्याविना

हा तीव्र विरह जाळितो मना
संसार तुझ्याविण मजसि सुना ॥धृ०॥
शांत रम्य या सुगौर रात्रीं ।
रिझे न मन माझें नक्षत्रीं ।
निसर्ग करि हें दान अपात्रीं ।
व्यर्थ सर्व हें तुझ्याविना ॥
भरला सागर, सारी धरणी ।
प्रशांत सुंदर शशि किरणांनीं ।
परि माझें गे हृदय रिकामीं ।
शांति न लाभे तिळ जिवना ॥
अनिलांच्या मृदु लहरींवरती ।
कवनें माझीं कितीक विरती ।
तूं नसतांनां मम सांगातीं ।
पूर्णता न ये मम कवना ॥
हातुनि माझ्या तव अपमान ।
घडला कां गे नुरुनी भान ।
म्हणुनी करिशी का अनमान !
पुनित कराया मम सदना ॥
विरहकाल हा सरतां न सरे ।
हृदयाशांचे आटती झरे ।
जीव तसा हा निरंतर झुरे ।
भाकितसें मी तव करुणा ॥

* * *

क. भालचंद्र वा. तळावलीकर

श्री. भालचंद्र वा. तळावलीकर यांच्या कांहीं कविता कांहीं नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या पाहण्यांत येत आहेत. पण अजून काव्यसंग्रह असा कांहीं प्रकाशनांत आलेला दिसत नाहीं. अलिकडेच प्रकाशनांत आलेली त्यांची एक कविता 'तेथें नतमस्तक व्हावें' ही पुढें दिली आहे.

तेथें नतमस्तक व्हावें

स्वार्थ सोडुनि अचल मनानें
करिती जे जनसेवा ।
तयांचें गुणगान गावें
तेथें नतमस्तक व्हावें ॥१॥
जीवनाची करुनी पणती
सेवेच्या सरसावुनि वाती
कर्तव्याची ज्योत तेवती
गीत तयांचें गावें
तेथें नतमस्तक व्हावें ॥२॥
घनतिमिरांतुनि मार्ग शोधण्या
ध्येयपूर्तिचें तत्त्व सांगण्या
खपती जे नित व्रत आचरण्या
तयांना वंदावें भावें
तेथें नतमस्तक व्हावें ॥३॥
हित साधण्या सकल जनाचें
जीवन जगती संन्याशाचें
चिंतन करिती हित जगताचें
ऋण त्यांचें काय कथावें
तेथें नतमस्तक व्हावें ॥४॥

*

क. रा. य. तिळवे

श्री. रा. य. तिळवे यांच्या कांहीं कविता अलीकडेच वृत्तपत्रांतून प्रसिद्धीस आलेल्या दिसत आहेत.

'राष्ट्रमत' दैनिकाच्या एका अंकातून प्रसिद्ध झालेली त्यांची एक कविता 'विठ्ठलगाथा' ही पुढें दिली आहे.

विठ्ठलगाथा

विठ्ठला वानूं किती तव गाथा ।
चरणीं लावितों तन मन माथा ॥धृ०॥
तुझेंच सारें गूढ आगळें ।
कणाकणांतुनी रूप वेगळें ॥
भक्तगणांची माय माउली ।
धांवे संकटीं गुप्त पाउलीं ॥१॥
म्हणती घननिळा, कुणी सांवळा ।
देसी जनांला शांति-विरंगुळा ॥
भाव पारखी तूंच त्रिभुवनीं ।
अदृश्य परि व्यापिसी अवनी ॥२॥
म्हणती बहुरुपी, कुणी निरूप ।
तुजविण भक्तां कोण समीप ॥
कृपा सावली तुझिया डोळां ।
काय उणें मग लेंकुरबाळां ॥३॥
सगुण कुणी, म्हणती निर्गुण ।
भाव देखुनी दाविसी रूप गुण ॥
माता पिता अन् कोण तुजविण ।
अवतार विविध परि एकच निरूपण ॥४॥

क. हिराबाई पेडणेकर

क. हिराबाई पेडणेकर यांचा जन्म पेडणें येथें झाला पण त्यांचा पुढील बहुतेक सारा काळ मुंबई येथेंच गेला. यांनां जन्मत:च काव्याचा नाद होता तथापि काव्याच्या विशेष अभ्यासाच्या अभावीं प्रतिभासंपन्न अशा कविता त्यांनां अखेर-पर्यंत लिहितां आल्या नाहींत. त्यांनीं रचलेल्या साऱ्या कविता अगदीं साध्याच आहेत. त्यामुळेंच 'जयद्रथ विडंबन' आणि 'दामिनी' या आपल्या दोन्हीं नाटकांतील पदें त्यांनीं अन्य कवींकडून करून घेतलीं.

★ ★ ★

क. हितचिंतक

कवि हितचिंतक या टोपण नावानें यांच्या कांहीं कविता प्रकाशनांत आलेल्या दिसतात. हे बहुतेक वास्को येथील असावे असें वाटतें. सन १९६४मध्यें प्रसिद्ध झालेली त्यांची एक कविता–

श्रद्धांजलि

प्राजक्ताचा वृक्ष कोसळे चिंतामणि कोठें न मिळे ।
अंतराळ लाक्षागृह बनलें पांच पांडवां जाळियलें ॥
नव्या जगाचा मानवतेचा सूर्य जळाला झांकळते ।
चंदनशीतल भारतभूषण चंद्रालाहि पडे सळे ॥

★

क. अनंत

कवि अनंत हे पणजी येथील रहिवासी असून त्यांची 'सुपुष्प' ही खालील कविता सन १९३१ साली प्रकाशनांत आली होती.

सुपुष्प

जगा मोहाया फूल फुले एक ।
कितिक रंगांच्या छटा वरी देख ॥
सुगंधानें दश दिशा भरुनि जाती ।
फूलपक्षी मोहूनि तिथें येती ॥१॥

डुले वेलीवर पुष्प सुकुमार ।
देइ झोके त्या पवन हळूवार ॥
मधू चाखाया धांव अली घेती ॥
रसिक हुंगाया संधि पाहताती ॥२॥

दुजे दिवशीं कोमून कुसुम गेलें ।
वेलिपासुनि तें हळुच गलित झालें ॥
कुणी येती तुडवूनि तया जाती ।
हीच जगताची जिथें तिथें रीती ॥३॥

काल कोण्या वैभवीं फूल होतें ।
आज कोण्या दारुण संकटीं तें ॥
काळ कैसा विपरीत कुणा येई ।
कधीं केव्हां समजणें मुळीं नाहीं ॥४॥

× ★ ×

क. ना. न. पै

कवि ना. न. पै यांनीं खास बाल वाचकांकरितां लिहिलेली ' घाई ' ही एक कविता—

घाई

चल ग ताई । करिं जावया फिराया घाई ॥
पांच वाजुनी गेले तरिही ।
जाण्याचें तुज भानच नाहीं ।
किंवा अजि तूं येतच नाहीं ।
सांग ना ताई । किति उशीर हा बघ होई ॥१॥
माझी तर ही तयारी झाली ।
चल तूं आतां येतें खालीं ।
विसरुं नको परि छोटि बादली ।
येतें आई । झाला उशीर हा किं ग बाई ॥२॥
चौपाटीवर लवकर जाउनी ।
बाळूसंगें खेळ खेळुनी ।
रिझवूं आपुल्या मनास फिरुनी ।
कष्टलें भारी । दिनभरी शाळेमाझारीं ॥३॥
किल्ले रेतीचे करूं जाडे ।
तसेच डोंगर आणि खोडे ।
त्यांवर लावुनि स्वदेशि झेंडे
सांगूं लोकां । संदेश गांधींचा भाई ॥४॥

* * *

क. सखाराम नारायण करंडे

कवि सखाराम नारायण करंडे हे कवळे येथील राहाणारे असून ते कवि व लेखक, तसेच कीर्तनकारहि होते. आपल्या कीर्तनासाठीं त्यांनीं कांहीं आख्यानें लिहिलीं होतीं आणि त्यांच्या-साठीं आर्या, दिंडीं, साकी, ओवी अशा विविध वृत्तांत काव्यरचना केली होती. नियतकालिकांतहि त्यांच्या कांहीं कविता आल्या आहेत. सन १९२१ सालांत रचलेली त्यांची एक कविता—

स्वयंसेवकास

स्वयंमेव सेवकव्रत जनता सेवार्थ धरुनि अवतरसी ।
यंता परिस्थितिपथीं होतां वाटे कुणा न तूं डरसी ॥
सेवा धर्म गहन हा योग्यांसहि भर्तृहरि असे बोले ।
वज्रहृदय खल ते परि सेवक म्हुणुनीच मारितां टोले ॥
कष्टहि सोसी, स्पष्टचि वद, दुष्टां तुष्ट कोण तो करितो ? ।
विहित हित वदायाचा बाणा तव जो असे सदा धरिं तो ॥
जनसेवामिष दाउनि करिती हाल चाल चवचाल ।
योग्य न तुज तो जनदाहक निंद्य विंध नव चाल ॥
स्तुति निंदा करु कोणी कितीहि केव्हांहि कवणही जागीं ।
तेजस्विता असो ती सखया तव नित्यनूतना जागी ॥

× × ×

कवि अरविंद

कवि अरविंद यांच्या कांहीं कवितांपैकीं सन १९२२ सालांतील 'प्रेमाचें तत्त्वज्ञान' ही एक कविता आहे.

प्रेमाचें तत्त्वज्ञान

भेटाया करि धाइ निर्झर जवें मुग्धा सरित्प्रेमला ।
आलींगी तटिनी समोद जलधि प्रमोत्पूर्ण जला ॥
आकाशीं करि गान वायुलहरी निर्वैर एक स्वरें ।
एकाकी नच राहि कांहिं जगतीं वाटे मनाला खरें ॥
एकामेकिं अशेष वस्तु मिळणें नेमी प्रभू तो जरी ।
कां व्हावें व्यक्तिकीर्ण आम्हि न तरी, सांगे मला सत्वरी ॥
पाहीं पर्वतराज चुंबि गगना सोल्हास तैशापरी ।
अन्योन्या करि बाहुबद्ध मिळुनी कल्लोळ ते सागरीं ॥
द्वेषातें धरि पुष्प जाण तरि तें निष्ठूर बंधूवरी ।
धिक्कारा करि पात्र सत्य अपणा मौर्ख्यें जगाभ्यंतरीं ॥
रश्मीना कवटाळि आत्महृदयीं प्रेमें रवी मेदिनी ।
चुंबाया उदधि क्षपाकरकरां संतोष वाटे मनीं ॥
राही काय अमेय मोल तरिया सांगे सुहृत्संगमीं ? ।
प्रेमाला जरि जाहला न तुझिया सद्भक्त हा पात्र मीं ॥ ★

कवि शरच्चंद्र देशप्रभु

आधुनिक नियतकालिकांत श्री. शरच्चंद्र देशप्रभु या कवीच्या कांहीं कविता प्रकाशनांत आलेल्या दिसत आहेत. अलीकडेच प्रसिद्ध झालेली त्यांची एक कृति 'एक अनुभूती' —

एक अनुभूती

संध्यासमयीं भग्नहृदयी क्षितिजावर उमटतात
लाल ओरखडे
लाल ओरखड्यांतुन ओघळतें
लाल उष्ण रक्त
वारा दीर्घ उसासे टाकतो
शोकमग्न, दुःखदग्ध
पांढऱ्या फटफटीत लाटा फेसाळत फसफसतात
विरून जातात
आणि वाळू उगाच पायांत अडखळते
लोचट कुत्र्या सारखी

*

क. आ. ना. पेंडणेकर

कवि आ. ना. पेंडणेकर यांचें मूळ घराणें गोव्यांतील पेडणें येथील असून त्यांच्या पूर्वजांचें वास्तव्य फार कालपर्यंत पेडण्यासच होतें. पुढें कांही कारणानें ही मंडळी गोवा सोडून जवळच्या सावंतवाडी संस्थानांत गेली व तेंथेंच स्थायिक झाली त्यांच्या वंशजांपैकींच क. पेडणेकर हे एक आहेत. यांच्या अनेक कविता निरनिराळ्या मासिकांतून प्रकाशनांत आल्या आहेत. सन १९५६ च्या ऑक्टोबर महिन्यांत प्रसिद्ध झालेली 'आवर तव लहरी' ही क. पेडणेकर यांची एक कविता पुढें दिली आहे.

आवर तव लहरी

रे सागर, आवर तव लहरी ।
बघ उभा अगस्ती तिरावरी ॥ धृ० ॥
विभवें झळति भूचीं रत्नें
बघतां नेशी हरप्रयत्नें
उन्मत्ता परि आज पाहणें
दडतात काय तीं तवोदरीं ॥

२

वीर धरेचे पुढती आले
रक्तानें जल रंजित झालें
किति भक्तांनीं तुला विनविलें
परि अजिंक्य होशी आजवरी ॥

३

नको प्रमत्ता करुं उल्लंघन
अडविलें तुजला येथिल कणकण
होता निश्चल, सुप्त, अचेतन
उसळलें किनारा आज परी ॥

४

उज्वल ज्यांचें तप सामर्थ्य
विशुद्ध ज्यांचें अन् चारित्र्य
अगस्तीस त्या काय अशक्य ?
शिर ठेव तुझें तत्पदांवरी ॥

५

शापवाणि स्फुरतां अधरांतुन
उडतां ठिणगी बा नेत्रांतुन
लुप्त क्षणामधिं होइल जीवन
अजि ज्वलन् तेज ये तुझ्या घरीं ॥

६

वृथा गर्जना आवर आवर
जलकणपुष्पें उधळी त्यावर
रत्ननिधीकर अर्पण सादर
मुनि श्रेष्ठ, सेव्य हा खरोखरी ॥

७

खुळ्या परत घे आधीं लहरी
विलीन कर त्या त्वदीय अंतरिं
सोडुं नको कधिं दुज्या तिरावरि
प्रगटेल अगस्ती ध्यानिं धरी ॥
रे सागर आवर तव लहरी
बघ उभा अगस्ती तिरावरी ॥

× × ×

क. सौ. सुधा देसाई

क. सौ. सुधा देसाई यांची 'भारतमित्र' मधील एक कविता—

—वि नं ति—

येऊं दे दया, दया महाराजा ॥
तुला हा प्रणाम रे माझा ॥
थोडा घे नफा, नफा पोटापुरता ।
क्रूरता नको दाउं आतां ॥
अति पापाचे, पापाचे डोंगर ।
वाढवूं नको आतां फार ॥
मुलांबाळांचें, बाळांचें हीत त्यांत
नको करुं असा त्यांचा घात ॥
दाम दुपटीचें, दुपटीचें वीष फार ।
होतील घात पात थोर ॥
आडबाजार, बाजार संसाराचा ।
मार्ग हा आहे नरकाचा ॥
सुख पैशाचें, पैशांच तुला मोल ।
जीव हा जाईल अनमोल ॥
नाहीं आधार, आधार कुणाचाहि ।
अतीचा लोभ सोड पाहीं ॥
कशाचे सांठे, सांठे रक्ताचे ॥
श्रमांचे शापातापाचे ॥
होइल तळमळ, तळमळ जीवाची ।
न मिळे पांखर मायेची ॥
झाला भूकंप, भूकंप आकांत ।
होइल तसा वखारींत ॥
सोड हे सांठे, सांठे पापाचे ।
झटके येतिल अतीचे ॥
शेजची कांता, कांता तळमळते ।
धनानें काय प्रेम जगतें ॥
वेड हें सोड, सोड मायबाप ।
वाचा फुटेल बा पापा ॥

*

क. आनंद प्रभु

क. आनंद प्रभु यांची 'भारतमित्र' मासिकांत आलेली कविता नंदादीप.

नं दा दी प

विरक्तीच्या शांततेंत
हरे माझा सर्व ताप
मंगल त्या मूर्तीपाशीं
शांत जळे नंदादीप !
मुनि ध्यानस्थ वनांत
जसा बसे, करी तप
देऊळाच्या गाभाऱ्यांत
शांत जळे नंदादीप !
आणि आसक्तीनें माझ्या
चित्ताचा रे थरकंप—
होई, जसा पतंगानें
हेलकावे नंदादीप !
दिव्यत्वाचा साक्षात्कार
सदा त्याच्या संगतींत
स्फूर्ति जगा देण्यासाठीं
जळे शांत नंदादीप !
दिव्य त्याच्या सद्भक्तीला
असो माझा प्रणिपात
देण्या दुज्या प्रकाशातें
शांत जळे नंदादीप !

★

क. वि. ज. बोरकर

सांज गोरी मोरी

विरतांनां काळोखांत चरकती छाया
नको तीच घोंगावते मनांतून माया
दीप लावतांनां, ज्योत थरथरे उरीं
उभी नभांत ही अशी सांज गोरी मोरी

*

क. नारायण वा. लाड

क. ना. वा. लाड यांच्या कित्येक कविता नियतकालिकांतून प्रकाशनांत आल्या आहेत. त्यांतीलही एक—

वसंत गेला ग्रीष्म आला !

वसंत गेला, ग्रीष्म पातला
तरुलतांचा बहर ओसरला—
अन् आली त्यांनां अवकळा.
माळावरती एका होता एक थोराड तरु
त्याचा सुद्धां उत्साह आतां
लागला होता ओसरूं.
उदासीन तो बोलूं लागला
स्थित प्रज्ञाची भाषा,
उरली नव्हती जीवनीं त्याला
इवली सुद्धां आशा.
तळपत होता स्थितप्रज्ञ तो
समाधिस्थ होता उभा.
झुरत होता मनीं म्हणोनी,
कोण कुणाचा सगा...
आभाळाच्या कोंपऱ्यांतून इतक्यांत
आषाढानें घातला साद
सौदामिनीच्या लकाकीनें खुलला त्याचा उन्माद
कुठें गेली समाधी—!
पार विसरून गेला.
रोमरोमांतून तयाच्या रोमांच
उभा राहिला.
वसंत जातां ग्रीष्म येतो
नियतीची ही कळा,
आषाढाचा साद ऐकतां
गाऊं लागतो गळा !

*

क. संदीप वेर्लेकर

कवि संदीप वेर्लेकर यांच्या कविता अलीकडे वृत्तपत्रांतून वरचेवर दिसत आहेत, त्यांपैकीच ही एक—

मानवतेचे अश्रु

मानवतेच्या महायज्ञांत
कधीं कधीं पडते मानवतेचीच आहुती
आणि इतिहासाच्या पानावर नोंदली जाते,
आणखी एक विभूती.
मुक्त मानव आणि शोषणरहीत समाज
कुठून तरी निनादत असतो एक—
धीर गंभीर आवाज
ह्याच आवाजाच्या दिशेनें सुटते
उन्मत्त माथेफिरूची गोळी
आणि क्षणार्धांत पेटते मानवतेचीच होळी.
ज्वलंत राष्ट्रवादाच्या मुशींत
आकार घेते संकुचित मानवी आकृति
प्रखर साम्यवादाच्या कुशींत
पोसली जाते साम्राज्यवादी पाशवी संस्कृति
चोहींकडे वहात असतात रक्ताच्या धारा
प्रत्येकाच्या मुखांत मात्र शांततेचाच नारा
क्षणाक्षणाला वाढणारी युद्धाची भयानकता
हीच मानवतेची खरी खुरी अगतिकता
मानवतेच्या सुपुत्रांचें उदात्त स्वप्न
अजून नाहीं पूर्ण साकार
विशाल मानवतेच्या महामंदिराला
अजून नाहीं स्थिर आधार
मानवामानवामध्यें नाहीं ऐक्य भावना
हीच मानवतेची मूक मनोवेदना.

*

क. गो. द. वैद्य

कवि गो. द. वैद्य यांच्या कविता विशेष पण एक दोन भारतमित्रांतून प्रसिद्ध झाल्याचें अशा कुठें प्रकाशनांत आलेल्या दिसत नाहींत; स्मरतें. त्यांपैकीं पंधरा वर्षांपूर्वीची एक कविता–

सृष्टिनियम !

गगनावरतो हळुहळु चढला प्रखर दीप्ति-सूर्य
माध्यान्हीं जे अंशु पाडिले तप्त अपरिहार्य !
चढतां चढतां पूर्ण प्रखरता पाहुनि हंसला तो,
घसरत खालीं लुप्त जाहला अस्तसागरीं तो !
अथांग भरती येउनि फुगला चंदेरी दरिया,
करूं लागला खळबळ वाटे स्वयंपूर्ति गाया !
उसळुनि लाटा, फेसफवारे फेंकुनि, फत्तरही—
गिळिले त्यानें; ओहोटी पण आली त्यालाही !
येणें जाणें समान दोन्हीं कालाचा हा काला
सृष्टिनियम हा असतां मनुजा, हळहळ कां तुजला ?
बालपणांतुनि मानव गेला फुलत्या ज्वानींत.
सतेज झाला, चंचल दिसला, नवल काय त्यांत !
मदन मनोहर मोहकतेनें असा जरी खुलला
वार्धक्य परि क्षीण करोनी हतबल त्या केला !
पुष्प उमललें, खुललें, फुललें, डुललें परि हाय !
प्रफुल्ल होतां हंसतां बघतां करपुनि तें जाय !
कल्पित आशा पूर्ण पावल्या तोंच भंग झाला !
सृष्टिनियम हा असतां मनुजा, हळहळ कां तुजला ?

★

कवि. स. रा. शिरोडकर

क. स. रा. शिरोडकर यांची एक कविता— **तिळगूळ**

संक्रांतीचा तिळगूळ घ्या हो प्रेमभरें गोड ।
प्रेम करा वृद्धिंगत अपुलें विसरुन जा तेढ ॥
गोड तिळाचे दाणे माझे समजुन घ्या हातीं !
मुखांत पडतां अमृत कण हे अमर प्रेम देती ॥१॥
माणुसकीचा मंत्र तुम्हांला सांगतील कानीं ।
सत्य, अहिंसा, दया नि समता वाढवतील मनीं ॥
संक्रांतीचा घरोघरीं हा नेतिल संदेश ।
दुःख, दैन्य, दारिद्र्य निवारुन सुखावेल देश ॥२॥

★

क. मुं. वि. प्र. सरदेसाई

कवि मुकुंद विठोजी प्रतापराव सरदेसाई हे फोंडें तालुक्यांतील वाडी येथील राहणारे; पण नोकरीनिमित्त त्यांचा मुक्काम मुर्गांव येथेंच असे. यांचा पिंड कवींचा नसून ते गद्य लेखनच करीत असत. तथापि केंपे येथील भारत पत्रांतून त्यांच्या दोन तीन कविता प्रकाशनांत आल्याचें स्मरतें. त्यांनीं एक संगीत नाटकहि लिहिलें होतें; पण तें प्रकाशनांत आलें नाही.

*

क. मंगलदास लोलयेंकर

कवि मंगलदास लोलयेंकर यांची अलींकडेच प्रकाशनांत आलेली एक कविता —

माता

युगा युगाची साथ सोडुनी
दूर दूर तूं माझ्या पासुनी
शतजन्मांची शतः पावली
टाकुनी अर्ध्यावरती गेली
आतां सर्व हें कसें सहावें
दुर्बलापुढें प्रश्न पडावें ॥१॥
वैशाखींचे वैशाखवणवे
सुकुनी जाती वृक्ष–तणावे
सर्व सृष्टीची कांती हरुनी
यमदूत हांसे आभाळांतुनी
कालौघासवें नवरी बनुनी
सारी सृष्टी ताजी तवानी ॥२॥
हा दिलासा पिंजल्या अंतरा
जगण्यासाठीं बने आसरा
तसा वळुनी काल जरा
खळ खळ हांसे क्षुद्र पामरा ॥३॥

*

क. गणपत पावसकर

कवि गणपत पावसकर यांच्या कांहीं स्फुट कविता अलीकडे प्रकाशनांत आलेल्या दिसतात. त्यांतील एक —

उतरला मानव चंद्रावरी

उतरला मानव चंद्रावरी
मानवी इच्छा झाली पुरी ॥धृ०॥
अखिल जग हें झालें हर्षित
साध्य झालें मानवी इप्सित
संपली दोघांमधली दुरी ॥१॥
जेव्हां पडलें पहिलें पाऊल
असेल लागली चंद्रा चाहूल
केलें त्यानें स्वागत हर्ष भरी ॥२॥
मान मिळविला मानवानें
विजयी ठरला स्वकष्टानें
मात केली कैक संकटांवरी ॥३॥
लक्षोगणती अंतर सधलें
मानवी बुद्धीनें त्वरीत तोडलें
केली महत्वाकांक्षा पुरी ॥४॥
ढळला तो तर चंद्र नभींचा
अजिंक्य ठरला मानव अजीचा
चंद्र तो भयभीत होईल वरी ॥५॥
चंद्रावरचें रचित काव्य तें
फोल ठरविलें प्रयत्नानें
काव्य तें ठरलें स्वप्नापरी ॥६॥
मुलां फुलांचा तो चंद्रमा
कल्पित ठरल्या मानवी उपमा
घडतें ऐसें स्वप्नांतरीं ॥७॥
अजरामर हें मानवी साहस
घडविला मानवें नव इतिहास
देईल नव प्रेरणा मानवां तरी ॥८॥

*

क. राम महांबरे

कवि राम महांबरे यांच्या बऱ्याच कविता महाराष्ट्रांतील नियतकालिकांतून प्रसिद्धीस आल्या आहेत. भारतमित्रांत प्रसिद्ध झालेली त्यांची एक कविता 'नव्या जगाचा छंद' ही पुढें दिली आहे.

नव्या जगाचा छंद !

या झगमगणाऱ्या भव्य महालांत
मी कनकमंचकीं सुखें पहुडलों शांत
परि दूर कुठें तरि अति जीर्ण झोंपडींत
कुणि असेल जगवित विझणारी ज्योत
विश्वांत उमलली धुंद चांदणी रात
अन् कुशीत माझ्या मदालसा विश्रांत
परि दूर कुठें तरि भयाण एकांतांत
कुणि असेल विरही यक्ष अश्रु ढाळीत !

नाचत जाहली इथें नर्तिका दंग
गिर्कीतुन प्रीती पसरित येई पंख
परि दूर कुठें तरि जीर्ण राऊळांत !

कुणि असेल छेडित आर्त स्वरांत अभंग
सेवेस माझिया सज्ज मनोवांच्छा तें
अन् घरांत माझ्या लक्ष्मी पाणी भरते
परि दूर कुठें तरि आसुसल्या नजरेनें
कुणि असेल शोधित मातीमधलीं शितें !

हीं असून सौख्यें अमीत आणि अनंत
सलतसे उरीं मम कसलें दुःख अबोध
ही चार भिंतिची पार फोडुनी कारा
चल जिवा घेउनि नव्या जगाचा छंद !

क. स. वि. देसाई

कवि स. वि. देसाई यांच्या अनेक कविता ठिकठिकाणच्या नियतकालिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांपैकीं भारतमित्रांतून प्रकाशनांत आलेली एक कविता—

भवितव्य

कर्तव्यपराङ्मुख जगीं
नच खऱ्या जीवना जगीं
दुःख निराशा करिती त्याच्या
गेहिं सदा वास्तव्य !
दुर्गम्य अशा आपदा
येतील मार्गि जरि सदा
काय थोरता उगीच मिळते
केल्याविण जगतीं दिव्य !
उद्दाम निराशा निशी
अंधार पसरि जरि दिशीं
लाख दिप वर नभीं फेंकिती
प्रकाशलेखा दिव्य !
निंदील कुणी वाक्शरीं
रोधील कुणी वा जरी
कांचननिकषीं धरी उजाळा
निंद्य न हो परि स्तव्य !
दुःखांत काळ कंठणें
निर्माल्य मोल अन् जिणें
जातिवंत नच कल्पांतींहीं
म्हणति मार्ग हा सेव्य !
तूं करी सदा कर्तव्य
यश येईल दारीं भव्य
सत्यपूर्ण मधुमंगल पुढती
तरिच तुझें भवितव्य !

क. विनायक मं. कुडचडकर

कवि विनायक मंगेश कुडचडकर हे कुडचडें येथें राहाणारे असून त्यांची काव्यरचना मार्मिक असते. यांच्या कित्येक कविता वृत्तपत्रांतून वाचकांपुढें आलेल्या आहेत. त्यांपैकींच ही एक नमुन्यादाखल पुढें दिली आहे.

परीक्षा

खड्ड्यांत जावो ही परीक्षा
त्यापेक्षां मागेन भिक्षा ।
त्रिदंडी संन्यासाची दीक्षा
घेणें त्याहुन उत्तम ॥
हातीं पेन, पुढें पेपर
लिहावें लागतें भराभर ।
तेव्हां कुठें थोडे फार
मार्क पदरीं पडतात ॥
दैव असावें लागतें थोर
किंवा मास्तर मनाचा उदार ।
तेव्हांच येती सोपे पेपर
एरवी सगळीच कत्तल ॥
शाळा कॉलेज संपल्यावर
नोकरीसाठीं वणवण फार ।
करितांनाही हिचा कहर
पिच्छा पुरवी सर्वांचा ॥
व्हेकन्सीसाठी परीक्षा
कन्फर्म व्हावया परीक्षा ।
प्रमोशनसाठींहि परीक्षा
सगळीकडे तीच दिसे ॥
त्यांतल्या त्यांत असते बरी
आपणां पुरुषांची उमेदवारी ।
भगिनींनां मात्र ताप भारी
वधुपरीक्षा यावी लागतसे ॥

*

क. सौ. म. नावेलकर

कवयित्री सौ. मनोरमा नावेलकर यांच्या कविता साध्या पण सुंदर असतात. मागें एकदां भारतमित्रांतून प्रकाशनांत आलेली त्यांची एक कविता 'मातृपूजा'—

मातृपूजा

प्रभा मांगल्याची
तुझ्या नयनांची
पाहून जिवाची
शांती होई ॥१॥
दीप गगनांत
असंख्य तेवत
चंद्र ओंवाळीत
माते, तुला ॥२॥
उषा अरुणाना
प्रभात गायनां
विविध रंगांनीं
पूजीयेलें ॥३॥
गाती विहंगम
तुझें त्यांस प्रेम
आनंदाचें धाम
तुझ्या ठायीं ॥४॥
पराग फुलांचा
गुंफुन मोलाचा
अनिल मातेचा
ध्यास घेई ॥५॥
परी मानवही
माते ! तुझ्या पायीं
अर्पीती कां कांहीं
जन्मूनीयां ? ॥६॥

*

क. म. सुखठणकर

कवि श्री. म. सुखठणकर यांची एक कविता—

घडीमागें घडी गेली

वनामाजी फुलाव्यात
पुष्पराजी मनोहारी
परंतु कोण त्यांच्या घे
सुवासा ? म्लानता सारी ॥
तशीं उत्फुल्ल तीं ध्येयें
करपलीं रुक्षतमाजीं ।
आणि पोटाचिया पाठीं
घडी मागें घडी गेली ॥
चित्रवैचित्र्य सृष्टीचें
मनाला पाडितें भूल ।
आणि दुर्दम्य आशेत
वाटतें स्वर्ग लाभेल ॥
परंतु पसरले कांटे
पथीं अन् शक्ति ना उरली ।
चालण्या ध्येय मार्गांत
घडीमागें घडी गेली ॥
स्वर्गांची स्वैरता घ्यावी
वाटलें अंबरीं जावें ।
मत्स्य होऊन जगताचे
किनारे आणि धुंडावे ॥
जखडिला आणखी गेलों
परंतु ध्येयरज्जूंनीं ।
जहाली ध्येयपूर्ती का ?
घडीमागें घडी गेली ॥
सुखाचा शब्दही कोठें ?
कोठुनी अश्रु प्रेमाचे ?।
मानली विषमता सारी
विझे स्थंडील हृदयाचें ॥
तशी धुगधूग ध्येयाची
निमाली राखही झाली ।
आणि पोटाचिया पाठीं ।
घडीमागें घडी गेली ! ॥

*

क. ग. वैद्य

कवि श्री. ग. वैद्य यांची एक कविता—

सद्वर्तनी

नम्र देशा, धर्मासि, मायबापा ।
नम्रतेनें वश करितसेचि लोकां ॥
बाल वृद्धां तरुणांहि प्रिय होय ।
असा सद्वर्तनि बाल जगा प्रिय ॥१।

सत्य आचरणें नांदतें त्रिकाल ।
वचन पालन हें जयाचें, सुशील ॥
शब्द रत्नाहुनि मूल्यवान होय ।
असा सद्वर्तनि बाल जगा प्रिय ॥२॥

गोड शब्दांनीं मोहवी मनाला ।
सिद्ध बाबा जो साह्य निज जनांला ॥
सदा आनंदें कार्यमग्न होय ।
असा सद्वर्तनि बाल जगा प्रिय ॥३॥

देशसेवा आवडे बंधु सेवा ।
हेत हृदयीं धरि करूं लोक सेवा ॥
सदा कार्यामधिं मग्न पूर्ण होय ।
असा सवद्र्तनि बाल जगा प्रिय ॥४॥

*

क. अनंत तातोबा कामत

कविवर्य अनंत तातोबा कामत हे हरमल येथील राहाणारे असून जुन्या पिढींतील एक चांगले अनुभवी साहित्यिक आहेत. यांचे कित्येक स्फुट लेख व अनेक कविता विविध पत्रांतून प्रकाशनांत आल्या आहेत. त्यांनी लिहिलेल्या कांहीं संगीत नाटकांपैकीं एक दोन प्रसिद्ध हि झालीं आहेत. भारतमित्राच्या गोमंतक स्वातंत्र्य अंकांत आलेली त्यांची एक कविता 'गोवा—स्वातंत्र्यगीत' पुढें दिली आहे.

गोवा-स्वातंत्र्यगीत

स्वातंत्र्य देवतेला ।
करुं आधि वंदनाला ॥
झाली प्रसन्न, करि जी ।
परदास्य मोचनाला ॥ १ ॥
सन्मान्य राष्ट्रमाता ।
स्वायत्त भारताला ॥
अत्यादरें नमूया ।
या मंगला घडीला ॥ २ ॥
कीं दैव दुर्विलास ।
गोमंत जन्म-भू ही ॥
अति दीर्घ काल साही ।
परदास्यपीडनाला ॥ ३ ॥
तें पारतंत्र्य पीडी ।
चोहींकडूनि नाडी ॥
जगण्यांत नाहिं गोडी ।
छळ तो असह्य झाला ॥ ४ ॥
त्राता कुणी दिसेना ।
सदुपायही सुचेना ॥
प्रभुलागिं जाइ शरणा ।
करुणा परात्पराला ॥ ५ ॥
तो देइ भारतांसी ।
गोवा विमोचनाची ॥
ती प्रेरणा हिताची ।
यश देइ भारताला ॥ ६ ॥
ती थोर राष्ट्रमाता ।
देई प्रसंगिं हाता ॥
आभार भार माथां ।
जाणूं सदैव ठेला ॥ ७ ॥
उदयासि भाग्य येई ।
परदास्य मुक्त होई ॥
गोमंत मातृ भू ही ।
प्रणती करूं तियेला ॥ ८ ॥
निरपेक्ष कर्मयोगीं ।
झुंजार स्वार्थत्यागीं ॥
ना गणुनि देह अर्थी ।
झटले स्वतंत्रतेला ॥ ९ ॥
त्या प्रकट देशभक्तां ।
प्रच्छन्नही समस्तां ।
प्रणिपात तेविं विगतां ।
धरुनी कृतज्ञतेला ॥ १० ॥
गोवा स्वतंत्र झाला
संलग्न भारताला ॥
ना भेदभाव राही ।
'जय हिंद' सर्व बोला ॥ ११ ॥

★

क. रा. पां. कारापूरकर

कवि कारापूरकर हे एक चांगले साहित्यिक असून त्यांचे काव्य, निबंध, कथा, निरनिराळ्या मासिकांतून प्रसिद्ध झाल्या आहेत. भारतमित्र मधील त्यांची एक कविता—

अभंग

अंतरींच्या दारीं
चाहुल कुणाची
ऐकूं ये मनासी
निरंतर ॥
तिव्र लालसांच्या
क्षुधित भावना
दूर करविण्या
सदोदित ॥
वृत्तीचें अस्थैर्य
भंग त करण्या
स्थैर्य संस्थापिण्या
आपोआप ॥
हृदयाची निशा
आंत कोंदाटली
काळोखीं रिझली
आत्मज्योत ॥
ऐकतां चाहूल
स्फूर्तीच्या लहरी
उठती अंतरीं
सहजची ॥
आणि हृदयाच्या
काळोख्या अंधारीं
आत्मज्योत परी
तेज सांडी ॥
तेजाचीं किरणें
परावर्तें मुखीं
शुद्ध चारित्र्याचीं
प्रतिबिंबें ॥

*

क. शांताराम मोये

क. मोये यांची 'राष्ट्रमत' मधील एक कविता—

चंद्राभंवतीं फिरतें यान

अजब दृष्टीला दिसलें छान
चंद्राभंवतीं फिरतें यान ॥ धृ. ॥
नव्हतें पाणी नव्हता वारा
इच्छी मानव तिथेंच थारा
जिंकशील का शशांक तारा
तुझा मानवा विक्रम जाण । चं. ॥
गगनावरच्या सूर्यमंडळीं
हनुमंतानें उडी मारिली
पुराणांत ही कथा वदली
अजब काय त्याहून हें ज्ञान ? ॥ चं. ॥
मात निसर्गा करिती कोणी
यानें फिरवी चंद्राभुवनीं
तरीहि त्यांच्या मनां लोचनीं
नाचत आहे एक विज्ञान ॥ चं. ॥

क. सामंत

कवि स. वि. सामंत यांची एक कविता—

सागरास

हे सागरा, उफळसी अति उच्च शब्दें
फेनासवें उधळिसी जरि हास्य अब्धे
उत्तुंग ऊर्मि उठती भिडण्या नभाला
वाटे न त्या बघुनि मोदहि मन्मनाला
सौंदर्य साजुक मना अति हर्ष देतें
दोषावलिप्त असतां परि दुःख होतें
श्रीरामनाम जरि मंगल पूर्णधाम
ऐके न कोणी शववाहक शब्द राम
नीचांहुनी हृदय नीच तुझें असावें
दुःखीं दुजां ढकलुनी नच त्वां हंसावें
जीवापहारि जखमेवरि सैंधवाचें
शोभे न सिंचन निधे करणेंच सांचें

*

क. प्रभा प्रभुदेसाई

क. प्रभा प्रभु देसाई यांची एक कविता—

तूं हांस हांस राणी

अशीं आसवें कां
तुझ्या लोचनीं हीं ?
शब्दांचीं फुलपांखरें
कां न कमलवदनीं ?
कां आज हा असा
चेहरा मलूल झाला ?
नभीं शुक्र खिन्न झाला
पाहतां क्षणींचि त्याला
पाहून चेहरा हा
तव काळवंडलेला
दुःखी खचित वाटे
हां आसमंत झाला
कां आसवें ही जमलीं
तव काळशार नेत्रीं ?
शुक्र खिन्न नभ पहा तें
हिमबिंदु कितिक ढाळी
पाहुनी दुःखी तुजला
झाली ही सृष्टि दुःखीं
हंसतां क्षणींच तूं मग
होईल तीहि सुखी
तूं हांस हांस राणी
हंसूं दे विशाल सृष्टि
हंसण्यांत गुप्त तुझ्या
आहे नैर्षन दृष्टी

क. वि. व्यं. दलाल

क. दलाल यांनीं कांहीं काव्यपुस्तकें लिहिलीं असून त्यांतील **श्रीचंद्रेश्वर महात्म्य, श्रीशांतादुर्गा महात्म्य, श्रीदामोदर महात्म्य** अशीं कांहीं प्रसिद्ध झालीं आहेत.

★

क. सुशिला

क. सुशिला यांची एक कविता—असेंच यावें.

असेंच यावें

असेंच यावें कुंजवनांतून
तव मुरलीचे मंजुळ सु–स्वर
अशीच आणिक साथ मिळावी
पदींचे घुंगूर त्या तालावर ॥१॥

असाच यावा लपुनि छपुनी
जल भरण्या मी जातां जातां
अडवशील जर वाटेवरती
धरुनी ठेविन अवखळ हातां ॥२॥

असाच यावा तिन्हीं सांजेला
ध्यान मग्न मी तुळशीजवळीं
झांकुनी माझे डोळे सत्वर
अवळखीन मी तुज वनमाळी ॥३॥

असेंच वाटे यावें श्रवणीं
तुझ्या मुखांतील गोड बोल ते
आणि दिसावी बालमूर्ति तव
विसरूनि जाइन संसारातें ॥४॥

★

क. रा. वि. देवारी

यांनीं संपादन केलेलें काव्य म्हणजे **श्री नवदुर्गा स्तोत्र.** याच्या एकुण ओव्या ४६ असून शेवटीं प्रार्थना दिली आहे. पुस्तिकेचा आकार छोटा व पृ. १४ आहेत. या पुस्तिकेंतील कांही ओव्या :—

जय जगदंबे विश्वरूपिणी । ब्रह्मानंदे आदि जननी । मूल प्रकृति प्रणवरूपिणी । नारायणी अंबिके ॥

★

कोंकणी काव्य

कोंकणी काव्यलेखनाचा आरंभ सोळाव्या शतकांत झाला असें उपलब्ध साधनांवरुन दिसून येतें. लोककथा व लोककाव्यें प्राचीन कालापासून प्रचारांत असलीं तरी कोंकणी लेखनाबद्दलचे सोळाव्या शतकापूर्वीचे पुरावे अजून उपलब्ध नाहींत. ब्राग येथील सार्वजनिक ग्रंथालयांत गोव्यांतील जीं हस्तलिखीत बाडें आहेत त्यांतील ७७१ व ७७२ नंबरच्या बाडांत १६ व्या शतकांतील १० कोंकणी काव्यग्रंथ रोमन लिपींत आहेत, असे डॉ. पिसुर्लेकरांनीं लिहिलें आहे.

आधुनिक कालांत कोंकणी काव्य रचणाऱ्यांत ह. भ. प. कृष्ण भट बांदकर व भि. रा. पां. वैद्य यांच्या नंतर साहित्यिक दृष्टीनें कोंकणी काव्यरचना करणारे पहिले कवि बयाभाव [का. श्रीं. नायक) हे होत. **सड्यावैलीं फुलां** हा त्यांचा काव्यसंग्रह वाचलेल्यांनां याचा अनुभव आहेच. क शां. वि. कामत यांचा **खांचक्या-करण** प्रगटल्यानंतर क. दिनकर देसाई यांच्याहि वेधक कविता वाचकांपुढें आल्या.

पद्मश्री बा. भ. बोरकर यांनीं मराठींतल्या-प्रमाणेंच कोंकणी काव्यरचनेंतहि मानाचें स्थान पटकावेलं आहे. **पांयजणा, भारताचो दिष्टावो, गीताय** अशा त्यांच्या प्रतिभासपन्न काव्यसंग्रहांनीं वाचकांची मनें बरींच वेधून घेतलीं. अभिजित कवीनें कवींद्र टागोरांच्या ज्या कविता कोंकणींतून वाचकांपुढें ठेवल्या त्याहि त्यांनां फार आवडल्या. प्रा. मनोहरराय सरदेसाई यांचें काव्य तर मार्मिक नि ओजस्वी आहे. त्यांची **लोकशाय** कविता बरींच गाजली. त्यांचे काव्यसंग्रहहि निघालेसे दिसतें. क. र. वि. पंडित यांच्या **धर्तरेचें कवन** या काव्यसंग्रहानें वाचकांच्या मनाची बरींच पकड घेतली. ॲड. सुहास दलाल यांचीं **श्रीचंद्रेश्वर स्तोत्र, श्रीमंगेशमहात्म्य, श्रीदामोदरस्तवन, अभंग—आरती, श्रीशांतादुर्गाख्यान** इ. पुस्तकें भाविकांनां फार आवडलीं.

पंचवीस वर्षांपूर्वीचें क. मंगेशराव तेलंग यांचें **भगवद्गीतासार** वाचकांनां बरेंच मानवलें होतें. ॲड. शानभाग यांच्या काव्य पुस्तिकाहि वाचनीय होत्या.

क. शंकर रामाणी, पांडुरंग भांगी, वसंत वैकुंठ कारे, उदय भेंब्रे, गजानन रायकर, अर-विंद भाटीकर, सौ. विजया सरमळकर यांच्या कविता तर प्रसिद्धच आहेत.

क. रामराय कुंकळ्येकर, सुभाष बोरकर, सुभाष प्रभु देसाई, ज्ञानेश्वर बोरकर, नारायण प्रभु, सतीश दळवी, शांताराम नाईक, नागेश करमली, रा. ना. नाईक, कृ. म. मये, शांताराम वालावळीकर, प्रभा देसाई, अंजनी नाटेकर सुरेश बोरकर, मीलन उसगांवकर, चंद्रकांत पार्सेकर, विनायक नाडकर्णी, दिलीप सावंत, सुभाष काकोडकर, रामकृष्ण आचार्य, क जुवीं-रकर, यशवंत केळेकर, असे अनेक कवि उत्सा-हानें पुढें येत आहेत हें कोंकणीच्या उत्कर्षाचें एक शुभचिन्हच म्हणतां येईल.

* * *

66
5